आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...

# आपलं महानगर

रुपये ४

mymahanagar.com | mymahanagar | mymahanagar

● मुंबई । नाशिक । अहमदनगर । ठाणे । पालघर । रायगड । पुणे जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक   मुंबई ● शनिवार ५ सप्टेंबर २०२० ● वर्ष ३२ ● अंक १७१ ● पाने ८   R.N.I.REG NO: 49802/1990

● epaper.mymahanagar.com   ● connect@mymahanagar.com

## राज्यात १९,२१८ नवे रुग्ण, ३७८ जणांचा मृत्यू

**मुंबई** ● राज्यात १९,२१८ नवीन रुग्णांची नोंद झाली असून, कोरोना बाधित रुग्णांची संख्या ८,६३,०६२ झाली आहे. आतापर्यंतचे सर्वाधिक कोरोना रुग्ण राज्यात सापडले आहेत. सलग तीन दिवस राज्यात मोठ्या प्रमाणात रुग्ण सापडत असल्याने कोरोनाचा विस्फोट होत असल्याचे दिसून येत आहे. राज्यात २,१०,९७८ ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. शुक्रवारी राज्यात ३७८ करोना बाधित रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाली असून मृतांची संख्या २५ हजार ९६४ वर पोहोचली आहे. सध्या राज्यातील मृत्यूदर ३.०१% एवढा आहे. मृतांमध्ये मुंबई ३५, ठाणे ७, नवी मुंबई ४, कल्याण डोंबिवली मनपा ८, पालघर ४, वसई विरार मनपा ३, रायगड २, नाशिक १६, कोल्हापूर ४०, सांगली २४, औरंगाबाद ५, उस्मानाबाद १२, नागपूर २६ आणि अन्य २ यांचा समावेश आहे.

# कंगनाच्या थयथयाटावर शिवसेनेची आगपाखड

विशेष प्रतिनिधी ● मुंबई



अभिनेत्री कंगना रानौतचा थयथयाट दिवसेंदिवस वाढत चालला असून मुंबईला पाकव्याप्त काश्मीर म्हणण्यापर्यंत तिची मजल गेली आहे. हे कमी म्हणून की, काय तिने आता लोकांचे बाप काढायला सुरुवात केल्यानंतर शिवसेना तिच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. मुंबई, नाशिक तसेच ठाण्यात कंगनाच्या पोस्टरला जोडे मारून ते जाळण्यात आले. यामुळे चवताळलेल्या कंगनाने मी मुंबईत येतेय, कुणाच्या बापाची हिंमत असेल तर मला रोखून दाखवा. यावर तू मुंबईत कशी येतेस तेच आता आम्ही बघतो, असा इशारा शिवसेना महिला आघाडीने दिला आहे. शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी कंगना मुंबईत आली तर शिवसेनेच्या रणरागिणी तिचे थोबाड फोडल्याशिवाय राहणार नाहीत.

पान २



मी मुंबईत येणारच. येत्या आठवड्यात ९ सप्टेंबरला मी मुंबईला येणार आहे. वेळ मी कळवेनच. कुणाच्या बापाची हिंमत असेल तर त्यांनी मला रोखून दाखवावे – कंगना रानौत, अभिनेत्री



मुंबई मराठी माणसाच्या बापाचीच आहे. ज्यांना हे मान्य नसेल त्यांनी त्यांचा बाप दाखवावा. शिवसेना अशा महाराष्ट्राच्या दुश्मनांचे श्राद्ध घातल्याशिवाय राहणार नाही. हे वचन – संजय राऊत, खासदार, शिवसेना

# एक तासात ५० गुणांची परीक्षा

## अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत उदय सामंत यांची माहिती

खास प्रतिनिधी ● मुंबई

**अंतिम वर्षाची परीक्षा ही तीन तासांऐवजी एक तासाची व १०० गुणांऐवजी ५० गुणांची घेण्यात येणार असल्याचे संकेत शुक्रवारी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले. मात्र, या परीक्षा घेताना तंत्रज्ञानावर भर देत लेखी परीक्षांसाठी विद्यापीठाला एमसीक्यू, असाईमेंट किंवा ओपन बूकचे पर्याय खुले केले आहेत. तसेच प्रात्याक्षिक परीक्षा स्कायपे सारख्या मिटींग ॲप किंवा टेलिफोनिक पद्धतीने घेण्याच्या सूचनाही उदय सामंत यांनी केल्या आहेत. परीक्षा पद्धती, वेळापत्रक व अभ्यासक्रम तातडीने जाहीर करावे अशाही सूचना त्यांनी**



परीक्षा कशा पद्धतीने घेण्यात येणार असल्याची माहिती ७ सप्टेंबरपर्यंत सरकारला कळवावी अशा सूचना सामंत यांनी राज्यातील अकृषी विद्यापीठांना दिल्या आहेत. अधिकाधिक भर तंत्रज्ञानावर देऊन परीक्षा घेण्यात यावी, असे स्पष्ट करताना त्यांनी परीक्षा या १०० गुणांऐवजी ५० गुणांच्या तर तीन तासांऐवजी एक तासाची असणार असल्याचे संकेत दिले. अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात राज्य सरकारने कुलगुरूंच्या गठीत केलेल्या १० जणांची समिती स्थापन केली होती. या समितीने राज्य सरकारला सादर केलेला अहवाल शुक्रवारी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी जाहीर केला.

यामध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत विद्यार्थ्यांना घरी बसून परीक्षा देण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. विद्यापीठांची गुणवत्ता कायम राखण्यासाठी कमीतकमी कालावधीत परीक्षा घेताना त्या ऑनलाईन, ऑनलाईन व ऑफलाईन किंवा पेन व पेपर यांचा वापर करून घरातूनच परीक्षा घ्यावी, दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी सोईसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा ११ सूचना अहवालामध्ये समितीकडून मांडण्यात आल्या होत्या. यावर विद्यापीठाची शिक्षण समिती आणि परीक्षा मंडळाची तातडीने बैठक घेऊन परीक्षा कशा पद्धतीने घेता येतील.

पान २

# पुण्यातला कोरोना रोखण्यासाठी अखेर शरद पवारांचा पुढाकार




**पुणे** ● पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये कोरोना हाताबाहेर गेला असून आरोग्य यंत्रणा कुचकामी ठरू लागली असल्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी कोरोना रोखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. पुणे शहरासाठी सहा कार्डियाक ॲम्ब्युलन्स आणि दीडशे रेमडिसिव्हर इंजेक्शन दिले असून गरजवंतांना त्याचे वाटप करण्याचे आदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांना दिले आहेत.

जम्बो रुग्णालयात उपचार घेत असलेल्या पत्रकार पांडुरंग रायकर यांच्या मृत्यूस कार्डियाक ॲम्ब्युलन्स वेळेत उपलब्ध न होणे हे एक प्रमुख कारण असल्याचे सांगण्यात येते. या पार्श्वभूमीवर पवार यांनी पुणे शहरासाठी सहा कार्डियाक ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून दिल्या आहेत. पुणे शहर आणि जिल्ह्यातील कोरोनाची संख्या आटोक्यात आणण्यासाठी पवार यांनी धुरा आपल्या हाती घेत बैठका, भेटींचा सपाटा लावला आहे. पवार यांनी गुरुवारी अचानक पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला भेट देत तेथील कोरोनाच्या परिस्थितीचा आढावा घेतला होता. त्यापाठोपाठ शुक्रवारी सकाळी विभागीय आयुक्त सौरभ राव तसेच इतर उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेत त्यांनी पुणे पिंपरी आणि जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. या बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक लोकप्रतिनिधींसह खासदार अमोल कोल्हे, वंदना चव्हाण यांच्याशी त्यांनी चर्चा केली.

पान २

# नीट, जेईई परीक्षांबाबत सहा राज्यांची फेरविचार याचिका कोर्टाने फेटाळली




**नवी दिल्ली** ● देशातील सहा राज्यांनी नीट, जेईई या परीक्षांबाबत फेरविचार करावा म्हणून दाखल केलेली याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावली असून या परीक्षा घेण्यास पुन्हा एकदा हिरवा कंदील दिला आहे. जेईई मेन परीक्षा १ सप्टेंबर २०२० पासून सुरू झाली असून ६ सप्टेंबर २०२० पर्यंत सुरू राहणार आहे. नीट यूजी परीक्षा १३ सप्टेंबर २०२० रोजी होणार आहे.

जेईई आणि नीट यूजी परीक्षा कोरोना काळातही आरोग्यासंबंधी सुरक्षिततेचे नियम पाळून घेतल्या जाव्यात असा निर्णय सुप्रीम कोर्टाने १७ ऑगस्ट रोजी दिला होता. या निर्णयाविरोधात देशातील सहा राज्यांनी सुप्रीम कोर्टात फेरविचार याचिका दाखल केली होती. ती कोर्टाने फेटाळली.



न्या. अशोक भूषण, न्या. बी. आर. गवई आणि न्या. कृष्ण मुरारी यांच्या खंडपीठाने ही सुनावणी घेतली. बिगर भाजप सरकार असलेल्या ६ राज्यांनी सुप्रीम कोर्टात फेरविचार याचिका दाखल केली होती. यात सुप्रीम कोर्टाला विनंती करण्यात आली आहे की न्यायालयाने नीट-जेईई वरील आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांमध्ये मोलोय घटक (मंत्री, प. बंगाल), डॉ. रामेश्वर उरांव (मंत्री, झारखंड), डॉ. रघु शर्मा (आरोग्यमंत्री, राजस्थान), अमरजीत भगत (मंत्री, छत्तीसगड), बलबीर सिंह सिद्धू आणि महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांचा समावेश होता.

## आतील पानात...



हा तर पत्रकारितेचा पराभव! पान ४
लडाखमधील अटळ युद्धसज्जता पान ४

## थोडक्यात

### शेतकऱ्याचे अनुदान थेट अमेरिकेतील खात्यात

**न्यायडोंगरी** ● आले अधिकाऱ्यांच्या मना, तेथे कुणाचे चालेना, असेच म्हणण्याची वेळ नांदगाव तालुक्याच्या चांदोरा गावातील शेतकऱ्यावर आली. या शेतकऱ्याचे खरिप अनुदान तलाठी आणि बँकेच्या अनागोंदी कारभारामुळे थेट अमेरिकेतील नागरिकाच्या खात्यावर जमा झाल्याची धक्कादायक घटना पुढे आली आहे. प्रकाश ढगे यांची चांदोरे येथे शेती असून, २०१८-१९ चे दुष्काळी खरिप अनुदान १३,६०० तसेच, २०१९-२० चे अवकाळी अनुदान १६००० असे एकूण २९ हजार ६०० रुपये त्यांच्या खात्यावर जमा होणे अपेक्षित होते. मात्र, ही रक्कम थेट अमेरिकेतील प्रज्ञा प्रकाश सामंत यांच्या ***८५७५२ या क्रमांकाच्या खात्यावर वर्ग झाली. गावातील तलाठ्यांनी ढगे यांच्या नावापुढे चुकीचा बँक खाते नंबर लिहिल्याने हा प्रकार घडला असून, ही चूक ढगे यांनी तातडीने त्यांच्या निदर्शनास आणून देत, दुरुस्तीसाठी सर्व कागदपत्रे सादर केली होती.

### ...तर व्यापारी संबंध बिघडतील भारताने दिला चीनला इशारा

**नवी दिल्ली** ● ज्या प्रकारे सीमेवर सध्या परिस्थिती निर्माण झाली आहे त्याचे परिणाम दोन्ही देशांच्या व्यापारी संबंधांवरही होतील, असा थेट इशारा भारताचे परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला यांनी दिला. गेल्या काही दशकांमध्ये आपण अनेक समस्यांचा सामना करत आहोत. चीनसोबत सध्या निर्माण झालेली परिस्थितीही त्यापैकीच एक आहे. गेल्या ४० वर्षांमध्ये जे झाले नाही ते यावेळी झाले. ४० वर्षांत त्या ठिकाणी आपण पहिल्यांदा आपले जवान गमावले आहेत, असे श्रृंगला म्हणाले. देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडतेत कोणत्याही प्रकारची तडजोड केली नाही. भारत एक जबाबदार देश आहे आणि कायमच तो चर्चेसाठी तयार आहे. जोपर्यंत सीमाक्षेत्रात शांतता प्रस्थापित होत नाही तोपर्यंत दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध सामान्य होऊ शकत नाही, असे श्रृंगला यांनी नमूद केले.

# पोलिसांच्या बदल्यांना पुन्हा मुदतवाढ आता ३० सप्टेंबरची तारीख



**मुंबई** ● राज्यातल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी 'तारीख पे तारीख', अशा पद्धतीने मुदतवाढ दिली जात आहे. नव्या निर्णयानुसार आता बदल्यांसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याआधी ही तारीख ५ सप्टेंबरपर्यंत होती. कोरोनाची साथ सुरू झाल्यापासून दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात होणाऱ्या बदल्या यावर्षी प्रलंबित राहिल्या होत्या. त्यासाठी एकामागोमाग मुदतवाढ दिली जात आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्य सरकारच्या मार्फत पोलिसांच्या होणाऱ्या बदल्यांवर विरोधकांकडून मोठ्या प्रमाणावर टीका केली जात असताना राज्य सरकारने पुन्हा एकदा बदल्यांना मुदतवाढ दिल्यामुळे या प्रकरणावरून नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र, असं असलं, तरी राज्य सरकार बदल्या करणारच, अशी स्पष्ट भूमिका शिवसेना खासदार संजय राऊत यांनी जाहीर केली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मार्च महिन्यात बदल्यांना ३१ मार्चपर्यंत स्थगिती आणण्यात आली होती. त्यानंतर ही स्थगिती उठवून ३१ जुलैपर्यंत १५ टक्के बदल्या करण्याला मान्यता देण्यात आली. त्याला १० ऑगस्टपर्यंत पहिली मुदतवाढ दिली गेली. ती वाढवून पुन्हा १५ ऑगस्ट करण्यात आली. १५ ऑगस्टची मुदत ५ सप्टेंबर केली गेली आणि आता ५ सप्टेंबरवरूनही ही मुदतवाढ ३० सप्टेंबरपर्यंत करण्यात आली आहे.

# विधानसभेचे अध्यक्ष नाना पटोलेंना कोरोना



**मुंबई** ● विधानसभेचे अधिवेशन तोंडावर असतानाच विधानसभेचे अध्यक्ष नाना पटोले यांची कोरोना टेस्ट पॉझिटिव्ह आली आहे. त्यामुळे ते मुंबईतल्या घरीच क्वॉरंटाईन झाले आहेत.

राज्याचे पावसाळी अधिवेशन येत्या ७ आणि ८ सप्टेंबर रोजी होणार आहे. अधिवेशनाला अवघे तीन दिवस उरलेले असतानाच नाना पटोले यांना कोरोनाची लागण झाल्याने चिंता वाढली आहे. कोरोनाची लागण झाल्यानंतर पटोले हे मुंबईतल्या घरीच क्वॉरंटाईन झाले असून त्यांच्यावर उपचारही सुरू करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, विधानसभा अध्यक्षांना कोरोनाची लागण झाल्याने अधिवेशनाच्या कार्यक्रमात बदल झाल्याबाबत अजून शासनाने काहीही कळवलेले नाही. येत्या ७ आणि ८ सप्टेंबर रोजी विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन पार पडणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनासाठी राज्यातील दोन्ही सभागृहातील आमदारांची अँटिजेन चाचणी करण्यात येणार आहे.

पान २

# अक्षय कुमारने केली घोषणा पबजीला पर्याय फौ-जीचा



**मुंबई** ● अभिनेता अक्षय कुमारने पबजी गेमला पर्याय म्हणून फौ-जी गेम आणला आहे. देशात पबजी हे प्रचंड लोकप्रिय गेमिंग ॲप होतं. लहान मुलांपासून ते तरुणांपर्यंत या गेमची क्रेझ होती. मात्र, केंद्र सरकारने पबजीवर बंदी आणली आहे. त्यामुळे पबजी गेमच्या चाहत्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. मात्र, त्यांना आता पबजीला पर्याय म्हणून फौ-जी गेम लाँच करण्यात येणार आहे. भारत-चीन तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने चीनवर डिजीटल सर्जिकल स्ट्राईक करत तब्बल ११८ चिनी ॲप्सवर बंदी आणली. यामध्ये पबजी गेमिंग ॲपचादेखील समावेश आहे. मात्र, पबजीला पर्याय म्हणून अक्षय कुमारने फौ-जी गेम आणला आहे. अक्षय कुमारने आपल्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवर याबाबत माहिती दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या अभियानाला समर्थन देत फौ-जी गेम सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. या गेममध्ये प्लेयर्स मनोरंजन व्यतिरिक्त सैनिकांच्या बलिदानाविषयी माहिती मिळवू शकतील. या गेममधून जे उत्पन्न येईल त्यापैकी २० टक्के रक्कम भारताच्या 'वीर ट्रस्ट'साठी दान केली जाईल, अशी घोषणा अक्षय कुमारने केली आहे.

# 'थँक अ टीचर' नव्हे, 'शिक्षकांचे धन्यवाद म्हणा'

## आमदार देवयानी फरांदे यांचे ठाकरे सरकारवर टिकास्त्र

**नाशिक** ● शिक्षक दिनानिमित्त देण्यात येणारे आदर्श शिक्षक पुरस्कार रद्द करुन राज्य सरकारने शिक्षकांची अवहेलना केली आहे. 'थँन्क अ टीचर' म्हणत इंग्रजी शाळांना प्रोत्साहन देण्यापेक्षा 'शिक्षकांचे धन्यवाद' असे म्हणून राज्यातील मराठी माध्यमात शिकणारे विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांचे आभार मानावे, अशी टीका भाजपच्या सरचिटणीस आमदार देवयानी फरांदे यांनी केली आहे.

कोरोना योद्धा म्हणून शिक्षक काम करत असताना त्यांचा शिक्षक दिनानिमित्त सत्कार करण्याचा विसर सरकारला पडलेला असून हे दुर्दैवी आहे. आयआयटीच्या धर्तीवर ज्याप्रमाणे पदवीप्रदान कार्यक्रम ऑनलाईन करण्यात आला त्याचप्रमाणे शिक्षकांनाही सन्मानित करायला हवे होते. येत्या आठ दिवसात शिक्षकांना सन्मानित करावे तसेच 'थँक अ टीचर' हा जीआर मागे घ्यावा, अशी मागणी आमदार फरांदे यांनी केली आहे. मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी भांडणाऱ्या व दुकानावर इंग्रजी बोर्ड लावल्यामुळे त्याविरोधात आंदोलन करणाऱ्या शिवसेनेच्या नेतृत्वाखाली महाविकासआघाडी सरकारला मराठीचे वावडे आहे काय? असा सवालही आमदार फरांदे यांनी उपस्थित केला आहे. 'थँक्स अ टीचर' या अभियानाचे नामांतर करून 'शिक्षकांचे धन्यवाद' याप्रमाणे अभियान करणे गरजेचे असल्याने याबाबत शासनाने त्वरित कार्यवाही करावी.

पान २

# लोकल बंद असल्यामुळे मुंबईकरांचे हाल

## अर्ध्या तासाच्या प्रवासासाठी चार तास



**मुंबई** ● कोरोनाविरुद्ध लढत असताना गेले तीन महिने सामान्य मुंबईकरांची जीवनवाहिनी असलेली लोकल बंद आहे. त्यामुळे बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे हाल होताना दिसत आहेत. अवघ्या अर्ध्या तासाच्या प्रवासाला तब्बल चार तास लागत आहेत. यामुळे 'बेस्ट बस इज नॉट बेस्ट', असे म्हणण्याची वेळ प्रवाशांवर आलेली आहे. सीएसटी ते भायखळा दरम्यान संध्याकाळी पाच वाजल्यानंतर प्रवास केला तर अर्ध्या तासाच्या प्रवासाला किमान चार तास लागत आहेत. सर्वसामान्य प्रवाशांना रेल्वेने प्रवास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे हे प्रवासी इतर शासकीय कर्मचारी संध्याकाळी पाच वाजता कामावरून सुटल्यानंतर सीएसटी स्थानकाकडे धाव घेतात.

पान २

# पुण्याच्या पाटील इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या एमडीसह दोघांवर गुन्हा दाखल

## कंत्राट मिळवण्यासाठी रस्ते दळणवळण व महामार्ग मंत्रालयाचे खोटे दस्तऐवज तयार केले

संतोष वाघ ● नवी मुंबई

भारत सरकारचे रस्ते दळणवळण व महामार्ग मंत्रालयाकडून रद्द करण्यात आलेले रस्त्याचे कंत्राट पुन्हा मिळवण्यासाठी खोटे दस्तऐवज तयार केल्याप्रकरणी पुण्यातील 'पाटील इन्फ्रास्ट्रक्चर' कंपनीचे महाव्यवस्थापक एम.बी.पाटील यांच्यासह कंपनीचे विकासक अधिकारी संजय दाशेटवार यांच्यावर नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात फसवणूक तसेच खोटे दस्तऐवज तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून अद्याप अटक करण्यात आली नसल्याची माहिती सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनकर मोहिते यांनी दिली.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार भारत सरकारचे रस्ते दळणवळण व महामार्ग मंत्रालयाकडून महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यात ९ प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पाचे टेंडरनुसार काम पुण्यातील नामांकित 'पाटील इन्फ्रास्ट्रक्चर' प्रा.लि. या कंपनीला देण्यात आले आहे. या नऊ प्रकल्पांपैकी एक प्रकल्प पूर्ण झाला असून उर्वरित ८ प्रकल्पांपैकी ४ प्रकल्पांचे काम संथगतीने सुरू आहे. त्यापैकी रायगड जिल्ह्यातील महाड-रायगड हा २५.६५ किलोमीटर रस्ते बांधणीच्या प्रकल्पाचे काम तात्पुरते थांबवण्यात आले आहे. इतर तीन प्रकल्प धीम्या गतीने सुरू असल्याकारणाने या कामाचे कंत्राट रस्ते दळणवळण व महामार्ग केंद्रीय मंत्री यांनी १६ जून २०२० व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे बैठक घेऊन या तीन प्रकल्पांचे पाटील इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीसोबत झालेला करार रद्द करून नवीन टेंडर काढून नव्याने कंत्राटदार नेमण्याचे आदेश बैठकीत दिले होते.

पान २

## कोरोनाच्या लसीला अजून एक वर्ष लागणार

**नवी दिल्ली●**जगभरात कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अमेरिका, ब्राझील, भारत यांसारख्या देशांना करोनाचा मोठा फटकाही बसला आहे. करोनावर नियंत्रण मिळवण्यासाठी अनेक देश युद्धपातळीवर लस विकसित करण्याचे प्रयत्न करत आहेत. अशातच जागतिक आरोग्य संघटनेने एक मोठे वक्तव्य केले आहे. करोनाची लस येण्यासाठी २०२१ चा मध्य उजाडेल अशी शक्यता जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) व्यक्त केले आहे. २०२१ च्या मध्यापर्यंच व्यापर स्वरूपात लसीकरण शक्य नसल्याचे डब्ल्यूएचओच्या प्रवक्त्यांनी म्हटले आहे. २०० पेक्षा अधिक देशांना करोनाचा फटका बसला आहे. तर सर्वच देश करोना नियंत्रणात आणण्यासाठी लसीची वाट पाहत आहेत. परंतु मोठ्या प्रमाणात लसीचे उत्पादन आणि वितरण हे एक मोठे आव्हान आहे. यामुळे गरीब देशांना अधिक संकटाचा सामना करावा लागू शकतो, अशी भीतीही जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्त केली.

आपलं पालघर

शनिवार, ५ सप्टेंबर २०२०

आपलं महानगर My महानगर.com mymahanagar.com mymahanagar mymahanagar

## थोडक्यात

### विक्रमगड-पाली मार्गावर एसटी-ट्रकचा अपघात

**बोईसर●** विक्रमगड-पाली मार्गावर वाकडूपाडा येथे एसटी बस आणि ट्रकमध्ये टक्कर झाली. त्यात दोन्ही गाड्यांचे चालक जखमी झाले आहेत. ही घटना गुरुवारी रात्री साडेसातच्या सुमारास घडली. एसटी आणि ट्रकची समोरासमोर टक्कर झाल्याने हा अपघात झाला. यात बस आणि ट्रक चालक जखमी झाले असले तरी दोघांनाही फारशी गंभीर दुखापत झालेली नाही. अपघातानंतर यामार्गावरील वाहतूक काही काळ बंद होती. दोन्ही गाड्या बाजूला केल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरु झाली.

### टिमा रुग्णालयातील डॉक्टर निलंबित

**बोईसर●** टोसिलीझुमॅब इंजेक्शन प्रभावी नाही, अशा सूचना राज्य सरकारने दिल्या असतानाही टिमा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना काळ्याबाजारातून इंजेक्शन देणाऱ्या डॉक्टरला रुग्णालयाच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. डॉक्टरने त्यासाठी सत्तर हजार रुपये घेतले होते. डॉक्टरला सेवेदरम्यान कामाकडे दुर्लक्ष केल्याचा व रुग्णांची दिशाभूल केल्याचा ठपका ठेवत रुग्णालयाच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. याप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशीही सुरु करण्यात आली आहे. टोसिलीझुमॅब हे इंजेक्शन प्रभावी नाही, अशा सूचना राज्य सरकार आणि इंजेक्शन पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी दिल्या आहेत. त्यानंतरही बोईसर येथील टिमा रुग्णालयात विनामूल्य सेवा देण्याचा दावा करणाऱ्या एका खासगी डॉक्टरने अत्यवस्थ रुग्णांना टोसिलीझुमॅब इंजेक्शनचा तगादा लावल्याचे प्रकार गेल्या काही महिन्यांपासून सुरु होता. अनेक वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांसह प्रशासनातील बड्या अधिकाऱ्यांनी या डॉक्टरला अशाप्रकारे काम न करण्याचे सूचितही केले होते.

### सनशाईन परिसरात हुक्का पार्लरवर धाड

**वसई●** नालासोपारा पूर्वेकडील सनशाईन परिसरात सुरु असलेल्या दोन हुक्का पार्लरवर तुळींज पोलिसांनी छापा मारला. यावेळी किसन धर्मेंद्र सिंग (वय २१) आणि राम अकबाल यादव (वय २४) यांना अटक करण्यात आली आहे. नालासोपारा पूर्वेकडील आचोळे रोडवरील भरत शॉपिंग सेंटर आणि सनशाईन परिसरात घन्सार प्लाझामध्ये ही हुक्का पार्लर सुरु होती. कारवाईत पोलिसांनी २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय भाईंदरमध्येच

## ■ राज्य सरकारकडून कामाला गती

**शशी करपे ● वसई**

मीरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाची घोषणा होऊन तब्बल एक वर्षाने राज्य सरकारने पहिले आयुक्त म्हणून सदानंद दाते यांची नियुक्ती केली आहे. सध्या नव्या आयुक्तालयाचे मुख्यालय कुठे असेल ही चर्चा सुरु असली तरी पोलीस आयुक्तालय मीरा भाईंदर शहरातच असेल यावर दाते यांनी गुरुवारी केलेल्या दौऱ्याने शिक्कामोर्तब झाले.

गेल्यावर्षी राज्य सरकारने मीरा-भाईंदर आणि वसई-विरार क्षेत्रासाठी नव्या पोलीस आयुक्तालयाची घोषणा केली होती. पण, गेले एक वर्ष त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नव्हती. अखेर मंगळवारी राज्य सरकारने सदानंद दाते यांची आयुक्तपदी नियुक्ती करीत आयुक्तालयाच्या कामाला गती दिली. एस. जयकुमार यांची अपर पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे.

नव्या पोलीस आयुक्तालयात ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील काशिमीरा, मीरा रोड, नया नगर, नवघर,भाईंदर आणि उत्तन या पोलीस ठाण्यांचा समावेश करण्यात आला आहे. तर पालघर पोलीस अधीक्षकांच्या कार्यक्षेत्रातील वसई, विरार, नालासोपारा, माणिकपूर, वालीव, अर्नाळा, तुळींज या पोलीस ठाण्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर मीरा भाईंदर आणि वसई विरारमधील पोलीस ठाण्यांची फेररचना करून भाईंदरमध्ये काशिगाव, खारीगाव ही दोन नवी पोलीस ठाणी निर्माण केली जाणार आहेत. तर वसई विरार परिसरात आचोळे, मांडवी, बोळींज आणि नायगाव ही नवी पोलीस ठाणी निर्माण केली जाणार आहेत.

नव्या पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाच्या आयुक्ताच्या हाती अर्थात सदानंद दाते यांच्याकडे असणार आहे. त्याचसोबत तीन पोलीस उपायुक्त, १३ सहाय्यक आयुक्त अधिकारी असणार आहेत. नव्या आयुक्तालयासाठी ४ हजार ७०८ अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ मंजूर करण्यात आले आहे. त्यासाठी ठाणे ग्रामीणमधून १ हजार ६ आणि पालघर जिल्ह्यातून १ हजार १३५ पोलीस घेतले जाणार आहेत.

दरम्यान, नव्या आयुक्तालयाचे मुख्यालय मीरा भाईंदरमध्येच केले जाणार आहे. त्यासाठी मीरा एमआयडीसीमध्ये जागा आरक्षित करण्यात आली आहे. मुख्यालय विकसित करण्यासाठी चार वर्षांच्या कालावधी लागणार असल्याने सध्या मीरा भाईंदर महापालिकेची एखादी इमारत भाड्याने घेऊन त्याठिकाणी कामकाज सुरु केले जाणार आहे. दाते यांनी गुरुवारी काही ठिकाणी जाऊन जागेची पाहणीही केली.

# भाजप नगरसेविका नीला सोन्स यांच्याविरोधात गुन्हा दाखल

## जातीचा बोगस दाखला प्रकरण

**वार्ताहर ● भाईंदर**

जातीचा बोगस दाखला बनवल्याप्रकरणी भाजपच्या मीरा भाईंदर महापालिकेतील नगरसेविका नीला सोन्स यांच्याविरोधात मुंबईतील खेरवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



नीला सोन्स

सोन्स यांच्या जातीच्या दाखल्याविरोधात खुद्द माजी राज्यमंत्री आमदार रवींद्र चव्हाण यांनी तक्रार केली होती. त्यानंतर १० ऑगस्ट २०२० ला नगरसेविका सोन्स यांचे जात वैधता प्रमाणपत्र बोगस असल्याचे मुंबई उपनगर जात वैधता प्रमाणपत्र समितीने जाहीर केले होते. तसेच त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेशही दिले होते.

त्यानुसार जिल्हा दक्षता समिती निरीक्षक तानाजी भगत यांच्या तक्रारीवरून सोन्स यांच्याविरोधात मुंबईतील खेरवाडी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र अनुसूचित जादी, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग कायदा २००० च्या कलम ११ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, सोन्स भाजपचे मीरा भाईंदरचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या निकटवर्तीय मानल्या जायच्या. मात्र, सोन्स यांनी २६ फेब्रुवारी २० रोजी मीरा रोड पोलीस ठाण्यात मेहता यांच्याविरोधात लैंगिक शोषण, अॅट्रॉसिटी अंतर्गत तक्रार केल्यानंतर गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर भाजपमधूनही सोन्स यांना तीव्र विरोध सुरु झाला होता. बुधवारी सोन्स यांच्याविरोधात शाळेचा बेकायदा कब्जा केल्याचाही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नळपाणीपुरवठा योजना ३१ ऑक्टोबरपूर्वी होणार

**वार्ताहर ● मोखाडा**

मोखाड्यातील अपूर्ण अवस्थेतील नळपाणी पुरवठा योजना येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून हस्तांतरित केली जाईल, असे आश्वासन पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी दिल्यानंतर मोखाडा पंचायत समितीचे सभापती प्रदीप वाघ यांनी सुरु केलेले बेमुदत उपोषण मागे घेतले.

दरवर्षी मोखाडा तालुक्याला भीषण पाणी टंचाई भेडसावत असते. पण, पाणी टंचाईवर ठोस उपाय केले जात नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. टंचाईग्रस्त भागात अनेक वर्षांपासून नळपाणी पुरवठा योजनांची कामे सुरु आहेत. मात्र, ती अपूर्ण



अवस्थेतच आहेत. प्रशासन त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहे. धक्कादायक बाब म्हणजे या कामांबाबत माहिती मागवूनही दिली जात नाही. त्यामुळे या कामाला जबाबदार असलेल्या अधिकारी-ठेकेदारांवर कारवाई करून अपूर्ण योजना तात्काळ मार्गी लावाव्यात यामागणीसाठी वाघ यांनी उपोषण सुरु केले होते.

मोखाड्यातील गोमघर, चास, बेरीस्ते, सावर्डे आणि कारेगाव येथील नळपाणी पुरवठा योजनांची कामे अनेक वर्षांपासून अपूर्णावस्थेत आहेत. त्यामुळे येथील आदिवासींना दरवर्षी पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. बेरीस्ते येथील नळपाणी पुरवठा योजना सदोष कामांमुळे बंद पडली आहे. तर अनेक नळपाणी पुरवठा यजोना ग्रामपंचायतींकडे हस्तांतरीत करण्यात आल्या नसल्याचा आरोप वाघ यांनी केला आहे. या आंदोलनाची दखल घेत जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंत्यांनी उपोषणस्थळी जाऊन वाघ यांनी लेखी आश्वासन दिले.

# शिवसृष्टी साकारण्यासाठी पाच कोटींचे अनुदान मंजूर

**भाईंदर●** मीरा-भाईंदर महापालिका हद्दीतील घोडबंदर किल्ल्याचे सुशोभिकरण आणि शिवसृष्टी साकारण्यासाठी राज्य सरकारने पाच कोटी रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत हा निधी महापालिकेला वर्ग केला जाणार आहे. घोडबंदर किल्ला सुशोभिकरण आणि शिवसृष्टी साकारण्यासाठी तब्बल ५३.६८ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यातील पहिला हप्ता म्हणून पाच कोटी रुपये महापालिकेकडे वर्ग करण्याचे आदेश राज्य सरकारने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. उर्वरित निधी मिळवण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय राठोड यांनी नगरविकास खात्याला विनंती केली आहे. नगरविकास खात्याकडून याप्रकरणी उत्तर आल्यानंतर शिवसृष्टीच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाणार आहे.

(पान १ वरुन)

## पुण्यातला कोरोना रोखण्यासाठी अखेर शरद पवारांचा पुढाकार

बारामती होस्टेल येथे झालेल्या बैठकीत शहराध्यक्ष आमदार चेतन तुपे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अंकुश काकडे, माजी महापौर दत्तात्रय धनकवडे, प्रशांत जगताप, महापालिकेतील विरोधी पक्षनेते दिपाली धुमाळ आदी या बैठकीसाठी उपस्थित होते. पवार यांनी रायकर यांच्याबाबतीत घडलेल्या सर्व परिस्थितीची माहिती घेतली. शहरातील सध्या कोरोनाबाधितांची वाढत असलेली संख्या, गंभीर रुग्णांचे प्रमाण, त्यांच्यावर होत असलेले उपचार, संभाव्य रुग्णसंख्या आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना, याबाबत शहरातील लोकप्रतिनिधींशी चर्चा केली. पुणे शहरात केवळ तीनच कार्डियाक ॲम्ब्युलन्स असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले. या पार्श्वभूमीवर पवार यांनी तातडीने सहा ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून दिल्या. तसेच आर्थिक परिस्थिती नसलेल्या गरजवंतांना रेमडिसिव्हर इंजेक्शनची आवश्यकता भासल्यास त्यांना ते मोफत मिळावे, यासाठी दीडशे इंजेक्शनही तातडीने उपलब्ध करून दिलेत. इंजेक्शन तसेच कार्डियाक ॲम्ब्युलन्सचे व्यवस्थापन राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी करावे, त्यासाठी एक हेल्पलाईन सुरू करावी, अशा सूचनाही त्यांनी स्थानिक नेत्यांना केल्या. पवार यांनी शनिवारी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य महत्त्वाच्या लोकप्रतिनिधींची बैठक आयोजित केली आहे. या बैठकीसाठी काही लोकप्रतिनिधी प्रत्यक्ष तर काही लोकप्रतिनिधी हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहणार आहेत.

## ‘थँक अ टीचर’ नव्हे, ‘शिक्षकांचे धन्यवाद म्हणा’

अशी मागणीही त्यांनी पत्रकार परिषदेत केली. भावी पिढीला शिकवणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी राज्यातील शिक्षकांपैकी उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येतो. मात्र यावर्षी शिक्षण विभागाने हा पुरस्कार रद्द केला असल्याबद्दल प्रा.आ. देवयानी फरांदे यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. खरं तर कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेल्या संकटात शिक्षक नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवत आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी नवनवीन कल्पनांचा वापर करून शिक्षण अधिक सोपे करण्याचा शिक्षक प्रयत्न करीत आहेत. शिक्षण विभागानेही नवीन तंत्राचा वापर केला असता तर तो चांगला आदर्श राहिला असता. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ऑनलाईन ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’ वितरणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे शक्य होते. परंतु शिक्षण विभागाने 'आदर्श शिक्षक पुरस्कार' या वर्षी रद्द करण्याची घेतलेली भूमिका दुर्देवी आहे. अशी प्रतिक्रिया प्रा.आ.देवयानी फरांदे यांनी व्यक्त केली आहे. तसेच येत्या आठ दिवसात ऑनलाईन पद्धतीने ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’ वितरणाचा कार्यक्रम करण्यात यावा.अशी विनंतीही त्यांनी सरकारला केली आहे.

## कंगनाच्या थयथयाटावर शिवसेनेची आगपाखड

गेल्या काही दिवसांपासून कंगनाविरुद्ध शिवसेना असे ट्विटर युद्ध सुरू आहे. मात्र कंगनाने विरोधाची खालची पातळी गाठल्यामुळे समाजातील सर्व स्तरांतून तिचा निषेध केला जात आहे. मुंबई, मुंबई पोलीस, महाराष्ट्र सरकार आणि शिवसेनेवर टीका करताना कंगनाचा हा विरोध नसून थयथयाट असल्याचे दिसत आहे.सुशांत सिंह राजपूतच्या संशयास्पद मृत्यूनंतर त्याचा तपास योग्य होत नसल्यावरून कंगनाने आधी मुंबई पोलिसांवर टीका केली होती. त्यापासून हे प्रकरण तापायला सुरुवात झाली. सुशांतची आत्महत्या नसून हत्याच आहे, असे सांगतानाच मुंबई पोलिसांवर तिने अनेक गंभीर आरोप केले. मुंबई पोलिसांची आपल्याला सातत्याने भीती वाटत असल्याचे तिने सांगितलं. यावरून खासदार संजय राऊत यांनी ज्या लोकांना मुंबईची इतकी भीती वाटते त्यांनी मुंबईत येऊ नये असे विधान केले.

याच विधानाचा विपरित अर्थ घेत त्याला धमकी ठरवून कंगनाने मुंबईला पाकव्याप्त काश्मीरची उपमा दिली. जी मुंबईसह महाराष्ट्राच्या जिव्हारी लागली. त्यावर अनेक मराठी, हिंदी, कलाकार ट्विटरवर व्यक्त झाले. यात सोनू सूद, रेणुका शहाणे, सई ताम्हणकर, सुबोध भावे, सायली संजीव, शेखर फडके, मंगेश देसाई, समीर विद्वांस आदी अनेक कलाकारांचा समावेश आहे. अनेकांनी मुंबई आपल्याला प्रिय असल्याचे यात म्हटले आहे. नेटकऱ्यांनी मात्र कंगनाच्या या वक्तव्याचा यथेच्छ समाचार घेतला. तर भाजप समर्थकांनी कंगनाला पाठिंबा दिला. भाजप समर्थक आणि मुंबईप्रेमी आमनेसामने भिडल्याचं चित्र यात दिसत होते. भाजप नेते राम कदम यांनी कंगनाला झाशीची राणी म्हटले होते. यावरूनही शिवसेनेने राम कदम यांचा समाचार घेतला आहे. ईशान्य मुंबई महिला आघाडीच्या वतीने राम कदम यांच्या घरासमोर निदर्शने करण्यात आली आहेत.

असे असतानाच शुक्रवारी कंगनाने आणखी एक ठिणगी टाकली. मला मुंबईला येण्यावरून धमकावले जात आहे. आता तर मी मुंबईत येणारच. येत्या आठवड्यात ९ सप्टेंबरला मी मुंबईला येणार आहे. वेळ मी कळवेनच. कुणाच्या बापाची हिंमत असेल तर त्यांनी मला रोखून दाखवावे असे आव्हान तिने दिले आहे.

यावर मुंबई मराठी माणसाच्या बापाचीच आहे. ज्यांना हे मान्य नसेल त्यांनी त्यांचा बाप दाखवावा. शिवसेना अशा महाराष्ट्राच्या दुश्मनांचे श्राद्ध घातल्याशिवाय राहणार नाही. हे वचन, अशी टीका करत संजय राऊत यांनी ट्विटरवरून कंगनावर निशाणा साधला आहे. त्यामुळे हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## लोकल बंद असल्यामुळे मुंबईकरांचे हाल

अशा वेळी छत्रपती शिवाजी टर्मिनस येथील बेस्ट बसस्टॉप वर मोठ्या प्रमाणात गर्दी होते आणि या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आझाद मैदान पोलीस या ठिकाणी तैनात करण्यात आलेले आहेत. तर संध्याकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत सीएसटी स्थानक परिसरातून जाणाऱ्या बसेसमध्ये गर्दीच गर्दी असते. सीएसटी ते भायखळा हा अर्धा तासाचा प्रवास आहे. परंतु, अनलॉक प्रक्रिया सुरू असून अत्यावश्यक कर्मचाऱ्यांना वगळता इतर प्रवाशांना लोकलने प्रवास करण्यास बंदी असल्यामुळे चार तासांचा प्रवास करावा लागत आहे.

छत्रपती शिवाजी टर्मिनस येथून बस सुटल्यानंतर ती क्रॉफर्ड मार्केट याठिकाणी येईपर्यंत अर्धातास निघून गेलेला असतो. तर पुढे आल्यानंतर ती बस उड्डाणपुलाखाली दोन ते अडीच तास ट्राफिकमध्ये अडकते. तसेच पुढे जेजे उड्डाणपुलानंतर नागपाडा सिग्नल ते भायखळा हा प्रवास सुरू होतो. मात्र, तोही वाहतूक कोंडीतच सुरू होतो. आधीच कोरोना आजारामुळे तोंडावर माक्स घातलेला असतो. त्यातच मुंबईचे तापमान वाढत असल्यामुळे शरीर घामाघूम होते. बेस्ट बसमध्ये होणारी गर्दी आणि त्यातून कसाबसा मार्ग काढून प्रवास करावा लागत आहे. अर्ध्या तासाच्या प्रवासाला चार तास लागत असल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. त्याचप्रमाणे एका सीटवर एक प्रवासी असा जो नियम बेस्टमध्ये सुरू आहे. त्यामुळे उभे राहून प्रवास करणाऱ्या प्रवासी तीन ते चार तास ताटकळत प्रवास करत असतात. जर सीएसटी ते भायखळा दरम्यान प्रवासाला चार तास लागत असतील. तर पुढे सीएसटी ते मानखुर्द या प्रवासाला किती तास लागत असतील याची कल्पना करणे अवघड आहे.

## एक तासात ५० गुणांची परीक्षा

यावर चर्चा करून त्याची माहिती ७ सप्टेंबरपर्यंत सरकारला देत परीक्षेचे वेळापत्रक व अभ्यासक्रम तातडीने जाहीर करावी, अशी सूचना सरकारकडून देण्यात आली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देताना तंत्रज्ञानावर अधिकाधिक भर देत लेखी परीक्षांसाठी एमसीक्यू, असाईमेंट किंवा ओपन बूकचे पर्याय उपलब्ध करून देताना प्रात्याक्षिक परीक्षा स्कायपे सारख्या मिटींग ॲप किंवा टेलिफोनिक पद्धतीने घेण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठांनी स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन परीक्षा घेण्यात अडचण असल्यास त्याची माहिती तातडीने सरकारला कळवावी, जेणेकरून परीक्षा पुढे ढकलण्यासंदर्भात यूजीसीला कळवून मुदतवाढ घेण्यात येईल, असेही सामंत यांनी यावेळी सांगितले.

## विधानसभेचे अध्यक्ष नाना पटोले यांना कोरोना

ज्या आमदाराची कोरोना चाचणी पॉझिटिव्ह येईल त्यांना सभागृहात प्रवेश दिला जाणार नसल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी म्हणजे ६ सप्टेंबर रोजी सर्व सदस्यांची कोविड-१९साठीची ‘आरटीपीसीआर’ तपासणी करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला. ज्या सदस्यांची कोविड चाचणी निगेटिव्ह असलेल्या सदस्यांनाच सभागृहात प्रवेश दिला जाणार आहे. सोशल डिस्टन्सिंगचे पालन करण्यासाठी सदस्यांची बसण्याची व्यवस्था आवश्यकतेप्रमाणे सभागृहाच्या प्रेक्षक आणि विद्यार्थी गॅलरीमध्येही करण्यात येणार आहे. सुरक्षिततेचा उपाय म्हणून प्रत्येक सदस्याला सुरक्षा किट देण्यात येणार आहे. या किटमध्ये फेस शील्ड, मास्क, हॅण्ड ग्लोव्हज, सॅनिटायझर आदी वस्तूंचा समावेश असेल.

सदस्यांच्या स्वीय सहायकांना विधानमंडळात प्रवेश दिला जाणार नाही. मात्र, स्वीय सहायकांची आणि सदस्यांच्या वाहनचालकांची बसण्याची तसेच अल्पोपहार आदी व्यवस्था विधानमंडळ परिसरात तंबू (टेन्ट) टाकून करण्यात येईल. सहव्याधी असलेल्या (कोमॉर्बिडीटी) सदस्यांना काळजी घेण्याबाबतची सूचना संबंधित पक्षाच्या गटनेत्यांकडून दिली जाणार आहे.

## पुण्याच्या ‘पाटील इन्फ्रास्ट्रक्चर’ कंपनीच्या एमडी सह दोघांवर गुन्हा दाखल

दरम्यान, ११ऑगस्ट २०२० रोजी पाटील इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनीचे व्यवसाय विकासक अधिकारी संजय दाशेटवार यांनी भारत सरकारचे रस्ते दळणवळण व महामार्ग मंत्रालयाचे मुख्य अभियंता व प्रादेशिक अधिकारी अंशुमाली श्रीवास्तव यांच्या व्हॉट्सॲपवर अमित कुमार घोष, सह सचिव, रस्ते दळणवळण व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार आणि संजय गर्ग, मुख्य अभियंता, रस्ते दळणवळण व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या नावांची दोन पत्र पाठवली होती.

सदर एका पत्रामध्ये पाटील इन्फ्रास्ट्क्चर लि. सोबत रद्द करण्यात आलेल्या नमुद तीन प्रकल्पांविषयी भारत सरकारचे रस्ते दळणवळण व महामार्ग मंत्रालयाने घेतलेल्या निर्णयासंबंधाने पुनर्विचार करण्यासाठी कमिटी स्थापन करण्यासाठी सांगितले असल्याचे नमुद करण्यात आलेले होते. तसेच दुसऱ्या संजय गर्ग यांच्या पत्रात माझे अध्यक्षतेखाली एक कमिटी स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून सदरची कमिटी ही पाटील इन्फ्रास्टक्चर प्रा.लि.यांचा करार संपुष्टात आणण्याचा निर्णय योग्य आहे अगर नाही याविषयी अहवाल सादर करणार असल्याचे नमुद करण्यात आले होते. अंशुमाली श्रीवास्तव यांनी तात्काळ ही दोन्ही पत्र पडताळणीसाठी दिल्ली येथे महाराष्ट्र विभागाचे काम पाहणारे मुख्य अभियंता यांच्याकडे पाठवण्यात आली होती. दिल्लीतील मुख्य अभियंता यांनी संबंधित पत्राची फाईल संबंधित अधिकारी संजय गर्ग आणि सचिव अमितकुमार घोष यांच्याकडे पाठवली असता त्यांनी खात्री करून आपण असे पत्र तयार करून पाठवलेले नसल्याचे संबंधित अधिकारी यांनी सांगितले, तसेच ही दोन्ही पत्रे व त्यावरील स्वाक्षरी बनावट असल्याचे सांगण्यात आले. तात्काळ या खोट्या पत्रांसंबंधी कार्यवाही करण्यात यावी असे भारत सरकारचे रस्ते दळणवळण व महामार्ग मंत्रालय यांच्याकडून कळवण्यात आले.

खोटा दस्तऐवज तयार करून रद्द करण्यात आलेले कंत्राट पुन्हा सुरू करण्यासाठी पाटील इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीचे महाव्यवस्थापक एम.बी.पाटील आणि कंपनीचे व्यवसाय विकासक अधिकारी संजय दाशेटवार यांच्याकडून तयार करण्यात आलेल्या बनावट दस्तऐवज प्रकरणी भारत सरकारचे रस्ते दळणवळण व महामार्ग मंत्रालयाचे मुख्य अभियंता व प्रादेशिक अधिकारी अंशुमाली श्रीवास्तव यांनी ३० ऑगस्ट रोजी सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी पाटील इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीचे महाव्यवस्थापक एम.बी.पाटील आणि कंपनीचे व्यवसाय विकासक अधिकारी संजय दाशेटवार यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४२० (फसवणूक), ४६५,४६७,४६८ (बोगस दस्तऐवज तयार करणे) ४७१,४७४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (ड) (अ) ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनकर मोहिते यांनी आपलं महानगरला दिली. तसेच बनावट दस्तऐवज तपासणीसाठी पाठवण्यात आलेले असून त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल, असेही मोहिते यांनी सांगितले. याबाबत पाटील इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही, तसेच कंपनीचे महाव्यवस्थापक एम.बी. पाटील आणि विकासक अधिकारी दाशेटवार यांचे मोबाईल फोन बंद असल्याकारणाने त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

# निजामपूरच्या जेटीएल कंपनीचे सांडपाणी नदी पात्रात

## ग्रामपंचायतची नोटीस, ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

**राम भोस्तेकर ● माणगाव**

माणगाव तालुक्यातील निजामपूर ग्रामपंचायत हद्दीतील कोस्ते बुद्रुक गावाजवळ असलेल्या जेटीएल कंपनीचा अंदाधुदी कारभार जनतेसमोर उघड झाला असून, दीड ते दोन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या कंपनीत जीआय पाइपचा प्लांट असून, त्यातून रसायनमिश्रित सांडपाणी थेट काळ नदी पात्रात राजरोसपणे सोडण्यात येत आहे.



ही कंपनी सुरू झाली तेव्हा ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला होता. मात्र थोड्याच दिवसांत कंपनीने आपले खरे रुप उघड केले आहे. विषेश म्हणजे या नदीवर आसपासच्या तीन गावांच्या नळपाणी योजना जँकवेल असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आल्याचे नागरिकांकडुन समजते आहे. या कंपनी विरोधात जनहित याचिका तसेच प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे तक्रार करुनही कंपनीचे वरीष्ठ अधिकारी शर्मा व सगळ्यांचा मनमानी कारभार चालला असल्याचे प्रतिपादनदेखील गांवचे सरपंच राजाभाऊ रणपिसे यांनी केले आहे व ह्या कंपनीचा GI प्लांट बंद करण्यात यावा याकरिता संबधित खात्याकडे निवेदन दिले असल्याचे सरपंच राजाभाऊ रणपिसे यांनी प्रस्तुत वार्ताहराशी बोलताना सांगितले.

पाण्याचे प्रदूषण करणारी कंपनी चालू ठेवण्यासाठी कोणचा राजकीय वरदहस्त असेल किंवा शासकीय अधिकारी मदत करीत असतील तर प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणीदेखील रणपिसे यांनी केली आहे.

**हे दैनिक मुद्रक-प्रकाशक संजय भास्कर सावंत यांनी मालक अक्षर कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याकरीता दांगट मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, विष्णूनगर, दिघा, नवी मुंबई ४००७०८ येथे छापून अक्षर कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, ७-८, पांडुरंग बिल्डिंग, १७८, एल. जे. रोड, माहिम (पश्चिम), मुंबई ४०००१६. येथून प्रकाशित केले. **संपादक - संजय भास्कर सावंत ✻ निवासी संपादक- संतोष दिगंबर माळकर** (कायदेशीर बाबींसाठी न्यायालयीन क्षेत्र मुंबई) दूरध्वनी ०२२२४४४६००५/६/७/८. ई-मेल : connect@mymahanagar.com, R.N.I.Reg.No.४९८०२/१९९० "Aapla Mahanagar Mumbai (✻%पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) **अक्षर कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड.** सर्व हक्क सुरक्षित.लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुन:प्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

## अर्थव्यवस्था लवकरच रुळावर येईल

**नवी दिल्ली●** अनुराग ठाकूर यांनी लॉकडाऊनमुळे उद्भवलेल्या अर्थव्यवस्थेपुढे उभ्या राहिलेल्या आव्हानांचा विस्ताराने आढावा घेत केंद्र सरकारने आत्मनिर्भर अभियान व गरीब कल्याण पॅकेजच्या माध्यमातून केलेल्या उपाययोजनांचीही माहिती दिली. अर्थव्यवस्थेचा मुख्य घटक असलेल्या मध्यम, सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या मदतीसाठी या क्षेत्रातील उद्योगांनी घेतलेल्या कर्जाच्या २० टक्के रक्कम खेळते भांडवल म्हणून उपलब्ध करून दिली आहे. या योजनेद्वारे १ लाख ११ हजार कोटी रूपये उद्योजकांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. या योजनेद्वारे ३ लाख कोटी रु. वितरीत करण्यात येणार आहेत.

# सरकारने भीक मागण्याची परवानगी द्यावी

## पाच महिने वेतन नसल्याने दिव्यांग शाळांमधील शिक्षकांचा उद्रेक

विनायक डिगे ● मुंबई
dvinayak@mymahanagar.com

सरकारकडून पाच महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने दोन वेळचे जेवण मिळणे मुश्किल झाले आहे. त्यातच विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिकवण्यासाठी डेटा पॅक, विजेचे बिल, घरखर्च भागवणे मुश्किल झाले आहे. सरकारकडून कोणतीही आर्थिक मदत केली जात नसल्याने आता आमच्यावर भीक मागण्याची वेळ आली आहे. सरकार वेतन देऊ शकत नसेल तर त्यांनी भीक मागण्याची परवानगी द्यावी, असा संताप दिव्यांग शाळेतील शिक्षकांनी व्यक्त करण्यात येत आहे.

यंदाचा शिक्षक दिन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षकांच्या आयुष्यात अंधार घेऊन आला आहे. पाच महिने मुंबई उपनगर, सातारा, चंद्रपूर, नाशिक, नगरमधील शिक्षकांना पगार मिळाला नाही. मुंबई शहर व उपनगरामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी तब्बल ५२ अनुदानित शाळा आहेत. या सर्व शाळांमध्ये मिळून तब्बल १२५० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत. कोरोनामुळे या कर्मचाऱ्यांना एप्रिलपासून वेतनच मिळाले नाही. पाच महिन्यांपासून वेतन नसल्याने घरखर्च कसा चालवायचा असा प्रश्न शिक्षकांसमोर निर्माण झाला आहे. भरमसाठ वीज बिल, १५ जूनपासून सुरू झालेल्या ऑनलाईन शिक्षणासाठी नेट पॅक, किराणा माल, वैद्यकीय खर्च, विमा हप्ता, कर्जाचे हप्ते अशा अनेक बाबींचा दिव्यांग शाळेच्या शिक्षकांना वेतनाशिवाय सामना करावा लागत आहे. शिक्षकांकडून वेतनासंदर्भात न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. त्यामुळे वेतन कधी मिळणार असा प्रश्न शिक्षकांना पडला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षकांना सरकारकडून देण्यात येत असलेली वागणूक पाहता आम्हाला वेतन देता येत नसेल तर सरकारने आम्हाला भीक मागण्याची परवानगी द्यावी, असा उद्रेक शिक्षकांमधून व्यक्त होत आहे.

> “ वेतन नसल्यामुळे शिक्षक आर्थिक समस्येबरोबरच प्रचंड मानसिक तणावाखाली वावरत आहेत. दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात शिकवण्यात अडचणी येत असताना ऑनलाईन शिकवणे हे दिव्यच ठरत आहे. ऑनलाईन शिकवण्यासाठी इंटरनेट डेटा अपुरा पडत आहे. त्यासाठी वारंवार नेट पॅक घ्यावा लागतो. हा भुर्दंड शिक्षकांना डोईजड ठरत आहे.
>
> – **सुचेता सोमण**, शिक्षिका

> “ सर्वसामान्य परिस्थिती बिकट असताना दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी कोणत्याही सुविधा सरकारकडून दिल्या जात नाहीत. लॉकडाऊनमध्ये अनेक विद्यार्थ्यांचेही हाल होत होते. सामाजिक बांधिलकी जपत अनेक विद्यार्थ्यांना धान्य, औषध उपलब्ध करून देतात. पण पाच महिन्यांचे वेतन न मिळाल्याने विद्यार्थ्यांना मदत करणे शक्य होत नाही.
>
> – **भाग्यश्री वर्तक**, शिक्षिका

घाटकोपर येथे राहणारे शिक्षक अनिल काळे हे दिव्यांग आहेत. त्यांची ९५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेली आई अंथरुणाला खिळलेली आहे. सलग पाच महिने वेतन न मिळाल्याने घरखर्च चालवणे व आईचा वैद्यकीय खर्च भागवणे त्यांना मुश्किल झाले आहे. वेतनाअभावी मुंबईमध्ये कसे राहायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षकांचा सन्मान सरकारकडून राखला जात नाही. आत्महत्या करणे पाप आहे, ही शिकवण आम्ही विद्यार्थ्यांना देतो त्याचे आचरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे आत्महत्येऐवजी भीक मागणे हाच पर्याय आमच्या समोर आहे. सरकारने आम्हाला भीक मागण्याची परवानगी द्यावी अशी हतबलता शिक्षक अनिल काळे यांनी व्यक्त केली.

१५ जूनपासून आम्ही विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिकवतो आहोत. माझी मुलगी दहावीला आहे तर मुलगा पाचवीला आहे. त्यांचेही ऑनलाइन वर्ग सुरू असतात. त्यासाठी मोबाईल लागतात. हा खर्च भागवायचा कसा असा प्रश्न पल्लवी हळदणकर या शिक्षिकेने उपस्थित केला. घरखर्चाचे नियोजन करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. घराचे हप्ते, मुलांच्या शाळेचे शुल्क, आजारपण, घरातील वृद्ध व्यक्तींची काळजी घेणे, नेट पॅकेज या सर्व अत्यावश्यक गोष्टींसाठी लागणारा पैसा कसा उभा करायचा? बँकेतील गुंतवणूक संपायला आली आहे. कोणापुढे हात पसरणे म्हणजे स्वाभिमान डिवचला जातो, असे म्हणणे प्रीती पोतदार, मधुरा जोशी आणि सुनीता चिंधरकर या शिक्षकांनी मांडले. मुलीला उत्तम कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला परंतु वेतन नसल्याने कॉलेजचे शुल्क भरण्यासाठी पैसे कमी पडत असल्याने मुलींना अन्य कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा लागत असल्याची व्यथा शिक्षिका कल्पना इंदप यांनी मांडली.

# दिल्ली-अहमदाबाद बुलेट ट्रेनकरिता निविदा मागविल्या

प्रतिनिधी ● मुंबई

देशात कोरोनाचे संकट असले तरी भारतीय रेल्वेचा सर्वात महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या बुलेट ट्रेनला उशीर होणार नसल्याचे सांगण्यात येत आहे. तर दुसरीकडे दिल्ली ते अहमदाबाद मार्गावर हाय स्पीड ट्रेन चालविण्यासाठी नॅशनल हाई स्पीड रेल्वे महामंडळाने सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी निविदा मागविल्या आहेत. तसेच दिल्ली- वाराणसी, मुंबई-नागपुर,चैन्नई-मैसुर,दिल्ली-अमृतसर, मुंबई-हैद्राबाद, वाराणसी-हावडा या मार्गाचे देखील अहवाल तयार केले जाणार आहेत.



भारतीय रेल्वेने हायस्पीड आणि सेमी हाय स्पीड रेल कॉरिडॉर करिता सात नविन मार्ग निवडले आहेत. हायस्पीड रेल्वे मार्गासह एक्सप्रेस वे किंवा हायवे विकसित करण्याचेही नियोजन केले जात आहे. हायस्पीड कॉरिडॉर वर ट्रेन ३०० किमी प्रतितास वेगाने धावु शकतात, तर सेमी हाय स्पीड कॉरिडॉर वर १६०किमी प्रतितास वेगाने गाड्या धावतील.

दिल्ली ते अहमदाबाद या ८८६ किलोमीटरच्या मार्गावर बुलेट ट्रेन चालविण्यासाठी अहवाल तयार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. या निविदा २८ सप्टेंबर पर्यत सादर करायच्या आहेत. याशिवाय ईतर सात मार्ग निवडले आहेत, त्यामध्ये दिल्ली-नोएडा-आग्रा-लखनऊ-वाराणसी (८६५ किमी), दिल्ली-जयपुर-उदयपुर-अहमदाबाद (८८६किमी) यांचा समावेश आहे. तर दुसऱ्या कॉरिडॉर मार्गामध्ये मुंबई -नाशिक-नागपुर (७५३ किमी), मुंबई-पुणे-हैद्राबाद (७११ किमी), चैन्नई-बंगळुरु-म्हैसुर (४३५किमी), दिल्ली-चंदगड-लुधियाना-जालंधर-अमृतसर (४५९ किमी) यांचा समावेश आहे.

## थोडक्यात

### तरुणाची हत्या करणाऱ्यास अटक

**मुंबई●** आर्थिक वादातून नकी सईद खान (वय १९) तरुणाची हत्या करून फरारी झालेल्या शब्बीर शेख याला ऑन्टॉप हिल पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला लोकल कोर्टाने पोलीस कोठडी सुनावली. नकी खानने काही दिवसांपूर्वी शब्बीरकडून वाढदिवसाचा केक कापण्यासाठी शोभेची तलवार घेतली होती. ही तलवार त्याच्याकडून चोरीस गेली होती. त्यावरुन नकी आणि शब्बीर यांच्यात वाद सुरु होता. तलवार दे नाहीतर तलवारीचे पैसे द्यावे असा तगादा शब्बीरने लावला. गुरुवारी रात्री पावणेनऊ वाजता नकी हा मुस्तकीन या मित्रासोबत उभा असताना तिथे आलेल्या शब्बीरमुळे दोघांमध्ये वाद झाला. यावेळी शब्बीरने नकीवर चाकूने वार केले. या हल्ल्यात नकी आणि मुस्तकीन हे जखमी झाले होते. नकीला डॉक्टरांनी मृत घोषित केले. गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत राजे यांच्या पथकाने पळून गेलेल्या शब्बीर शेख याला गुन्ह्यांतील चाकूसह अटक केली.

### बोगस गुणपत्रिका-प्रमाणपत्रांची विक्री करणाऱ्यांना अटक

**मुंबई●** बोगस गुणपत्रिका आणि प्रमाणपत्राची विक्री करणाऱ्या एका दुकलीस गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. मुनावर अहमद सय्यद आणि हासमुद्दीन खैरुद्दीन शहा अशी या दोघांची नावे आहेत. अटकेनंतर या दोघांनाही लोकल कोर्टाने सोमवार ७ सप्टेंबरपर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे. प्राथमिक तपासात ही टोळी दोन ते पंधरा हजार रुपयांमध्ये संबंधित बोगस गुणपत्रिका आणि प्रमाणपत्रांची विक्री करीत असल्याचे उघडकीस आले आहे. मुंबई शहरात भारतातील विविध शासकीय विभागीय मंडळे, विद्यापीठाची बोगस गुणपत्रिका आणि प्रमाणपत्रे विक्री करणारी एक टोळी सक्रिय असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. या माहितीनंतर पोलिसांनी पाळत ठेऊन बोगस गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र देताना मुनावर सय्यद आणि हासमुद्दीन शहा या दोघांना अटक केली.

### पूर्ववैमनस्यातून तरुणाची हत्या

**मुंबई●** पूर्ववैमनस्यातून उत्कर्ष विनायक धुमाळ या २१ वर्षांच्या तरुणाची तिक्ष्ण हत्याराने भोसकून हत्या केल्याची घटना चेंबूर परिसरात घडली. पळून जाताना मारेकऱ्यांनी त्याच्याकडील मोबाईल आणि बाईक असा सुमारे तीन लाख रुपयांचा मुद्देमाल पळविला. याप्रकरणी चेंबूर पोलिसांनी हत्येसह अन्य भादवी कलमांतर्गत गुन्हा नोंदविला असून रात्री उशिरा दोन संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. मृत तरुण आणि आरोपी एकमेकांच्या परिचित असून जुन्या वादातून ही हत्या झाल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शालिनी शर्मा यांनी सांगितले. ही घटना गुरुवारी रात्री उशिरा चेंबूर येथील पोस्टल कॉलनीमध्ये घडली. याच सोसायटीच्या इमारत क्रमांक तीन, रुम क्रमांक ६११ मध्ये तक्रारदार तरुण राहतो, गुरुवारी रात्री दोन वाजता तिथे काही तरुण शिरले. या तरुणांनी जुन्या वादातून उत्कर्षवर तलवारीने वार केले. या हल्ल्यात उत्कर्षचा मृत्यू झाला. याप्रकरणी चेंबूर पोलिसांनी दोन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची पोलिसांकडून कसून चौकशी सुरु आहे. इतर आरोपींच्या अटकेसाठी आता पोलिसांनी विशेष शोधमोहीम सुरु केली आहे.

### राज्यात २ हजार ६९१ कोरोनाबाधित पोलिसांवर उपचार सुरु

**मुंबई●** राज्यात सध्या २ हजार ६९१ कोरोनाबाधित पोलिसांवर विविध रुग्णालयात उपचार सुरु असून गुरुवारी दिवसभरात २७४ पोलीस कोरोनामुक्त झाले तर १२८ पोलिसांना कोरोनाची लागण झाली होती. एका पोलीस अंमलदाराचा मृत्यू झाल्याने कोरोनामुळे मृत्यू झालेल्या पोलिसांची १६४ झाल्याचे पोलिसांनी सांगितले. गुरुवारी रात्री उशिरापर्यंत राज्यात १६ हजार १४३ पोलिसांना कोरोनाची लागण झाल्याची नोंद झाली होती, त्यात १ हजार ७५२ पोलीस अधिकारी तर १४ हजार ३९१ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता. गुरुवारी १२८ पोलिसांना कोरोन

# मध्य, पश्चिम रेल्वेचा रविवारी मेगाब्लॉक

खास प्रतिनिधी ● मुंबई

उपनगरीय रेल्वे मार्गावर रेल्वे रुळांची दुरुस्ती आणि तांत्रिक कामांसाठी मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गांवर रविवारी ६ सप्टेंबर रोजी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. तसेच पश्मि रेल्वेवरसुद्धा माहीम ते सांताक्रूझ दरम्यान मेगाब्लॉक असणार आहे. तर हार्बर मार्गावर मेगाब्लॉक नसणार आहे. त्यामुळे हार्बर मार्गावरील प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

मध्य रेल्वेच्या मुख्या मार्गांवर माटुंगा-मुलुंड अप व डाऊन जलद मार्गांवर सकाळी १० ते दुपारी ३ वाजेंपर्यंत रविवारी मेगाब्लॉक असणार आहे. परिणामी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी ९.३० ते दुपारी २.३० या वेळेत सुटणाऱ्या डाऊन जलद विशेष सेवा निर्धारित थांब्यावर थांबत माटुंगा येथे डाऊन धीम्या मार्गावर वळविण्यात येतील व त्यानंतर मुलुंड येथे डाऊन जलद मार्गावर पुन्हा वळविण्यात येतील आणि संबंधित गाड्यांच्या वेळापत्रकांनुसार थांबविण्यात येणार आहेत. तसेच सकाळी ९ वाजून २८ मिनिटांनी ते दुपारी २ वाजून २६ मिनिटांनी या वेळेत ठाणे येथून सुटणाऱ्या जलद विशेष सेवा मुलुंड येथे अप धीम्या मार्गावर वळविण्यात येतील व पुढे माटुंगा येथे अप जलद मार्गावर पुन्हा वळविण्यात येतील व संबंधित गाड्या निर्धारित थांब्यावर थांबतील. तसेच येत्या रविवारी हार्बर मार्गावार कसलाही मेगाब्लॉक नसणार आहे. अशी माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली आहे.

# मिठी नदीचे पाणी होणार स्वच्छ

## एमएमआरडीए १८ महिन्यांचा प्रकल्प राबविणार

खास प्रतिनिधी ● मुंबई

जैव अभियांत्रिकी तंत्रज्ञानाद्वारे दूषित मिठी नदी स्वच्छ करण्यासाठी एमएमआरडीएने पुढाकार घेतला आहे. जैविक अभियांत्रिकीचे घटक असलेल्या बायोमेरेडिएशन आणि फायटोरेमेडिएशन यांचा वापर करून मिठी नदीतील पाण्याची गुणवत्ता सुधारणे हा प्रकल्पाचा उद्देश आहे. या प्रकल्पाअंतर्गत सूक्ष्मजीव तंत्र वापरून शाश्वत वनस्पतींच्या माध्यमातून पाणी स्वच्छ करून आणि दुर्गंधमुक्त वातावरण निर्मिती करण्यात येणार आहे. यामुळे आरोग्यासाठी असलेला धोका कमी करणे शक्य होईल. तसेच मिठी नदीचे पाणी स्वच्छ होऊ शकेल. हा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी अर्थ ५ आणि एम.एम.आर.डी.ए. यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या सामंजस्य करारावर महाराष्ट्र राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे आणि परिवहन मंत्री अनिल परब यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

### असे आहे प्रकल्पाचे तंत्रज्ञान

कचरा गोळा करण्याच्या सूत्रावर हे तंत्रज्ञान आधारीत आहे. सोल्यूशन कॉन्सन्ट्रेशन मॉड्युल्स हे पाण्याच्या प्रवाहावर चलित आहेत. नदीतून कचरा गोळा केल्यावर तो मॉड्युल्समध्ये पुरविला जाणार आहे. हा कचरा कन्वेयर बेल्टवर जाईल. जिथे पाण्यामधून प्लास्टिक काढले जाईल. या कन्वेयर बेल्टला वीज पुरवठा पाण्याद्वारे चालणाऱ्या झोतयंत्रामुळे मिळेल. या प्रकल्पासाठी एकूण १८ महिन्यांचा कालावधी लागणे अपेक्षित आहे. त्यामध्ये सामंजस्य करार, शहरात जनजागृती कार्यक्रम राबवणे आणि १०० किलो प्लास्टिक गोळा करून त्याचे विश्लेषण करणे आणि नदी स्वच्छ करण्याकरिता यंत्रसामुग्रीची उभारणी करणे यासाठी ६ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. तर उर्वरीत अकरा महिन्यांमध्ये ५० टन प्रतिदिन क्षमतेचे नदी स्वच्छ करणारी यंत्रसामुग्री चालविणे आणि नदीतून उचललेल्या कचऱ्याची माहिती गोळा करून त्याचे विश्लेषण करणे हे काम अपेक्षित आहे. या प्रकल्पाला हुतामाकी या फिनिश आणि आघाडीच्या ग्राहक पॅकेजिंग कंपनीकडून ६ कोटी रूपये इतक्या रकमेचे अर्थसहाय्य दिले जाणार आहे.

मिठी नदीच्या प्रवाहाचा ६ किमी लांबीचा भाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिपत्यात आहे. एमएमआरडीएच्या अधिपत्याखाली मिठी नदी विकास कामे करण्याची जबाबदारी आहे. मिठी नदी स्वच्छ करण्याच्या प्रकल्पासाठी एमएमआरडीएला मरीन डेब्रीज पार्टनरशिपकडून प्रस्ताव सादर झाला होता. या प्रकल्पात माहिती मिळवण्यासाठी ड्रोन सर्वेक्षणाचा आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स टूल्सचा वापर करण्यात येणार आहे.

# हात प्रत्यारोपणानंतर मोनिकाच्या प्रकृतीत सुधारणा

प्रतिनिधी ● मुंबई

घाटकोपर रेल्वे अपघातात हात गमावलेल्या मुंबईतील २४ वर्षीय मोनिकावर दोन्ही हातांचे प्रत्यारोपण सात दिवसांपूर्वी करण्यात आले आहे. हे प्रत्यारोपण झाल्यानंतर मोनिकाच्या प्रकृतीत आता सुधारणा होत असून, तिला आणखी एक आठवडा आयसीयूमध्ये ठेवण्यात येणार आहे. मुंबईतील ही पहिलीच हात प्रत्यारोपण शस्त्रक्रिया आहे.




परळ येथील ग्लोबल हॉस्पिटलमध्ये मोनिकाच्या दोन्ही हातांवर २८ ऑगस्टला प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेला सात दिवस पूर्ण झाले असून मोनिकाच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत आहे. मोनिकावर सध्या अतिदक्षता विभागात डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. आणखीन एक आठवडा तिला आयसीयूमध्ये ठेवले जाईल. आवश्यकतेनुसार तिला सर्व औषधोपचार दिले जात असून ती उपचारांना चांगला प्रतिसाद देत आहे. आहाराचेही ती योग्य पद्धतीने सेवन करत आहे. याशिवाय आयसीयूमध्ये ती आधार घेऊन चालण्याचाही प्रयत्न करत आहे. काही दिवसांनी हातांची क्रिया सुरळीत व्हावी, यासाठी तिला फिजिओथेरपी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती ग्लोबल हॉस्पिटलमधील कन्सल्टंट प्लॅस्टिक हॅण्ड अँड रिकन्स्ट्रक्टिव्ह मायक्रोसर्जन डॉ. निलेश सातभाई यांनी दिली.




गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर पत्रा चाळ संघर्ष समितीने शुक्रवारी वांद्रे येथील म्हाडा कार्यालयाबाहेर जोरदार आंदोलन केले. ११ वर्षे रखडलो आणखी किती रखडणार, आमची घरे लवकर द्या असा नारा लावत नागरिकांनी निषेध केला. (छाया– दीपक साळवी)

### मिठीबाई कॉलेजचे प्राचार्य राजपाल हांडे यांचे निधन

**मुंबई●** मुंबई विद्यापीठाचे कॉलेज व विद्यापीठ विकास मंडळाचे माजी संचालक आणि मिठीबाई कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांचे गुरुवारी सायंकाळी हृदय विकाराने निधन झाले. ते ६३ वर्षांचे होते. एन्जिओप्लास्टीसाठी त्यांना चार दिवसांपूर्वी मुलुंड येथील फोर्टीज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई, मुलगा व सून असा परिवार आहे.



प्राणीशास्त्र विषयात त्यांनी एमएससी, पीएचडी पूर्ण केली. यानंतर त्यांना ३३ वर्षांचा शिक्षकी पेशाचा अनुभव होता. मुलुंड येथील वझे केळकर कॉलेजमधून त्यांनी विद्यादानास सुरुवात केली. यानंतर त्यांनी के. जे. सोमय्या कॉलेज, ताडदेवमधील एनएसएस कॉलेजच्या प्राचार्य पदाची धुरा सांभाळली होती. मुंबई विद्यापीठातील कॉलेज व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांच्या निधनामुळे शिक्षण क्षेत्रात पोकळी निर्माण झाल्याची भावना अन्य कॉलेजांचे प्राचार्य आणि विद्यापीठ अधिसभा सदस्य यांनी व्यक्त केली.

# एसटीचा हॉटेलला रेड सिग्नल

## आतापर्यंत ४० कोटींचा फटका

### दर महिना होणार ८ कोटींचे नुकसान

नितीन बिनेकर ● मुंबई
bnitin@mymahanagar.com

एसटीच्या प्रवाशांना उत्तम सुविधा मिळण्यासाठी आणि एसटीचा महसूल वाढविण्याकरिता राज्यभरात अधिकृत हॉटेलांमध्ये प्रवाशांसाठी एसटीचा थांबा दिला जातो. हॉटेल मालकांकडून एसटीच्या प्रत्येक फेरीवर थांब्यासाठी एसटी महामंडळाला पैसे मिळत असतात. मात्र, कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे आता एसटीचे हॉटेल थांबे बंद करण्यात आल्यामुळे दर महिन्याला ८ कोटी रुपयांचा फटका एसटी महामंडळाला बसणार आहे. तसेच गेल्या पाच महिन्यांपासून एसटीची प्रवासी वाहतूक बंद असल्याने हॉटेल थांब्यापासून मिळणाऱ्या जवळ जवळ ४० कोटी रुपये



महसूलाचे नुकसान महामंडळाला झाले आहे.

खासगी वाहतुकीच्या तुलनेत एसटी महामंडळाने एसटीच्या प्रवाशांना उत्तम सुविधा देण्यासाठी ३० रुपयांमध्ये चहा-नाश्त्याची योजना सुरू केली होती. त्यासाठी एसटीने राज्यात अधिकृत थांबे निवडले होते. त्याठिकाणी असलेल्या हॉटेलांमध्ये तिकीट दाखवल्यानंतर प्रवाशांना प्रसाधनगृहाची सोय आणि चहा-नाश्त्याची अल्प दरात सेवा मिळत होती. एसटीला प्रत्येक फेरीमागे अधिकृत हॉटेल मालकांकडून ठराविक रक्कम महामंडळाला मिळत होती. त्यामुळे एसटीच्या महसुलात वाढ झाली होती. सोबतच एसटीच्या प्रवाशांना सुद्धा मोठ्या प्रमाणात सुविधा मिळत होती. या हॉटेल थांब्यातून एसटी महामंडळाला दर महिन्याला जवळ जवळ ८ कोटी रुपये महसूल मिळत होते. मात्र, कोरोनामुळे हा महसूल आता बंद झाला आहे. कारण कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाकडून कोरोना प्रतिबंधात्मक नियमावली आखून देण्यात आली आहे. त्यानुसार एसटी बसमध्ये केवळ २२ प्रवासी घेऊन जाण्याची अट घातली आहे. त्यामुळे डिझेलचे पैसे देखील निघत नाहीत. तसेच हॉटेल थांबे सुद्धा बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे एसटीला उत्पन्नाचे स्त्रोत बंद झाल्याने एसटी महामंडळावर आर्थिक संकट आले आहे.

### असा मिळत होता महसूल

एसटी महामंडळाकडून एसटीचा प्रवासादरम्यान ज्या हॉटेलमध्ये थांबा घेतला जात होता त्या हॉटेल चालकांकडून थांबा आकार रक्कम म्हणून व्होल्वोसाठी, शिवशाहीकरिता २७५ रुपये अधिक ५० रुपये जीएसटी असे एकूण ३२५ रुपये आकारले जात होते. तर निमआराम गाड्यांसाठी १६७ रुपये अधिक जीएसटी असे एकूण २०८ रुपये आणि साध्या एसटीसाठी १३२ रुपये अधिक २४ रुपये जीएसटी असे एकूण १५६ रुपये आकारले जात होते. मात्र, कोरोना काळात आता हा थांबा काढून टाकण्यात आल्याने एसटीला मोठा आर्थिक फटका बसणार आहे.

आपलं महानगर

# लडाखमधील अटळ युद्धसज्जता

लडाखमध्ये परिस्थिती गंभीर आहे. चीन सैन्याकडून वारंवार घुसखोरीचा प्रयत्न होत आहे. मात्र, यावेळी भारतीय लष्करही सतर्क असून काही दिवसांपूर्वी चीनने पँगॉग भागात केलेल्या घुसखोरीला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिले आहे. लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी लडाखमध्ये परिस्थिती गंभीर असल्याचे म्हटले आहे. चीन आपल्यापेक्षा बलाढ्य आहे, त्याचे सैन्य आणि त्याच्याकडील पैसा, उद्योग व्यवसाय याच्या भारत पासरीलाही पुरणार नाही. असा चीन वारंवार लडाखमध्ये खुशाल सीमा ओलांडून आत येतो. अक्साई चीन - पाकव्याप्त काश्मीर या भारताच्या प्रदेशातून रस्ते, रेल्वे बांधतो. सीमाप्रश्न उकरून काढतो. भारत-पाक विवादामध्ये पाकच्या बाजूने उभा राहतो. आपल्याकडील पोतीभर माल दिडक्या किमतीला बाजारपेठेत टाकून भारतीय मालाशी स्पर्धा करतो जेणेकरून इथले व्यावसायिक बरबाद होतील आणि कारखाने कायमचे बंद होतील अशा तऱ्हेने डावपेच आखतो, असे साधारण चित्र आपल्यासमोर आहे. वारंवार कुरापती काढणाऱ्या चीनचे करायचे काय, असा प्रश्न मात्र आपल्याला सतावतो आणि त्याचे समाधानपूर्वक उत्तर मिळत नाही.

चीनच्या दांडगाईचे गुपित त्याच्या भौगोलिक स्थानामध्ये आहे. चीनच्या सीमेवरती देश आहेत १८ पण त्याचे सीमारेषेवरून भांडण आहे २३ देशांशी. यावरून त्याच्या युद्धखोर मानसिकतेची कल्पना येऊ शकेल. खरे तर हान वंशीय प्रजा जिथे राहते तो यांगत्सी नदी आणि पिवळ्या नदीकाठचा प्रदेश एवढाच खरा इतिहासकालीन चीन आहे. १९४८ नंतर ब्रिटिशांनी सत्ता सोडल्यानंतर धूर्त माओ यांनी तिबेट गिळंकृत केला आणि चीनची सीमा भारताला येऊन भिडली. असे होईपर्यंत भारत आणि चीन यांच्या सीमा एकमेकांना भिडलेल्या नव्हत्या. तिबेट उंचावर आहे. या पठारावरून वाहणाऱ्या नद्यांचे चीनला त्याचे पाणी पुरवतात. तेव्हा तिबेट हातात नसते तर चीनचे नाक दाबणे किती सोपे होते हे समजते. लष्करीदृष्ट्या तर उंचावरले तिबेट हाती आहे म्हणून चीन बलाढ्य झाला आहे. कारण खालच्या खोऱ्यामधल्या प्रदेशावर उंचावरून तोफा डागायला शत्रू येऊ शकत नाही. तिबेट हाती आहे म्हणून हानांचा प्रदेश सुरक्षित आहे. तिबेट हातात नसता तर मध्य आशिया आणि तिथून पुढे जमिनीच्या मार्गाने युरोपपर्यंत पोहचायचे स्वप्नही चीन बघू शकला नसता. म्हणजेच चीनचे भौगोलिक स्थान आज अलौकिक बनले आहे ते तिबेटमुळे. खरे तर तिबेटचे आणि भारताचे नाते अतूट आहे. कारण भारतामध्ये जन्मलेल्या गौतम बुद्धांचा धर्मच तिबेटमध्ये पाळला जातो. सांस्कृतिकदृष्ट्या तिबेटची नाळ भारताशी जोडलेली आहे. पण आजच्या घडीला राजकीयदृष्ट्या तिबेटवर चीनचे अधिपत्य आहे. तिबेटी जनतेच्या स्वातंत्र्याच्या आशा आकांक्षा धुडकावून आणि गरज पडेल तसे त्यांना जबरी जुलमी टाचेखाली भरडून आपली सत्ता राबवण्यास चीनने कमी केले नाही.

एका बाजूला जमिनीवरती अशी दादागिरी करणारा चीन आपल्या दक्षिणेकडील समुद्रावरतीही आपलाच अनिर्बंध हक्क आज गाजवू पाहत आहे. आपल्या किनाऱ्यापासून जगापर्यंत पोहचण्यासाठी दक्षिण चीनचा समुद्र त्याला मुठीत हवा आहे. तसे झाले तर तो एका बाजूला पॅसिफिक महासागरापर्यंत आणि दुसरीकडे हिंदी महासागरापर्यंत पोहोचू शकतो. या समुद्रावर आपले स्वामित्व गाजवण्यासाठी चीनने तेथील बेटावर हक्क सांगितला आहेच शिवाय कृत्रिम बेटेही बांधून काढली आहेत. चीनने स्वतः च ठरवलेल्या रेषांच्या पलीकडे कोणतेही जहाज येता कामा नये आणि कोणतेही विमान उडता कामा नये, असा नियम चीननेच जारी केला आहे. तसे करताना आंतरराष्ट्रीय संकेत, नियम, कायदे त्याने पायदळी तुडवले आहेत. दक्षिण चीन समुद्रामधले चिन्यांचे खेळ मान्य करायचे तर अमेरिकेला जगाच्या या प्रदेशातून आपला गाशा गुंडाळावा लागेल. केवळ अमेरिकाच नाही तर याच भागामधल्या अन्य शक्तिमान देश जपान आणि ऑस्ट्रेलिया यांच्या सार्वभौमत्वालाच चीन आव्हान उभे करू शकेल. अर्थातच चीनने आपल्या वागणुकीमधून याही भागामध्ये संघर्षाची बीजे पेरली आहेत. मुळात चीन ही एक सुपर पॉवर आहे असा मुद्दा जगाच्या गळ्यात बांधला तो अमेरिकन थिंक टँकने. तो काळ होता जेव्हा तत्कालीन लाभ उठवण्यासाठी अमेरिकन सरकारलाही चीनशी चुंबाचुंबी करायची होती. तर दुसरीकडे अमेरिका पहिल्या शीत युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाची कोंडी करण्याच्या उद्योगात मग्न होती. मग चीनच्या मदतीने रशियाचा पाडाव करायचा म्हणून अमेरिकेने चीनशी हातमिळवणी केली होती. या निर्णयाचे समर्थन अमेरिकन थिंक टँक्स करत होत्या. चीन ही जगामधली सुपरपॉवर आहे म्हणत होत्या आणि त्यांचे हे प्रतिपादन आमच्या विद्वानांनी तसेच्या तसे स्वीकारले.

सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर अमेरिकेला चीनची गरज उरली नाही. पण तोपर्यंत चीन इतका मोठा झाला होता की या चिनी ड्रॅगनने फुत्कार सोडायला सुरुवात केली आणि अमेरिकेच्या बोटचेप्या भूमिकेचा पूर्ण फायदा उठवत स्वतःला एक आर्थिक महासत्ता पदापर्यंत खेचत नेले. आज भारत, मंगोलिया, जपान, तैवान अशा देशांना चीन आपल्या कब्ज्यात ठेवू इच्छित आहे. मात्र, चीन जसा बदलला तसेच हे देशही बदलले आहेत. चीनची दादागिरी आता ना भारत सहन करू शकत ना लहानसा तैवान. चीनचे मिग विमान शुक्रवारीच तैवानने पाडले आहे. यावरून चीनला आपल्या शेजारील देशांवर दादागिरी करता येणार नाही, हे उघड आहे. अशा परिस्थितीत चीन सातत्याने युद्धखोरीच्या पवित्र्यात राहू इच्छित आहे. मात्र, निदान भारताशी तरी त्याला दोन हात करणे पूर्वी इतके सहज शक्य राहिलेले नाही. चीनच्या सैन्याने लडाखमध्ये कोणतीही नवी आगळीक केली की त्यांना मार पडणार हे भारतीय लष्कराने आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. दुसऱ्या बाजूला राजनैतिक पातळीवर चीनला जेरीस आणण्याच्या कृती भारत सरकारकडून होत आहेत. चीन ॲप्सवर बंदी, चीन मालावर बंदीचा पुरस्कार या माध्यमातून चीनला आर्थिकदृष्ट्या बुक्क्यांचा मार देण्याचे धोरण राबवण्यात येत आहे. त्याचा थेट परिणाम चीनच्या सरकारवर झाला आहे. कोरोनामुळे अगोदरच चीनची अर्थव्यवस्था धुळीस मिळाली आहे. अनेक बड्या कंपन्या चीनमधून आपला बिस्तारा बांधण्याच्या तयारीत आहेत. त्याचवेळी भारत, जपान, तैवान असे देश चीनच्या सामरिक सामर्थ्यालाच आव्हान देत आहेत. त्यामुळे चीन सध्यातरी कोंडीत सापडलेला दिसत आहे. अशा परिस्थितीत म्हणूनच चीनकडून कोणतेही नको ते साहस होऊ शकते. त्यामुळेच लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी लेह-लडाखचा दौरा करत भारतीय लष्कराच्या तयारीचा आढावा घेतला. युद्ध चीनला परवडणारे नाही. पण तरीही अवघडलेल्या अवस्थेतच चीनकडून युद्ध लादण्याचे साहस होऊ शकते. त्यामुळेच भारतीय लष्कर युद्धसज्ज आहे.

## विश्व विशेष

# ‘शिक्षक’ भावी पिढीचा शिल्पकार...

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शिक्षकांप्रती असलेले प्रेम व आदर पाहून भारत सरकारने त्यांचा जन्मदिन हा ‘शिक्षक दिन’ म्हणून साजरा करण्याचा संकल्प केला. ती परंपरा अजूनही सुरू आहे व भविष्यातही सुरूच राहील. १९६२ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिन म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याचे त्यांनी सांगितले होते. डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी मद्रासजवळील तिरुराणी येथे झाला. ते ब्राम्हन कुळातील असल्याने त्यांच्या घरात नेहमी धार्मिक विधी केला जात असे. त्या धार्मिक वातावरणातच ते लहानाचे मोठे झाले. वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी त्यांनी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण केली. ‘तत्त्वज्ञान’ हा त्यांचा आवडता विषय असल्याने त्यांनी या विषयात पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी मद्रासच्या एका महाविद्यालयात नोकरी केली. नोकरी करत असतानाही त्यांनी शिक्षण सोडले नाही. त्यांनी ‘वेदांतातील नीतिशास्त्र’ या विषयावर प्रबंध सादर केला. त्यांच्या प्रबंधास विद्यापीठाने सर्वोत्तम प्रबंध म्हणून जाहीर करून त्यांचा गौरव केला. एक उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या कार्यातून स्वतःची साऱ्या जगाला ओळख करून दिली. कुशल व्यक्तिमत्व व इंग्रजी भाषेवर असलेल्या त्यांच्या प्रभुत्वामुळे पार परदेशात त्यांची प्रशंसा झाली. ऑक्सफर्ड विद्यापीठातही ते ‘नीतिशास्त्र’ या विषयाचे प्राध्यापक होते.



डॉ. राधाकृष्णन

शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. डॉ. राधाकृष्णन यांनी आंध्र विद्यापीठ आणि बनारस हिंदू विद्यापीठ यांचे कुलगुरूपद भूषविले. नंतर १९३१ ते १९३९ या आठ वर्षांच्या काळात त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधित्व केले. १९४९ ते १९५२ मध्ये भारत सरकारने रशियातील भारताचा राजदूत म्हणून त्यांची नियुक्ती केली. तेथेही त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटविला. १९५२ मध्ये ते भारतात परतले, त्यानंतर १९५२ ते १९६२ या दहा वर्षांच्या कालावधीमध्ये त्यांनी देशाचे उपराष्ट्रपतीपद भूषविले. १४ मे १९६२ रोजी ते भारताचे राष्ट्रपती झाले. १९५४ साली भारत सरकारने त्यांना ‘भारतरत्न’ हा सर्वोच्च किताबही बहाल केला होता. डॉ. राधाकृष्णन यांना नोबेल साहित्य पुरस्कारासाठी १६ वेळा तर नोबेल शांतता पुरस्कारासाठी ११ वेळा नामांकन मिळाले होते. १७ एप्रिल १९७५ मध्ये त्यांचे चेन्नई येथे निधन झाले. शिक्षकांना वैदिक काळापासूनच गुरूचे स्थान आहे. त्यांच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होऊ शकत नाही. आज शिक्षणाचे अवमूल्यन केले जात असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. तसेच गुरू-शिष्य संबंधांमधील पवित्र भावना लोप पावत आहे. पावित्र्य कायम ठेवण्यासाठी व डॉ. राधाकृष्णन यांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो.

शिक्षक हा समाज परिवर्तन करणारा घटक आहे. भविष्यातले विचारवंत, कलाकार, लेखक, तत्त्वज्ञ, पुढारी, डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनीयर, शास्त्रज्ञ तयार करण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला कुंभार आकार देऊन त्यापासून एखादी प्रतिकृती तयार करत असतो, अगदी त्याचप्रमाणे शिक्षक बालकांच्या कोऱ्या मनावर योग्य संस्कार करून त्यातून भविष्यातील जबाबदार नागरिक घडवित असतात. आपल्या आई-वडिलांनंतर शिक्षक हे आपले अप्रत्यक्षरित्या पालकच असतात. शिक्षक हे आपल्याला केवळ पुस्तकी ज्ञान शिकवित नाहीत, तर आपण त्यांच्याकडून जगण्याची कला आत्मसात करत असतो. आपल्या व्यक्तिमत्त्वावर त्यांच्याकडून संस्कार, संस्कृती, परंपरा, चालीरिती व आदर असे पैलू पाडले जात असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंचा नेहमी आदरपूर्वक सन्मान केला पाहिजे.

**सुशांत सिंह राजपूत याच्या आत्महत्येच्या घटनेनंतर राज्यात निर्माण झालेल्या अभूतपूर्व परिस्थितीत माध्यमांनी कसं वागलं पाहिजे, याचे धडे मुंबई उच्च न्यायालयाला द्यावे लागतात याहून लांच्छन नाही. माध्यमांनी विशेषत: दूरचित्रवाहिन्यांनी कसं वागलं पाहिजे, अशी विचारणा होऊ लागल्याने तर आपण शहाणं कधी होणार, असा प्रश्न सहज पडतो. आपल्या बदनामीला आपणच जबाबदार असूनही बदनामी करणाऱ्यांना कोणीही रोखण्याचं काम करत नाही, हे पत्रकारितेतील सर्वात मोठं दुर्दैवं. यामुळे राजपूत आत्महत्या असो वा कंगनाचं मुंबईविषयीचं वक्तव्यं असो या सगळ्या प्रकरणात महाराष्ट्राची बदनामी करण्याची नवी टूम निघालीय, हे नाकारता येणार नाही.**

# हा तर पत्रकारितेचा पराभव!



पोलखोल

प्रवीण पुरो


ppraveen@mymahanagar.com

राजपूतच्या मृत्यूनंतर त्याच्या तपासातील कथित दिरंगाईवर मुंबई पोलिसांना निष्क्रीय ठरवणाऱ्या माध्यमांचे कान पिळणं आवश्यकच बनलं होतं. ते काम एकेकाळी महाराष्ट्राच्या पोलीस दलाची जबाबदारी पार पाडणाऱ्या माजी पोलीस अधिकाऱ्यांना घ्यावं लागलं. मुंबईच्या पोलिसांची ख्याती ही स्कॉटलॅण्ड पोलिसांच्या तुलनेची आजही मानली जाते. पोलिसांच्या एकूणच कामगिरीने त्यांना मिळालेला हा सन्मान आहे. हा सन्मान एका राजपूत याच्या मृत्यूने निश्चितच लयास जाणार नाही. पण काळ सोकावतो तेव्हा पोलिसांच्या होणाऱ्या बदनामीला रोखण्याची जबाबदारी कोणीतरी घ्यायलाच हवी. ती माजी पोलीस अधिकाऱ्यांनी घेऊन द्रकश्राव्य माध्यमांना त्यांची जागा दाखवून दिली, हे बरंच झालं. सुशांत राजपूत प्रकरणानंतर मुंबई पोलिसांची कधी नव्हे इतकी बदनामी झाली. ती करताना माध्यमांनी केलेले आरोप आणि दिलेले निकाल पाहिले की माध्यमं इतकी अतिरेकी बनू शकतात याची खात्री पटली. एकटी माध्यमं याला कारण नाहीत, भारतीय जनता पक्षाचे काही नेतेही याला तितकेच कारण ठरले आहेत. काही नेत्यांच्या बायकांनी तर मुंबई पोलिसांवर विश्वास नसल्याचं जाहीर वक्तव्य करत आपला पोलिसांप्रति असलेला राग व्यक्त केला. मुंबई हे सुरक्षित शहर नसल्याचं त्यांचं वक्तव्य याच पठडीतील होतं. पोलिसांना दोष देऊन मोकळ्या झालेल्या या महिला याच पोलिसांच्या गराड्यात एकेकाळ फिरत होत्या. राज्यातल्या महाआघाडीच्या सरकारला बदनाम करण्याचा हा पद्धतशीर डाव एव्हाना लपून राहिला नव्हता. याविरोधात वर्तमानपत्रांनी भूमिका घेतल्याने भाजपच्या नेत्यांवर तोंड लपवण्याची वेळ आली. कोणत्याही घटनेचं राजकारण करण्याचे भाजपने याआधीही प्रयत्न केले. त्याला खतपाणी घालत वाहिन्यांनी आपली नीतीमत्ता रसातळाला नेली.

सुशांतच्या मृत्यूप्रकरणात मुंबई पोलिसांची होत असलेली बदनामी सहन करण्यापलीकडे होती. केवळ खात्याची बदनामी करून हे नेते थांबले नाहीत. आमदार असलेल्या अतुल भातखळकर यांनी तर मुंबईच्या पोलीस आयुक्तांची हकालपट्टी करण्याची मागणी थेट पंतप्रधानांकडे केली. नैतिकतेच्या बुरख्याखालचा हा अतिरेक इतका पराकोटीचा होता की त्याचा फायदा कोणीही घ्यावा. कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू ही दुःखदच बाब. पण मयताच्या नावाने राजकारण करण्याचा फटका साऱ्या यंत्रणेला बसत असतो. हेच या नेत्यांना हवं होतं. त्यात पोलिसांसारख्या यंत्रणेला कोणी ओरबाडत असेल तर त्याला रोखण्याची आवश्यकता होतीच. ती मुंबई आणि महाराष्ट्रात आपल्या सेवेची अनेक वर्ष दिलेल्या आयपीएस अधिकाऱ्यांनी घेतली आणि कोणत्याही घटनेचा ट्रायल चालवणाऱ्या वाहिन्यांना रोखण्याची गरज त्यांनी न्यायालयापुढे कथन केली. खरं तर माध्यमांचं तोंड अशाप्रकारे बंद करावं लागणं हीच खरी तर माध्यमांची आजची शोकांतिका होय. कोणताही आतताईपणा कोणालाच शोभा देत नसतो. माध्यमांनी तर कदापि अशा भानगडीत पडू नये. त्याचं कधीही बुंगरँग होऊ शकतं. पण हे कोणी कोणाला सांगायचं? माजी पोलीस अधिकाऱ्यांना यासाठी कोर्टाची पायरी चढावी लागणं हे खचितच योग्य नव्हतं. पण अतिरेक झाल्यावर त्याचे व्हायचे ते परिणाम होतात आणि ते त्याला रोखणं ही काळाची गरज पडते.

सुशांतच्या प्रकरणात बहुतांश वाहिन्यांची केलेला अतिरेक कमालीचा उद्वेगी होता. यात रिपब्लिक वाहिनीने तर कमालच केली. हातवारे करत आद्वातद्वा वक्तव्यं करत पोलिसांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करण्याची मजल अर्णव गोस्वामी यांनी मारली. हा तर पोलिसांच्या अवहेलनेचाच प्रकार होता. याबाब कोणीही जाब विचारत नाही, असं पाहून या वाहिनीची मजल मुख्यमंत्र्यांना एकेरी उल्लेख करेपर्यंत गेली. हा म्हणजे एकट्या पोलिसांच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्याच विरोधात कटकारस्थानाचा भाग बनला. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या माध्यमांना सबुरीने वागण्याची समज जेव्हा उच्च न्यायालयाला द्यावी, लागते याचा अर्थ सगळ्याच पत्रकारांनी समजून घेण्याचा आहे. ज्या आठ आयपीएस अधिकाऱ्यांनी हे प्रकरण न्यायालयात नेलं खरं तर त्यांचं कौतुकच केलं पाहिजे. पोलिसांच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्हं उभ्या करणाऱ्या या प्रकरणाचा तपास केंद्रीय गुप्तचर विभागाकडे देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर तरी वाहिन्यांनी थांबण्याचं औदार्य दाखवायला हवं होतं. सीबीआयकडे तपास गेला हा पोलिसांच्या विश्वासार्हतेवरील अविश्वास असल्याची आवई उठवत माध्यमांनी मुंबई पोलिसांच्या आजवरच्या कामगिरीवरील अविश्वास व्यक्त केला होता. सुशांत मृत्यूप्रकरणचं रिपोर्टिंग करताना मीडियाने संयम बाळगला नसल्याचं न्यायालयाला नमूद करावं लागलं आणि रिपोर्टिंग करताना माध्यमांनी संयम बाळगावा असं मत व्यक्त करावं लागणं यावरून माध्यमांची घसरलेली पातळी अधोरेखित होते.

सुशांत मृत्यूप्रकरणात मुंबई पोलिसांची प्रतिमा मलिन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू होता. एक गट यासाठी सक्रीय होता, या गटाला मीडियातील वार्तांकनांनी अधिकच चढवलं आणि त्याचे परिणाम साऱ्या राज्याच्या बदनामीत झाले. मीडियाच्या रिपोर्टिंगमुळे लोकांचा मुंबई पोलिसांवरील विश्वास कमी होणं कदापि योग्य नव्हतं. कोणीतरी खोट्यानाट्या आणि ऐकीव माहितीचा आधार घ्यायचा आणि त्याला माध्यमांनी सजवून पेश करायचं हा अतिरंजितपणा कोणालाही शोभणारा नाही. लोकशाहीचा आधार असलेल्या माध्यमांना तर ते कदापि शोभणारं नाही. ज्या अधिकाऱ्यांनी हे प्रकरण न्यायालयात नेलं ते आठही अधिकारी नामचीन आणि पोलीस दलाशी इमान राखणारे आणि पोलिसांची मान उंचावेल, अशी कारकीर्द पार केलेले अधिकारी होत. मुंबई पोलिसांची होणारी अवहेलना त्यांनाही नकोशी झाली होती. कोणत्याही प्रकरणाचा निकाल देण्याची खासी पद्धत वाहिन्यांमध्ये सुरू झाल्याचे पाहून या अधिकाऱ्यांनी हे प्रकरण न्यायालयात नेण्याचं ठरवलं. तपासातच ट्रायल करण्याचे परिणाम पोलिसांच्या तपास कामावर होत असतात. मीडिया ट्रायलच्या या पद्धतीमुळे पोलिसांची प्रतिमा डागाळण्याची आणि यामुळे पोलिसांवरील विश्वासाला तडा जाण्याची भीती या अधिकाऱ्यांनी याचिहेत केली होती. हे करताना माध्यमांमध्ये खोटी माहिती पसरवण्याच्या पध्दतीचा या अधिकाऱ्यांनी चांगलाच समाचार घेतला होता. इतकंच नव्हे काही वाहिन्यांच्या टॉकशोची पध्दत आणि तिथे वदवून घेण्याच्या पध्दतीने निर्माण होणाऱ्या परिस्थितीही जाणीव न्यायालयाला करून देण्यात आली होती.




माध्यमांनी दोन्ही बाजू घेण्याबरोबरच विश्वासार्ह वार्तांकन करावं, अशी मागणी याचिकेत व्हावी, हा तमाम माध्यमांच्या कार्यशैलीवरील डाग होय. जबाबदार पत्रकारिता करावी, अशी मागणी न्यायालयात होणं हाच पत्रकारितेचा पराभव होय. वृत्त वाहिन्यांमध्ये सुरू असलेल्या सनसनाटीवरही याचिकेत प्रश्न निर्माण करण्यात आला होता. कोणत्याही विषयात सनसनाटी निर्माण करणं हे जणू वाहिन्यांवरील पत्रकारितेचं ब्रिदच बनलं आहे. सनसनाटी निर्माण करून दहशत पसरवण्याची नवी पध्दत देशासाठी आणि राज्यासाठीही घातक आहे. काहीजण आपल्या डोक्यात येतील ते विचारून प्रकरण दुसरीकडे नेण्याचा प्रयत्न करतात. या पत्रकारांचा त्यामागचा हेतू स्पष्ट होत नाही. कोणी त्यातून स्वतःचा फायदाही करून घेत असल्यास त्यावर कोणाचंच नियंत्रण नाही. अशा परिस्थितीत मीडिया ट्रायल रोखणं ही काळाची गरज आहे. एखाद्या प्रकरणाचा तपास खोलवर करणारी जगातील सर्वोत्कृष्ट यंत्रणा आणि मनुष्यबळ हे मुंबई पोलिसांकडेच असताना कोणाला तरी बदनाम करण्यासाठी थेट पोलिसांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात पकडलं जात असेल, तर ते रोखलंच पाहिजे. सुशांतच्या आत्महत्या प्रकरणात काही वाहिन्यांनी केंद्रीय तपास यंत्रेच्या चौकशीची चालवलेल्या एकांगी रिपोर्टिंगने मुंबई पोलिसांना इतकं बदनाम केलं की टॉकशोचे अँकर तर मुंबई पोलीस आणि पोलीस अधिकाऱ्यांविरोधात कॅम्पेन चालवतात की काय, असा संशय येत होता. पोलिसांवर अत्यंत हीन पध्दतीने हल्ला चढवला जात होता. न्यायालयात काही वाहिन्यांवरील यातील फुटेजही दाखवण्यात आले. राज्यात यलो जर्नालिझम सुरू असल्याच्या या अधिकाऱ्यांपैकी काहींच्या वक्तव्याने तर इभ्रतीचा पंचनामाच निघाला आहे. मुंबईच्या अंडरवर्ल्डची पाळंमुळं खोदून काढलेल्या मुंबई पोलिसांची याआधी माध्यमांनी प्रचंड स्तुती केली होती.

## वाणी संतांची...

नामदेव बनकर

# नाम म्हणजे जादूचा दिवाच

एकदा एक बाई सोवळे नेसून स्वयंपाक करीत होती. बाईचे मूल झोपून उठल्यावर, अंथरूणातच ‘आई, मला घे,’ म्हणून रडू लागले. आई म्हणाली,‘बाळा, मी तुला घ्यायला आतुर झाले आहे रे, पण तू कपडे तेवढे काढून ये’. परंतु मुलगा कपडे काढायला तयार होईना आणि ‘आई, आई’ म्हणून रडू लागला. तेव्हा शेजारच्या बाईने येऊन मुलाचे कपडे काढले आणि मग आईने मुलाला पोटाशी घेतले. आपलेही त्या लहान मुलाप्रमाणे झाले आहे. वासना, विकार, अहंभाव इत्यादींचे कपडे न काढताच आपण परमेश्वराला भेटायची इच्छा करतो, मग त्याची नि आपली भेट कशी होणार? परमेश्वर मातेप्रमाणेच अत्यंत प्रेमळ आणि ममताळू आहे, त्याला आपल्याला भेटायची अतिशय इच्छा आहे; परंतु जोपर्यंत आपण आपल्या अंगावरची अपवित्र आवरणे काढून टाकीत नाही, तोपर्यंत परमेश्वर आपल्याला जवळ घेत नाही.




संत आपल्याला परमेश्वराकडे जायचा रस्ता सांगतात. त्या मार्गाने गेलो तर आपल्याला खचितच भगवंताची प्राप्ती होईल. आपण पुराणात वाचलेच असेल की, श्रीकृष्णाकडे दुर्योधन आणि अर्जुन गेले असताना, श्रीकृष्ण परमात्म्याने सांगितले की,‘ज्याला मी हवा असेन त्याला माझे सैन्य आणि इतर गोष्टी मिळणार नाहीत’. हे ऐकून, दुर्योधनाने त्याचे सर्व सैन्य मागून घेतले. अर्जुनाला खरा आनंद झाला की आपल्याला हवी असलेली गोष्ट मिळते आहे, कारण तो हे जाणून होता की, एका परमेश्वरावाचून बाकी सर्व व्यर्थ आहे. प्राणावाचून हजारो शरीरांचा काय उपयोग?

कोणी आपल्याला सांगतील की परमेश्वर साता समुद्रापलीकडे आहे, तो शेषशायी आहे. तेव्हा आपल्यासारख्या सामान्य माणसाला तो प्राप्त होणे अत्यंत कठीण आहे. परंतु संतांनी आपल्यावर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. त्यांनी नामरूपी जादूचा दिवाच आपल्या हाती दिला आहे; त्यात सत्संगतीचे तेल घातले म्हणजे झाले. हा दिवा विझू नये म्हणून फार काळजी घ्यावी लागते. मी त्रिवार सत्य सांगतो की, नीतीने वागून जो नामात राहील त्याला नामाचे प्रेम लागल्याशिवाय राहणार नाही. नीती हा सर्वांचा पाया आहे. त्या पायाशिवाय इमारत टिकू शकणार नाही. तीन गोष्टी अत्यंत जपा : परस्त्री मातेसमान माना, परधन आणि परनिंदा विष्ठेसारखी माना आणि कशाही परिस्थितीत नामस्मरणाला सोडू नका; तुम्हाला भगवंताचे प्रेम खात्रीने लागेल.

## प्रतिसाद

### उचलली जीभ लावली टाळ्याला



उचलली जीभ लावली टाळ्याला असेच अभिनेत्री कंगना राणावतच्या बाबबीत बोलावे लागेल, कारण तिने नुकतेच मुंबई पाकव्याप्त काश्मीर सारखा का वाटतोय व मला मुव्ही माफिया किंवा गुंडापेक्षा मुंबई पोलीस यांची जास्त भीती वाटते व मला हिमाचल प्रदेश किंवा थेट केंद्र सरकारची सुरक्षा हवी आहे व मुंबई पोलिसांची नको प्लिज, अस बेताल व्यक्तव्य करत मुंबई पोलिसांवर अविश्वास दाखविला व मुंबईकर जनता हे कदापि सहन करणार नाही. मुंबईत राहायचे, चित्रपट काढायचे, मुंबईकरांच्या जीवावर उड्या मारून मोठं व्हायचं व वेळ आली की मुंबईच्या बाबतीत वेडेवाकडे व काहीतरी बरळायचे हे कोणीही मुंबईकर सहन करणार नाही. मुंबईवर जेव्हा जेव्हा संकटे आली मग तो अतिरेकी हल्ला असो, दंगल किंवा बॉम्बस्फोट असो, नैसर्गिक आपत्ती असो वा सध्याचे कोरोना महामारीचे महाभयंकर संकट असो, प्रत्येकवेळी सर्वप्रथम येथील नागरिकांच्या मदतीला कोण धावून आले असतील तर ते मुंबई पोलीसच आहेत, तेव्हा मुंबई पोलिसांची मुंबईकरांना भीती वाटत नाही तर अभिमानच वाटतो.

– गणेश हिरवे, मुंबई

### नागरिकांचा निष्काळजीपणा

मुंबईत मास्क न वापरणाऱ्या दोन हजारांहून बेशिस्त नागरिकांकडून ९ एप्रिल ते ३१ ऑगस्टदरम्यान २७ लाख ४८ हजार ७०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच मास्क योग्यरित्या न लावणाऱ्या सुमारे दहा हजार व्यक्तींना समज देण्याची कार्यवाही देखील करण्यात आली आहे. वारंवार दंडात्मक कारवाई व जनजागृती करूनही मास्क न वापरण्याचे प्रमाण वाढत आहे. मास्क न लावल्याने कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. मास्क न वापरल्याने स्वतःला जास्त धोका असूनही अनेकजण विनामास्क फिरताना आढळतात. लक्षण दिसत नसलेले रुग्ण जर मास्क न लावता सार्वजनिक ठिकाणी फिरल्यास त्यांच्यापासून रोगाचा फैलाव वेगात होणार आहे. मास्क न वापरणाऱ्या बेजबाबदार लोकांमुळे कोविडचा संसर्ग वाढत असल्याने त्यांना अटक करण्याची कारवाई करावी. वापरलेले मास्क व हँडग्लोव्हज रस्त्यावर टाकल्याने संसर्ग रोखणे अवघड जात आहे. नागरिकांनी शासनाला रोगाचा संसर्ग रोखण्यास मदत करावी.

– विवेक तवटे, ठाणे

### बेताल विधान मागे घ्यावे

कंगना राणावतच्या मुंबई पोलिसांबाबतच्या विधानावरील चर्चेला पूर्णविराम मिळाला नसतानाच तिने मुंबईबाबत केलेल्या विधानामुळे ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. मुंबई ही मला पाकव्याप्त काश्मीरसारखी का वाटते आहे हे विधान म्हणजे ज्या मुंबईमुळे ती कलाक्षेत्रास प्रसिद्धीस आली त्या मुंबईची प्रतारणा करण्यासारखेच होय. अनेक ज्ञात-अज्ञात कलाकार आपले कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी मुंबईत येत असतात. कलागुणांना न्याय मिळून योग्य संधी मिळताच मुंबई त्यांना नावारुपाला आणते. अशा या मुंबईप्रती कृतज्ञता बाळगणे क्रमप्राप्तच ठरते. परंतु, त्याचवेळी यश डोक्यात जाऊ न देता आपले पाय जमिनीवरच राहतील याची काळजी घेणे महत्वाचे असते. नेमके तेच भान कंगनाला राखता आले नाही असे तिच्या अलीकडच्या विधानांवरुन म्हणावेसे वाटते. सुशांत सिंह राजपूत प्रकरणाच्या निमित्ताने कंगनाने केलेली वक्तव्ये हळूहळू सवंगतेकडे झुकू लागली. त्यातूनच मुंबई पोलिसांची बदनामी करणारे विधान कंगनाने केले. या विधानावरून इतर कलाकारांनी कंगनावर टीकाही केली आहे जी रास्तच आहे. कंगनाने ते विधान वेळीच मागे घेऊन दिलगिरी व्यक्त करावी नाहीतर ज्या मुंबईमुळे ती प्रसिद्धीस आली त्याच मुंबईतच तिच्या प्रसिद्धीस ओहोटी लागण्यास वेळ लागणार नाही.

– दीपक गुंडये, वरळी.

### या अभिनेत्रीला वेळीच आवरा

हिमाचल प्रदेशमधून चित्रपट क्षेत्रात भवितव्य घडविण्यास मुंबईत आलेली व मुंबईतून हिंदी चित्रपट क्षेत्रात मोठी झालेली अभिनेत्री कंगना राणावत ही समाज माध्यमाद्वारे सतत वादग्रस्त टिप्पणी करत असते. अलीकडे तिने मुंबई पोलिसांवर अविश्वास दाखविणारे व्यक्तव्य केले होते व आता तिला मुंबई पाकव्याप्त काश्मीर सारखी वाटू लागली आहे. यावर शिवसेना नेते संजय राऊत यांनी कंगनाने मुंबईत राहूच नये, असे मत व्यक्त केले आहे ते चुकीचे नाही. महाराष्ट्रात राहून मोठे होऊन जर कोणी महाराष्ट्राची बदनामी, निंदा करत असेल तर ते कोणताही महाराष्ट्राभिमानी व्यक्ती सहन करू शकणार नाही. कंगनासारखी सतत प्रसिद्धीसाठी झपाटलेली अभिनेत्री वादग्रस्त मत व्यक्त करून प्रसिद्ध होऊ पाहत आहे याला काही राजकीय पक्षाचे नेते कंगनाला झाशीची राणीची उपमा देऊन तिच्या मतांना प्रोत्साहन देत आहेत, ही दुर्दैवाची बाब आहे. झाशीची राणी चित्रपटात झाशीची भूमिका केल्यामुळे कोणी झाशीची राणी होऊ शकत नाही. चित्रपटव्यतिरिक्त समाज माध्यमातून वादग्रस्त मते व्यक्त केली म्हणजे ती झाशीसारखी लढते असा अर्थ होत नाही. पण काही व्यक्तींना वादग्रस्त विधाने करण्याची सवय लागलेली आहे. त्या वादग्रस्त विधानाने पुढे वाद निर्माण होतील याची दक्षता असे कलाकार घेत नसतील तर त्यांना वेळीच आवरणे गरजेचे आहे.

– नंदकुमार आ. पांचाळ, चिंचपोकळी (पूर्व)

**वाचकांना आवाहन**

**आपलं महानगरच्या वाचकांना ‘प्रतिसाद’ साठी connect@mymahanagar.com किंवा mahanagar91@gmail.com वर तुम्ही पत्र पाठवू शकता अथवा आपलं महानगर, पांडुरंग बिल्डिंग, १७८, एल.जे. रोड, माहिम (पश्चिम), मुंबई-१६ या पत्त्यावर पत्र पाठवा. सोबत तुमचा फोटो पाठवल्यास स्वागतच!**

## आरे कारशेड रद्द झाल्याचे समाधान

**कल्याण** ● मेट्रो कारशेड बनविण्यासाठी गेल्या वर्षी तत्कालीन सरकारने मुंबई गोरेगाव येथील आरे कॉलनीची रातोरात जंगल तोड केली. या विरोधात विद्यार्थी भारतीने कडाक्याचे तीव्र आंदोलन केले. आरे वाचवा चा नारा देत निदर्शने केली. पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी आरे ची ६०० ची एकर जमीन जंगल घोषित करण्यात आली. विद्यार्थी भारतीच्या राष्ट्रीय अध्यक्षा मंजिरी धुरी यांनी सरकारच्या निर्णया चे स्वागत केले व २००० हून अधिक झाडांची कत्तल करण्यात आली होती आता मात्र दुप्पट झाडे लावून त्याची मशागत करण्याची मागणी विद्यार्थी भारती संघटनेने केली आहे.

आपलं महानगर My महानगर.com mymahanagar.com mymahanagar mymahanagar

## थोडक्यात

### चाळींचा डीम्ड कन्व्हेयन्सचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी

**कल्याण** ● तीस वर्षे जुन्या चाळींचा डीम्ड कन्व्हेन्सचा प्रश्न मार्गी लावावा, अशी कल्याण को ऑप सोसायटी असोसिएशनची मागणी असल्याची माहिती माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांनी पत्रकार परिषद मध्ये दिली. कल्याण पश्चिम परिसरात अनेक चाळी असून या चाळी सुमारे २५ ते ३० वर्षा पूर्वी बांधलेल्या आहेत. बहुतांश चाळी खासगी जागेवर बांधण्यात आल्या आहेत. या रूम रहिवाशांनी कायस्वरूपी तत्त्वावर खरेदी करण्यात आल्या आहेत. या चाळीना २५ ते ३० वर्ष झाल्याने या मोडकळीस आल्या असून या चाळी पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत आहेत. या चाळी नोंदणीकृत करण्यात आल्या असल्या तरी शासनाच्या डीम्ड कन्व्हेयन्स म्हणजेच मानीव अभिहस्तांतरण करण्यास खूप अडचणी येतात. त्यामुळे या चाळीचा पुनर्विकास खुंटला आहे. डीम्ड कन्व्हेयन्स न झाल्याने सातबारा उतारा सोसायटीच्या नावे नाही त्यामुळे साधी घर दुरुस्तीसाठी देखील जमीन मालकाचे उंबरठे झिजवावे लागतात. त्यामुळे कल्याण को ऑप सोसायटी असोसिएशनच्या वतीने गेल्या काही वर्षापासून शासनाकडे डीम्ड कन्व्हेयन्स म्हणजेच मानीव अभिहस्तांतरण बाबतच्या काही जाचक अटी शर्ती शिथिल करण्याची मागणी केली जात आहे. याबाबत कल्याण को ऑप सोसायटी असोसिएशनने आमदार जितेंद्र आव्हाड यांना साकडे घातले असून आव्हाड यांनी या प्रश्नी येत्या अधिवेशनात वाचा फोडणार असल्याचे आश्वासन सदस्यांना दिले आहे. अशी माहिती माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांनी पत्रकार परिषद मध्ये दिली.

### गणेशोत्सवानंतर कल्याण तालुक्यावर कोरोनाचे विघ्न

**टिटवाळा** ● शासनाने गणेशोत्सव साधेपणाने साजरा करा, गर्दी टाळा मास्क वापरा आणि सॅनिटायझरचा वापर करा, सोशलडिस्टींगचे पालन करा असे आवाहन केले होते. कल्याण ग्रामीण भागात कोरोनाचे अनेक रुग्ण आढळून येत असून गणेशोत्सव काळात साजरे झालेली कार्यक्रम आणि त्यात सोशल डिस्टन्सिंगचा उडालेला बोजवारा असल्याचे बोलले जात आहे. कल्याण तालुक्यात गणेशोत्सवापूर्वी तब्बल १० ग्रामपंचायती आणि १९ गावामधे एकही कोरोनाचा पॉझिटिव रुग्ण आढळून आला नव्हता. त्यामुळे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक सगळे बिनधास्त होते. परंतू गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळाचे गणपती कमी असले तरी घरगुती गणपती मोठ्या प्रमाणात विराजमान झाले होते. त्यामुळे अनेकांनी आपल्या घरी गणपतींना दर्शनाला येण्याचे आवाहन वॉट्स अप, फेसबुक, विडिओ आदी सोशलमिडयाच्या माध्यमातून केले होते. यावेळी येणाऱ्या पै पाहुणे, नातेवाईक, मित्रमंडळी यांनी मास्क लावणे, सॅनिटायझर वापर, सोशलडिस्टींगचे पालन केल्याचे दिसत नव्हते. तर धार्मिक कार्यक्रम मोठ्या गर्दीत साजरे झाले. याचा परिणाम जो व्हायचा तो झाला. ज्या ग्रामपंचायती आतापर्यंत कोरोना कोविड विषाणूपासून दूर राहिलेल्या होत्या. त्यामध्ये कोरोना ने शिरकाव केला आहे. या मध्ये शिरढोण, रुदा, उतणे या ग्रामपंचायतीचा समावेश आहे. आतापर्यंत दहागाव प्राथमिक आरोग्य केंद्रातंगत ४४३, खडवली १०१ आणि निळजे ८८ असे एकूण ६३२ कोरोना पॉझिटिव रुग्ण आहेत. ६९ लोकांनी जीव गमवावा लागला आहे. एका ग्रामपंचायतीच्या सरपंचांच्या वडिलांना कोरोना झाल्याचे त्यांनी लपवून ठेवले व ते गणपतीच्या काळात अनेक ठिकाणी प्रवचन द्यायला गेले होते. याचा परिणाम येथे पेंशट आढळून येत असल्याचे ग्रामसेविका मिनल साबळे यांनी सांगितले. तसेच येथे फवारणी करण्यास गेलेल्या कामगारांना मारहाण करण्यासाठी काही ग्रामस्थ धावून गेले होते. हा सर्व प्रकार कल्याण पंचायत समितीचे उपसभापती रमेश बांगर यांच्या समोर व ग्रामसेविका मिनल साबळे यांच्या उपस्थितीत घडल्याचे म्हटले जात आहे. उपसभापतींनी लोकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण काही उपयोग झाला नाही. असे असेल तर काम कसे करायचे असे अधिकारी व कर्मचारी यांचे म्हणणे आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर कोरोना चे वेळीच निदान होईल का ? आणि पेंशंट्सवर उपचार करता येईल का असा प्रश्न कर्मचा-यांनी विचारला आहे.

### पुन्हा कल्याण डोंबिवलीमध्ये प्रतिदिन ४०० हून अधिक कोरोना रुग्ण

**कल्याण** ● लॉकडाऊन शिथिल आणि गणेशोत्सव संपताच कल्याण डोंबिवली शहरात ४०० हुन अधिक कोरोना बाधित नव्याने रुग्ण आढळून येत असल्याने चिंतेचे वातावरण आहे. मागील २४ तासात ४८६ नव्याने रुग्ण आढळून आले. कल्याण डोंबिवली महानगर पालिका हद्दीत मागील २४ तासात नव्याने ४८६ कोरोना बाधित रुग्ण आढळून आले असून २०४ जणांना डिस्चार्ज दिला असून त्यामुळे एकूण ३० हजार ५४० रुग्णाची संख्याबळ झाली आहे. यात ३ हजार ५५९ रुग्णावर उपचार सुरू असून २६ हजार ३१६ रुग्णाना डिस्चार्ज दिला आहे. तर एकूण मृत रुग्णाची संख्या ६६५ झाली आहे. मागील २४ तासात २०४ जणांना डिस्चार्ज दिला असून यात ८९ टाटा आमंत्रा, ६ क्रीडा संकुल, ६ आर आर, १० पाटीलदार, ७ डोंबिवली जिमखाना आदी ठिकाणचा समावेश आहे. कल्याण पूर्व ९२, कल्याण पश्चिम १३२, डोंबिवली पूर्व ११७, डोंबिवली पश्चिम १००, मांडा टिटवाळा २७, मोहना १८ आदी नव्याने आढळून आले आहेत.

# कुंभारखान गणेश घाटावरील रेती उपसावर कारवाई

## स्थायी समिती सभापती विकास म्हात्रे यांनी केली होती तक्रार

वार्ताहर ● कल्याण

कल्याण-डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखान गणेश घाटावर होत असलेल्या अवैध रेती उपसा प्रकरणी पालिका स्थायी समिती सभापती विकास म्हात्रे यांनी केलेल्या तक्रारी नंतर शुक्रवारी कल्याणच्या नायब तहसीलदारांनी कारवाई केली.

महापालिकेच्या निधीतून डोंबिवली गणेश घाट विकसीत केला आहे. त्यासाठी साडे चार कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. रेती उपसा करणा:यांचे ट्रक ये जा करतात. रेती साठवून ठेवली जाते. घाटानजीक मोठे ड्रेजर्स, बोटी धडकतात. दिवस रात्र याठिकाणी रेती उपसा केला जातो.

त्यामुळे साडे चार कोटी खर्च करुन तयार करण्यात आलेल्या गणेश घाटाची दुरावस्था झाली आहे. अशी तक्रार स्थायी समिती सभापती विकास म्हात्रे यांनी तक्रार दिली होती. त्या नुसार नायब तहसीलदार सुषमा बांगर यांच्या पथकाने धडक कारवाई करत



साहित्य जप्त करुन संबंधितांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे समजते. कोरोना काळात कारवाईकडे दुर्लक्ष झाले असल्याचे बांगर यांनी मान्य केले.

स्थायी समिती सभापती म्हात्रे यांनी सांगितले की, कुंभारखान पाडा खाडीनजीक मेरीटाईन बोर्ड व महापालिकेच्या निधीतून गणेश घाट विकसीत केला आहे. त्यासाठी साडे चार कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. रेती उपसा करणाऱ्यांचे ट्रक ये जा करतात.

रेती साठवून ठेवली जाते. घाटानजीक मोठे ड्रेजर्स, बोटी धडकतात. दिवस रात्र याठिकाणी रेती उपसा केला जातो. त्यामुळे साडे चार कोटी खर्च करुन तयार करण्यात आलेल्या गणेश घाटाची दुरावस्था झाली आहे. ही बाब यंदाच्या गणेश विसर्जनाच्या वेळी निदर्शनास आली. या प्रकरणी त्यांनी महापालिका आयुक्तांसह तहसीलदारांना तक्रार केली होती. या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे.

# अंबरनाथमध्ये वीज कार्यालयासमोर फॉल्टी मीटर जाळले

## भाजपाचे ठिय्या आंदोलन

वार्ताहर ● अंबरनाथ

लॉकडाऊन काळात जनतेची आर्थिक घडी विस्कटल्याने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. अशा बिकट परिस्थितीत अनेक वेळा निवेदन, मोर्चा व शिष्टमंडळाने भेट घेऊनही वाढीव वीज बिलांमध्ये कपात केली जात नाही.

उलट वीज बिल कमी करण्याऐवजी पहिले वीज बिल भरणा 'वसुली' त्यानंतर फॉल्टी मीटर अर्जाचा विचार करू असा सल्ला देणा-या वीज मंडळाचा जाहीर निषेध करत, माजी राज्यमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले. अंबरनाथ शहर भाजपा शहराध्यक्ष अभिजीत करंजुले - पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या पदाधिका-यांनी 'उध्दवजी जगाव कसं ते सांगा' असा सवाल करत भाजपा कल्याण जिल्हा मंडळाअंतर्गत मुख्यमंत्रांना ५० हजाराहून अधिक पत्रे पाठवून वीज बिल रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. अंबरनाथ पश्चिम भागातील वीज मंडाळाच्या कार्यालयासमोर फॉल्टी मीटर जाळून निषेध घोषणा देत ठिय्या आंदोलन करण्यात आले.

# शिवसेनेचे कंगना राणावतच्या पुतळ्याला चप्पलमार आंदोलन

प्रतिनिधी ● ठाणे

अभिनेत्री कंगना राणावत 'मुंबई पाकव्याप्त काश्मिर का वाटत आहे'असे वादग्रस्त वक्तव्य करून मुंबई शहराबद्दल अनादर केल्याप्रकरणी शिवसेना नेते संजय राऊत यांना आव्हान दिल्याच्या निषेधार्थ कळवा शिवसेना विभाग प्रमुख विजय शिंदे यांच्या नेतृत्वखाली शुक्रवार(दि ४)ला कळवा नाका येथील शिवसेना शाखे बाहेर कंगनाच्या प्रतिमेला(पुतळ्याला) महिला शिवसैनिकानी चप्पल मारून निषेध आंदोलन केले व कंगना विरोधात घोषणाबाजी केली. या वेळी जिल्हा शिवसेना महिला संघटक लता पाटील,शाखा प्रमुख सुशांत मोरे,मुंब्रा कळवा विधानसभा संघटक विजय देसाई,राजेश निराळे,रोहन शिंदे,सुशीला लोखंडे,निर्मला ठाकूर,प्रतिभा परब आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.या वेळी कळवा पोलिसांचा बंदोबस्त मोठ्या प्रमाणावर होता.

# बिस्कीट देऊन आजीबाईचे दागिने लुटले

प्रतिनिधी ● ठाणे

७२ वर्षीय आजीबाईचा मोफत शिधावाटप देण्याच्या आमिष दाखवून तीन पार्लेजी बिस्कीटचे पुडे देऊन आजीबाईच्या अंगावरील लाखभर रुपयांचे सोन्याचे दागिने लुटल्याचा प्रकार उल्हासनगर येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात दोन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे.

उल्हासनगर कॅम्प नंबर १ येथे राहणाऱ्या ७२ वर्षीय आजीबाई गुरुवारी दुपारी दत्तवाडी येथील पोस्ट कार्यालयात जाण्यासाठी घरातून निघाल्या होत्या. दरम्यान वाटेत त्यांना एक अनोळखी इसम भेटला आणि त्याने ''आजी तुम्हाला राशन पाहिजे का ?' असे विचारले असता आजीबाईच्या होकार दिला आणि तो इसम आजीबाईचा दत्तवाडी येथील एका इमारतीजवळ घेऊन गेला, त्या ठिकाणी असलेल्या दुसऱ्या इसमाने आजीबाई तुमच्या अंगावरचे सोन्याचे दागिने काढून ठेवा नाहीतर तुम्हाला मोफत राशन मिळणार नाही असे सांगून एकाने आजीबाईच्या अंगावरील दागिने काढून एका पिवळ्या रंगाच्या पिशवी पिशवी आजीबाईच्या हातात दिली. आजीबाईच्या ती पिशवी दुसऱ्या पिशवीत ठेवली, दरम्यान हे दोघे अनोळखी इसम राशन आणतो म्हणून निघून गेले.

बराच वेळा झाला हे दोघे राशन घेऊन आले नाही म्हणून आजीने दागिन्यांची पिशवी बाहेर काढून ती उघडून बघितली असता त्यात दागिन्यांऐवजी तीन पार्लेजी बिस्कीटचे पुडे आढळून आले. आपली फसवणूक झाल्याचे कळताच आजीबाईने उल्हासनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी दोन अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्याचा कसून शोध घेण्यात येत असल्याची माहती पोलिसांनी दिली

# भिवंडीतील प्रवासी वाहतूक सुधारण्यासाठी आमदारांचे परिवहनमंत्र्यांना साकडे

वार्ताहर ● भिवंडी

कामगार नगरी व दाटीवाटीचे शहर म्हणून भिवंडी शहराची देशभर ओळख आहे.यंत्रमाग उद्योग व गोदाम पट्ट्यामुळे येथे लोकसंख्या देखील झपाट्याने वाढली आहे. त्यातच अरुंद रस्ते व मर्यादित बस फेऱ्या यांमुळे भिवंडीकरांना इतर शहरांमध्ये प्रवास करण्यासाठी मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत.नागरिकांच्या या समस्या लक्षात घेवून भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांची बुधवारी भेट घेतली व भिवंडीत एसटी बस फेऱ्या वाढविण्याची विनंती लेखी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात भिवंडीतील



नागरिकांसाठी वाढीव बस फेऱ्या आणि सुधारित मार्ग, भिवंडी एसटी आगाराचे नूतनीकरण तसेच भिवंडीवासीयांच्या परिवहन सुविधांकरिता आरटीओ कॅम्प आयोजित करण्याबाबत परिवहनमंत्र्यांकडे मागणी केली आहे. आपल्या मागण्यांना परिवहन मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून शहराच्या वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेण्याकरिता परिवहन मंत्री स्वतः भिवंडी शहरास भेट देणार असल्याची माहिती आमदार रईस शेख यांनी दिली आहे.

# अंबरनाथच्या बारकुपाडा परिसरात वाढीव वीज बिल

## बिल दुरुस्त करून देत नाही तोपर्यंत भरणा न करण्याचा निर्णय

वार्ताहर ● अंबरनाथ

अंबरनाथ पश्चिम भागातील बारकुपाडा परिसरात राज पारधी समाजाची मोठी वस्ती आहे. लॉक डाऊन च्या काळात या समाजातील प्रत्येक घराला वाढीव वीज बिल देण्यात आले आहे.

वाढीव वीज बिलाच्या विरोधात काँग्रेस पक्ष देखील आक्रमक झाला आहे. जोपर्यंत बिल दुरुस्त करून देत नाही तोपर्यंत वीज बिल न भरण्याचा निर्णय काँग्रेस पक्षाने घेतला आहे. विज बिल वरून सर्वत्र गोंधळ सुरू असतानाच अंबरनाथ शहरात देखील गेल्या चार ते पाच महिन्याची वीज बिलातील तफावत सरसकट एकाच बिलामध्ये देण्यात आल्याने शहरात गोंधळाची



परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच बारकुपाडा परिसरात राहणाऱ्या राज पारधी समाजाच्या वस्तीला देखील मोठ्या प्रमाणात बिल देण्यात आले आहे. घर लहान असताना देखील एवढ्या मोठ्या प्रमाणात वीज बिल देण्यात आल्याने या भागातील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. राज पारधी समाजाच्या वतीने स्थानिक पातळीवर बैठक घेऊन याप्रकरणी कडक भूमिका घेण्यात आली आहे. काँग्रेसचे मागासवर्गीय सेलचे उपाध्यक्ष सुधीर जाधव यांच्या नेतृत्वाखाली या समाजातील नागरिकानि विज बिल दुरुस्त करून देण्याची मागणी वीज वितरण विभागाकडे केली आहे. जोपर्यंत विज बिल दुरुस्त करून दिले जात नाही तोपर्यंत बिल न भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याप्रकरणी वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेत काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चा केली. यावर वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी देखील सकारात्मक भूमिका घेत या भागात शिबिर घेऊन फॉल्टी मीटर तपासण्याची मोहीम राबवली जाईल असे आश्वासन दिले आहे. याप्रकरणी अंबरनाथच्या तहसीलदारांना देखील निवेदन देण्यात आल्याचे जाधव यांनी स्पष्ट केले.

# लॉकडाऊनचे पालन न करणाऱ्यांना उल्हासनगरात ठोठावला जाणार जबर दंड

वार्ताहर ● उल्हासनगर

लॉकडाऊन हे ३० सप्टेंबर पर्यंत निश्चित करण्यात आले आहे.बाजारपेठा,दुकाने सायंकाळी ७ वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत.त्यासाठी पालिका आयुक्त डॉ.राजा दयानिधी यांनी दुकानदार व नागरिक यांच्यासाठी कडक आदेश जाहीर केले आहेत.दोनदा आदेशाचे उल्लंघन केल्यास आर्थिक दंडाची वसूली व तिसरी चूक केल्यास दुकानदाराचे दुकान बंद तर मास्क टाळणाऱ्या नागरिकांवर एफआयआर असे आदेश डॉ.दयानिधी यांनी जारी केले आहेत.जनसंपर्क अधिकारी युवराज भदाणे यांनी ही माहिती दिली.

उल्हासनगरात ९ हॉटस्पॉट होते.ते २ वर आले आहेत.याठिकाणी पूर्वीसारखे निर्बंध कायम ठेवण्यात आले आहेत.मॉल,बार,स्विमिंगपूल,सिनेमागृ हे बंद ठेवली जाणार असून उर्वरित सर्व शहरातील बाजारपेठा,दुकाने,भाजीपाला हे सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत.दुकानात सोशल डिस्टनिंग,सॅनिटायझर,हॅन्डवॉश बंधनकारक आहे.सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास पहिल्या वेळेस २ हजार रुपये,दुसऱ्या वेळेस ५ हजार रुपये दंड व तिसरी चूक केल्याचे दिसताच दुकान बंद केले जाणार आहे.तसेच नागरिक विनामास्क आढळतात पहिल्या वेळेस ५०० रुपये,दुसऱ्या वेळेस १ हजार रुपये दंड व तिसऱ्या चुकीला थेट स्थानिक पोलीस ठाण्यात एफआयआर असे डॉ.राजा दयानिधी यांनी आदेशात म्हटले आहे.

उल्लंघन करणाऱ्या दुकानदार,नागरिकांवर दक्षता समितीतील प्रमुख त्यांच्या टीमसोबत वॉच ठेऊन कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# बाईक ॲम्ब्युलन्सवरुन होणार ॲंटीजन टेस्टींग

**ठाणे** ● ठाणे महापालिका क्षेत्रात कोरोना कोविड १९ च्या चाचण्यांची संख्या वाढवण्याच्या दृष्टीकोनातून महापालिकेकडे उपलब्ध असलेल्या बाईक ॲब्युलन्सचा वापर आता ॲन्टीजन टेस्टींगसाठी करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी घेतला आहे. प्रभाग समितीतंर्गत अंटीजन टेस्टीग सेंटर सुरू करण्यात आले. तथापि चाचण्यांची संख्या वाढावी या दृष्टीकोनातून महापालिकेकडे उपलब्ध असलेल्या ॲम्ब्युलन्सचा विनियोग ॲन्टीजन टेस्टींगसाठी करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी घेतला आहे. आरोग्य विभागाकडे १७ बाईक म्ब्युलन्स उपलब्ध असून या म्ब्युलन्स प्रभाग समितीनिहाय वितरित करण्यात येणार आहेत.

# अंबरनाथमध्ये मोहरम निमित्त मशिदीत एकत्र येणाऱ्या ४० जणांवर गुन्हे दाखल

वार्ताहर ● अंबरनाथ

## सोशल डिस्टन्स आणि मास्क न लावता जमले होते एकत्र

मोहरम सणानिमित्त एकत्र येऊन कोरोना नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी ४० जणांवर अंबरनाथ पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आलेत.

अंबरनाथच्या खुंटवली भागातील जामा मस्जिद येथे ३० ऑगस्टला मोहरमच्या निमित्ताने ३५ ते ४० जण एकत्र जमले होते.

याच कार्यक्रमादरम्यान दोन गटांमध्ये बाचाबाची झाली होती. गर्दी आणि बाचाबाचीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

व्हिडीओ मध्ये अनेकांनी सोशल डिस्टिंसिंग आणि तोंडाला मास्क लावले नसल्याचे दिसत होते. याची गंभीर दखल घेत अंबरनाथ पोलिसांनी सलीम चौधरी, अस्लम खान, युसूफ खान, आबीद शेख, यांच्यासह ३० ते ३५ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. दरम्यान कोणीही कोरोनाचा प्रादुर्भाव होईल असे गर्दीने धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक कार्यक्रम करू नये असे आवाहन प्रशासनांकडून केले जात आहे.

# सभापतींची एकात्मिक बालविकास प्रकल्पाला भेट

वार्ताहर ● टिटवाळा

## जिल्हा पातळीवरील समस्या सोडवण्याचे आश्वासन

ठाणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच सभापती रत्नप्रभा भगवान तारमळे यांनी कल्याण पंचायत समितीच्या एकात्मिक बालविकास प्रकल्प विभागास भेट दिली. यावेळी त्यांनी अंगणवाडी सुपरवायझर्सच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. जिल्हा पातळीवर त्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

ठाणे जिल्हा परिषदेवर शिवसेनेचे निर्विकार वर्चस्व आहे. राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत सहभागी आहे. झेडपी मध्ये भाजपा असलातरी सर्व मिळून एकच असल्याने जिल्हा परिषदेत विरोध पक्ष पद नाही. त्यामुळे राज्यातील एकमेव जिल्हा परिषद आहे. जिथे विरोधी पक्ष पद नाही. त्यामुळे शहापूर तालुक्यातील नडगाव जिप गटातून निवडून आलेल्या रत्नप्रभा भगवान तारमळे यांची महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदी बिनविरोध निवड झाली. पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच त्यांनी कल्याण पंचायत समितीच्या एकात्मिक बालविकास विभागास भेट दिली. यावेळी कल्याण पंचायत समितीच्या सभापती अनिता वाकचौरे, उपसभापती रमेश बांगर, जिल्हा परिषद सदस्य वृषाली शेवाळे, जयश्री सासे, भगवान तारमळे, पत्रकार संजय कांबळे, जयराम भोईर आणि प्रभारी प्रकल्प अधिकारी उषा लांडगे व इतर सुपरवायझर उपस्थित होत्या.

यावेळी सभापती रत्नप्रभा तारमळे या म्हणाल्या अंगणवाडी संस्कार केंद्र आहेत. सध्या त्या एखाद्या छोट्या रोपट्यांप्रमाणे आहेत.

त्यांचा वटवृक्ष बनवायचा आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. कारण त्या निरोगी राहिल्या तरच लहान मुले सदृड व निरोगी होतील. त्याच्या पोषण आहाराची विशेष काळजी घेतली पाहिजे ही अंगणवाडी ची मुले देशाचे भावी नागरिक आहेत. त्यामुळे अंगणवाडीचे काम म्हणजे मोठी देशसेवा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले तसेच कामात कोणत्याही प्रकारची हलगर्जी किंवा कामचुकारपणा चालणार नाही असा इशारा देखील देऊन चांगल्या कामाचे कौतुक देखील केले. कल्याण तालुक्यातील अंगणवाडीचे जास्तीत जास्त प्रस्ताव तयार करून ते पाठवावेत अशा सूचना देऊन कर्मचाऱ्यांच्या अडचणी व समस्या समजावून घेण्यासाठी व त्याची सोडवणूक करण्यासाठी येथे आल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपसभापती रमेश बांगर आपल्या आभारपर भाषणात म्हणाले, कल्याण पंचायत समितीच्या इमारतीचा प्रश्न जिल्हा परिषदेच्या इमारतीच्या अगोदर आम्ही मांडला.

याचा प्रस्ताव कल्याण डोंबिवली महानगर पालिकेकडे आहे. त्यामुळे मंत्रालयात भेट दिली, पालकमंत्री एकनाथ शिंदे यांना ही माहिती दिली आहे.

पंचायत समितीचे इमारत धोकादायक आहे. जीव मुठीत धरून लोकप्रतिनिधी व कर्मचारीवर्ग काम करतात. यावर झेडपीचे उपाध्यक्ष सुभाष दादा पवार यांनी तात्काळ इमारतीच्या दुरुस्ती साठी ७६ लाख रुपये मंजूर केले. परंतु आम्ही समाधानी नाही. कारण आमच्या कार्यकाळात नवीन इमारत व्हावी अशी आम्हा सर्व लोकप्रतिनिधींची इच्छा आहे.

दरम्यान सभापती तारमळे यांनी राबविलेल्या या नाविन्यपूर्ण संकल्पनेमुळे मला अधिक माहिती मिळाली व शिकायला मिळाले असे उपसभापती बांगर म्हणाले व सभापतींच्या या संकल्पनेचे कौतुक केले. तथापि यावेळी प्रभारी प्रकल्प अधिकारी उषा लांडगे व इतर सुपरवायझर यांनी विविध अडचणी व केलेल्या उपाययोजना यांची माहिती दिली. तर या प्रसंगी झेडपी सदस्या जयश्री सासे, वृषाली शेवाळे, पत्रकार संजय कांबळे आणि जयराम भोईर यांनी मार्गदर्शन केले.

## फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट, ७ ठार

**चेन्नई●**तामिळनाडूच्या कुडलोर जिल्ह्यातील एका फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट झाल्याची घटना घडली आहे. या घनटनेत आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला असून, तीन जण गंभीर जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे. स्थानिक प्रशासनाच्या मते या घटनेतील मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. कुडलोरचे पोलीस अधीक्षक एम श्री अभिनव यांनी या बाबत माहिती दिली आहे. घटनास्थळी मदतकार्य सुरू झाले असून, स्फोट नेमका कोणत्या कारनाने झाला याचा शोध घेतला जात आहे. कुडलोर जिल्ह्यातील कट्टुमनारकोली भागात असलेल्या फटाक्यांच्या कारखान्यात हा स्फोट झाला असल्याची माहिती मिळाली आहे.

# उत्तर महाराष्ट्रात उदासिनता; आरोग्य व्यवस्था सलाईनवर

**नाशिक●**कोरोनाकाळात रुग्णांना त्वरित आणि योग्य उपचार मिळणे आवश्यक असताना प्रत्यक्षात आरोग्य व्यवस्थेचे तीन तेरा वाजलेले दिसत आहे. विशेषत: नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेकडे सरकारचे लक्षच नसल्याचे दिसते. नाशिकमध्ये व्हेंटिलेटर्स असूनही ते धूळ खात पडून आहेत. भूसावळ येथे वेळेवर रुग्णवाहिका न मिळाल्याने एका महिला रुग्णाला अक्षरश: लोटगाडीवर रुग्णालयापर्यंत न्यावे लागले. तर नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांवर अजूनही रुग्णांना झोळी करुन हॉस्पिटलपर्यंत नेले जात आहे.



आपलं विशेष महानगर

भुसावळ शहरातील तेली मंगल कार्यालय परिसरात राहणाऱ्या कमलाबाई मालवीय नावाच्या महिलेला रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. प्रकृती ढासळत असल्याचे लक्षात आल्यावर नातेवाईकांनी रुग्णालयात नेण्यासाठी रुग्ण वाहिकेचा शोध सुरू केला. त्यासाठी भुसावळ नगर पालिकेच्या आरोग्य यंत्रणेला त्यांनी फोन करून संपर्क केला. मात्र रात्र झाल्याने चालक नसल्याने रुग्णवाहिका मिळू शकणार नाही असे उत्तर त्यांना देण्यात आले. रुग्णवाहिका मिळणार नसल्याने नातेवाईकांनी रिक्षा शोधण्याचा प्रयत्न केला.मात्र रिक्षाही वेळेवर मिळू शकली नाही. महिलेची प्रकृती जास्तच ढासळत असल्याचे लक्षात आल्यावर परिसरात असलेल्या हातगाडीवर या महिलेला नेण्याचा निर्णय नातेवाईकांनी घेतला आणि त्यानुसार त्यांनी महिलेला हातगाडीवर खासगी रुग्णालयात दाखल केले.



### नंदुरबार रुग्णांचा प्रवास झोळीतून

■नंदुरबार जिल्ह्यात तर आरोग्य व्यवस्था आहे की नाही अशी परिस्थिती आहे. जिल्ह्यातील काही आदिवासी पाड्यांपर्यंत रुग्णवाहिकाच पोहचत नाही. त्यामुळे रुग्णाला अक्षरश: झोळीत टाकून १५ ते २० किलोमीटरचा प्रवास करीत रुग्णालयापर्यंत पोहचवले जात आहे.

### स्मार्ट नाशिकमध्ये व्हेंटिलेटर्सची ‘धूळधाण’

स्मार्ट सिटी म्हणून मिरवणाऱ्या नाशिक शहरात एकीकडे रुग्णांना उपचारासाठी व्हेंटिलेटर मिळताना दिसत नाही. दुसरीकडे महापालिकेच्या रुग्णालयातील व्हेंटिलेटर अक्षरश: धूळ खात पडून आहे. महापालिकेच्या बिटको रुग्णालयात तब्बल १५ व्हेंटिलेटर ऑक्सिजनच्या प्रतीक्षेत आहेत. या व्हेंटिलेटरने आजवर शेकडो रुग्णांचे प्राण वाचवणे अपेक्षीत होते. महत्वाचे म्हणजे कोरोनाशी लढण्यासाठी पीएम केअर फंडमधून ही व्हेटिलेटर महापालिकेला मिळाली आहेत. एकूण १५ पैकी २ व्हेंटिलेटर महापालिकेने खासगी रुग्णालयास दिली. उर्वरित येथे पडून आहेत. तसेच मोठा गाजावाजा करीत सुरु झालेले ठक्कर डोम येथील कोविड सेंटरमध्ये अद्याप एकही व्हेंटिलेटर सुरु नाही. वास्तविक, येथे ४२ व्हेंटिलेटरची व्यवस्था करण्यात आली असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले होते.

**उत्तर महाराष्ट्रात २४०५ मृत्यू**

| जिल्हा | आजवरचे कोरोना रुग्ण | बरे झालेले रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|---|
| नाशिक | ४०५६६ | ३२१३६ | ९११ |
| अहमदनगर | २३०१९ | १९९९१ | ३०६ |
| धुळे | ९२०४ | ७३१३ | २७० |
| जळगाव | २९६८८ | २१३४३ | ८४० |
| नंदुरबार | ३०७९ | १८९३ | ७८ |
| एकूण | १०५५५६ | ८२६७६ | २४०५ |

### धुळ्यात प्रथमोपचारापलीकडे काही नाही

धुळे शहरातील महापालिकेचे दवाखाने म्हणजे प्राथमिक तपासणी करा, गोळ्या घ्या आणि घरी जा अशा कार्यपद्धतीवर चालणारे आहेत. महापालिकेचे हे दवाखाने प्रथोमोपचारापलीकडे अधिक चांगली सेवा देऊ शकत नसल्याचे विदारक चित्र आहे.

## थोडक्यात

### फेसबुकवर आक्षेपार्ह कमेंट टाकणाऱ्या दोघांवर गुन्हा

**नाशिक●**फेसबुक पोस्टवर जातीवाचक कमेंट केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी प्रज्ञा शेखर बर्डे यांनी गंगापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी जगदीश काबरे व एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन समाजामध्ये शत्रुत्व निर्माण होण्याच्या दृष्टीने जगदीश काबरे व एकाने फेसबुकवर कमेंट केली. ही बाब प्रज्ञा बर्डे यांच्या निदर्शनास आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डी. एल. माळी करत आहेत.

### शहानिशा न करता गुन्हा दाखल; तीन पोलीस कर्मचारी अडचणीत

**नाशिक●**धमकीप्रकरणी शहानिशा न करता थेट गुन्हा दाखल करणाऱ्या तीन पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाने नाशिक पोलीस आयुक्तांना दिले आहेत. या आदेशामुळे नाशिक शहर पोलीस दलात खळबळ उडाली आहे. ही घटना २०१७ मधील असून, भद्रकाली पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. भद्रकाली पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक मंगलसिंग सूर्यवंशी, तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक मोहिनी लोखंडे, सहायक पोलीस निरीक्षक संतोष साबळे अशी अधिकाऱ्यांची नावे आहेत. तक्रारदार चंद्रकांत नारायण लासुरे, त्यांची पत्नी आणि भावाविरोधात धमकीप्रकरणी २०१७ मध्ये भद्रकाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकाने फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. विशेष म्हणजे, फिर्यादीने घटना आणि वेळेचा उल्लेख केला, त्या दिवशी लासुरे यांची पत्नी मुंबई व भाऊ तिरुपती बालाजी येथे होता. पोलिसांनीसुद्धा शहानिशा न करता थेट गुन्हा दाखल केला. याप्रकरणी तक्रारदार चंद्रकांत लासुरे यांनी राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे दाद मागितली. तक्रारीत अनेक पुरावे असल्याने या प्रकरणाची चौकशी झाली. चौकशीअंती आता आस्थापनाचे विशेष पोलीस निरीक्षक राजेश प्रधान यांनी तीन पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश नाशिक पोलीस आयुक्तांना दिले आहेत.

### संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष ॲड.आखरे यांच्यातर्फे धान्य वाटप

**नाशिक●**मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांच्या वाढदिवसानिमित्त नाशिक येथील गाडगे महाराज धर्मशाळा येथे मिठाई व फळवाटप करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष स्वप्निल इंगळे यांनी प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे यांनी बहुजन समाजासाठी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी धर्मशाळा व्यवस्थापक कुणाल देशमुख, शंकरराव ठाकरे, नागेश लोंदे, जितेंद्र ठाकरे, नारायण राऊत यांसह संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष स्वप्निल इंगळे, जिल्हासचिव नितीन रोठे पाटील, शहराध्यक्ष प्रफुल्ल वाघ, सरचिटणीस विक्रम गायधनी, लखन बावसकर आदी उपस्थित होते. विक्रम गायधनी यांनी प्रास्ताविक तर प्रफुल्ल वाघ यांनी आभार मानले.

## निधन वार्ता

### रामदास चव्हाण



**इगतपुरी●**तालुक्यातील सहकार क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व रामदास पा. चव्हाण यांचे नुकतेच निधन झाले. सहकार क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव व तालुक्यातील विविध संस्थांवर काम करून आपल्या कार्याचा ठसा रामदास चव्हाण यांनी उमटवला. राजकारणाबरोबरच अध्यात्मावर त्यांची चांगली पकड होती. घोटी बाजार समितीचे सभापतीपद तसेच खरेदी विक्री संघ, सहकार बोर्ड, पंचायत राज समिती, सहकारी संस्था आदींवर त्यांनी प्रभावी कामकाज केले. अध्यात्मावर त्यांची पकड होती. जुनी मॅट्रिकपर्यंत शिक्षण असूनही आपल्या भावंडांना व कुटुंबियांना उच्चशिक्षित करण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या पश्चात पत्नी मुले, मुली, सून, नातवंडे, भाऊ, पुतणे असा परिवार आहे. नाशिक न्यायालयातील सरकारी वकील जी. पी. चव्हाण व ॲड. एन. पी. चव्हाण यांचे ते थोरले बंधू होत.

### संपतराव वाघ



**ओझर●**आंबे दिंडोरी येथील संपतराव पुंडलिक वाघ (७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, मुलगी व नातू असा परिवार आहे. न्यू इंग्लिश स्कूल आंबे दिंडोरीचे शिक्षक शाम वाघ यांचे ते वडील होत.

### त्र्यंबकराव पवार



**नाशिक●**सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता त्र्यंबकराव छोटू पवार (७७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, ६ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पवार ऑटो ग्रुपचे संचालक मोहन पवार यांचे ते वडील होत.

## पोलीस आयुक्त दीपक पांडे यांनी स्वीकारला पदभार

**नाशिक●**नूतन पोलीस आयुक्त दीपक पांडे यांनी शुक्रवारी (दि. ४) सकाळी मावळते पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांच्याकडून पदभार स्वीकारला. लगेच कामकाज सुरु करत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून नाशिक महानगराचा आढावा घेतला. विश्वास नांगरे-पाटील यांनी पदभार देऊन लगेच मुंबईकडे प्रस्थान केले.



१९९९ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले पांडे यांनी मुंबई, अकोला, राजभवन आदी ठिकाणी कर्तव्य बजावले आहे. शुक्रवारी त्यांनी पदभार स्विकारल्याने पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले, उपायुक्त अमोल तांबे, उपायुक्त विजय खरात आदींनी त्यांचे स्वागत केले. पोलीस आयुक्तांची बदली झाल्यावर नवीन आयुक्त पदाची सूत्रे घेतात, त्यावेळी मावळते आयुक्त नवीन आयुक्तांना अधिकाऱ्यांची ओळख करून देतात. त्यानंतर दोघेही माध्यमांशी संवाद साधतात. यावेळी मात्र असा कोणताही संवाद साधण्यात न आल्यामुळे महानगरात चर्चेचा विषय ठरला. मावळते पोलीस आयुक्त नांगरे-पाटील यांनी ओडिओ क्लिपमध्ये म्हटले आहे की, आज मी पोलीस आयुक्तपदाचा चार्ज नवे आयुक्त दीपक पांडे यांच्याकडे सुपुर्द करून मुंबईकडे सहआयुक्त पदाचा चार्ज घेण्यासाठी रवाना होत आहे. गत दीड वर्षे प्रगत, सुधारणावादी शहराची सेवा करण्याची संधी मिळाली. महानगरला सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, पौराणिक, ऐतिहासिक परंपरेचा ठेवा आहे. नाशिकची जनताच मुळात प्रगल्भ आहे. कायद्याचे पालन करणारी आहे. सदैव प्रशासनाच्या पाठीशी प्रशासनाच्या उपक्रमात सहभाग नोंदवणारी आहे. त्यामुळे नाशिक महानगराची प्रगती वेगाने होत आहे. या शहराच्या प्रगतीसाठी आपल्या सगळ्यांच्या सुरक्षेसाठी सर्वांच्या आरोग्यासाठी सुयश चिंततो.

## रस्त्यावर प्रसूती; महिला कोरोनाबाधित

**नवीन नाशिक●**रस्त्यावरच प्रसूती झालेल्या महिलेचा कोरोना रिपोर्ट पॉझिटिव्ह आला असल्याची बाब समोर आली आहे. प्रसूतीपूर्व तपासणीवेळी या महिलेचा स्वॅब घेण्यात आला होता. त्याचा अहवाल आज (दि.४) पॉझिटिव्ह आला आहे. त्यामुळे या महिलेला व तिच्या बाळाला तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून नवजात बलिकेचाही स्वॅब घेण्यात आला आहे.



महिला कोरोना पॉझिटिव्ह आल्याने रस्त्यावर तिची प्रसूती करणाऱ्या नगरसेविका भाग्यश्री ढोमसे व अन्य महिलांची तपासणी करण्यात येणार आहे. श्री स्वामी समर्थ रुग्णालय, मोरवाडी, येथून घरी जात असताना रस्त्यातच संगीता लोंढे या महिलेची प्रसुती झाल्याची घटना गुरुवारी घडली होती. सुदैवाने ही महिला आणि तिचे बाळ सुखरुप आहे. प्रसूतीपूर्व तपासणी वेळी घेण्यात आलेल्या कोरोना चाचणीचा अहवाल पॉझिटिव्ह आल्यामुळे या महिलेवर उपचार करणाऱ्या डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचीही कोरोना चाचणी होण्याची शक्यता आहे.

**राष्ट्रवादी महिला काँग्रेसची भेट**

राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या नाशिक शहराध्यक्ष अनिता भामरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शुक्रवारी रुग्णालयाला भेट दिली. वैद्यकीय अधिक्षक डॉ. छाया साळुंखे, डॉ. शितल मोगल यांच्याशी संवाद साधला. ती महिला काहीही न सांगता आणि डॉक्टरांनी दिलेला सल्ला न पाळता घरी गेली. त्यामुळेच तिची रस्त्यातच प्रसुती झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या शिष्टमंडळात पश्चिम विधानसभा अध्यक्ष पुष्पलता राठोड, सिडको विभागीय अध्यक्ष सुवर्णा कोठावदे, शहर पदाधिकारी सुजाता कोल्हे, लता चौधरी, गायत्री बोरसे, अश्विनी अमृतकर आदी महिलांचा समावेश होता.

## राजापूरकरांच्या नाणेसग्रहाचे वर्ल्ड रेकॉर्ड

**नाशिक●**सराफ असोसिएशनचे नाशिकचे अध्यक्ष तथा राष्ट्रीय मुद्रा परिषदचे राज्य अध्यक्ष चेतन राजापूरकर यांच्या नाणे संग्रहाची जागतिक पातळीवर दखल घेण्यात आली आहे. या नाणेसंग्रहाची जिनियस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, आणि वंडर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड यात नोंद करण्यात आल्याने नाशिकच्या इतिहासात मानाचा तुरा रोवला गेला आहे. नाशिकचे जिल्हाधिकारी सूरज मांढरे यांच्या हस्ते शुक्रवारी हे प्रमाणपत्र देण्यात आले.



गेल्या वीस वर्षांपासून चेतन राजापूरकर यांनी पुरातन नाण्यांचा संग्रह जोपासला आहे. यात इसवीसन पूर्व ६०० ते १००० या कालखंडातील सातवाहन पूर्व काळ, सातवाहन, क्षत्रप, अभिर, कल्चुरी, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव आदि घराण्याची नाणी या संग्रहात बघायला मिळतात. सुमारे साडेसात हजार नाणी प्रकाशित करण्यात आली आहेत. शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात जिल्हाधिकारयांच्या हस्ते त्यांना वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी ज्येष्ठनाणी संग्राहक पुरूषोत्तम भार्गवे, लक्ष्मीकांत वर्मा उपस्थित होते. कोरोनाचे संकट विचारात घेउन सोशल डिस्टिंगसिंग आणि शासकीय नियमांचे पालन करत हा कार्यक्रम संपन्न झाला. राजापूरकर यांच्या या रेकॉर्डचे सर्वच स्तरातून कौतक होत असताना त्यांनी केलाला संग्रह बघण्याची नागरीकांना आता उत्सुकता लागून आहे.

## ‘आयमा’च्या वर्धापन दिन मोफत कोरोना तपासणी

**नवीन नाशिक●**आयामा व नाशिक महानगरपालिकेच्या वतीने शिबिराचे उदघाटन बुधवार दि २ रोजी नाशिक रोटरीचे गुरुमित सिंग रावळ, आयमा अध्यक्ष वरून तलवार, रोटरी नाईन हिल्सचे विजय जोशी यांच्या हस्ते झाले. हे शिबिर येत्या ९ सप्टेंबर पर्यंत अंबड औद्योगिक वसाहतीमधील उद्योजक, कामगारांची दररोज सकाळी १० ते ३ या वेळेत मोफत कोरोना रॅपिड अँटीजेन टेस्ट करण्यात येणार आहे.

यावेळी व्यासपीठावर आयमाच्या सल्लागार समितीचे चेअरमन धनंजय बेळे, सरचिटणीस ललित बुब, उपाध्यक्ष निखिल पांचाळ, माजी अध्यक्ष राजेंद्र अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचा व उपस्थित कोरोना योद्धे डॉ. स्वप्निल बगाड, नलिनी सूर्यवंशी, शिन्दे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आयामाचे सरचिटणीस ललित बुब, माजी अध्यक्ष राजेंद्र हिरे, ज्ञानेश्वर गोपाळे , उपाध्यक्ष निखिल पांचाळ, सुदर्शन डोंगरे, रवीन्द्र झोपे, गोविन्द झा, राहुल गांगुर्डे, जयंत पगार, अविनाश मराठे एस.एस.भोगल, प्रमोद वाघ, प्रेरणा बेळे, जगदीश पाटील, देवेंद्र राणे, वैभव चावक तुषार भोजने आदी उद्योजक उपस्थित होते.

## मुद्रांक शुल्कापासून सिडको, म्हाडा राहणार वंचित

**नवीन नाशिक●**राज्य सरकारने दि.१ सप्टेंबर पासून लागू केलेल्या ३ टक्के मुद्रांक शुल्क कपातीचा लाभ सिडकोच्या मिळकतींना मिळत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड बसत असून राज्य शासनाने या नियमात बदल करून, सवलतीचा फायदा सिडको,म्हाडा तसेच एमआयडीसीच्या मिळकत खरेदीसाठीही द्यावा अशी मागणी नागरिक संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. याप्रकरणी स्थानिक आमदारांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याची मागणी करण्यात आली आहे.




कोरोना मुळे निर्माण झालेल्या स्थितीत सर्वसामान्य नागरिकांना घर खरेदी करण्यासाठी दिलासा मिळावा यासाठी राज्य शासनाने मुद्रांक शुल्कामध्ये मध्ये ३ टक्के कपात दिली आहे. सदरची सूट १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत मिळणार असून या काळात घर खरेदी दस्त नोंदवितांना तीन टक्के मुद्रांक शुल्क कपातीचा लाभ खरेदीदारास मिळणार आहे.परिच्छेद २५ नुसार सदरची सवलत लागू केली आहे. मात्र सिडकोच्या मिळकती ह्या परिच्छेद ६० अंतर्गत, हस्तांतरण या दस्ता मध्ये येत असल्याने मिळकत हस्तांतरण होते या कारणाने मुद्रांक शुल्कातील सवलतीचा लाभ दिलेला नाही. त्यामुळे नवीन नाशिक परिसरात राहणाऱ्या नागरिकांना मुद्रांक शुल्क सवलतीचा लाभ मिळत नाही. त्यामुळे त्यांना आर्थिक बोजा सहन करावा लागत आहे. वास्तविक सद्यस्थितीत सिडकोतील मिळकतीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात होत असून त्यांना मुद्रांक सुटीचा लाभ केवळ मिळकत हस्तांतरण होते म्हणून मिळत नसल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. सिडको,म्हाडा चे नागरिक हे राज्याचेच रहिवासी असून वेगवेगळ्या नियमावलींमुळे सिडको,म्हाडा च्या खरेदीदारांवर आर्थिक अन्याय होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. याबाबतीत ना.पश्चिमच्या आमदार सीमा हिरे यांनी लक्ष घालून ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून द्यावी व सिडको म्हाडा तसेच एमआयडीसीच्या मिळकतींना हस्तांतर दस्त मुद्रांक शुल्क मध्ये सवलत मिळवून द्यावी असे आवाहन नागरिक संघर्ष समितीचे अध्यक्ष गणेश पवार यांनी केले आहे.

### अधिवेशनात विषय



सिडको व म्हाडा मध्ये राहणारा बहुतांश मध्यमवर्गीय कामगार वर्ग आहे. सद्यस्थितीत कोरोनामुळे अर्थकारण बिघडलेले आहे. अशा स्थितीत मुद्रांक शुल्कातील कपातीचा लाभ मिळणे ही सर्वसामान्यांसाठी मोठी गोष्ट आहे. विधानसभेच्या अधिवेशनातही हा प्रश्न मांडणार आहे.

– **सीमा हिरे,** आमदार, नाशिक पश्चिम

# रिलायन्सच्या २५,२१५ कोटींच्या कराराला मंजुरी

**नवी दिल्ली●**रिलायन्स जिओ इन्फ्राटेल कंपनीच्या वायरलेस इन्फ्रास्ट्रक्चरच्या (मोबाइल टॉवर्स) २५,२१५ कोटी रुपयांच्या विक्रीसाठी भारत सरकारने ब्रुकफिल्ड असेट मॅनेजमेंटला मंजुरी दिल्याचे वृत्त आहे. टॉवर इन्फ्रास्ट्रक्चर ट्रस्टच्या माध्यमातून रिलायन्स जिओ इन्फ्राटेल ताब्यात घेण्यास दूरसंचार खात्याने ब्रुकफिल्डला मंजुरी दिल्याची माहिती आहे. ब्रुकफिल्ड ही कॅनडास्थित कंपनी असून देशभरातील १.३५ लाख मोबाइल टॉवर्सची विक्री या माध्यमातून होत असल्याचे वृत्त आहे. या प्रस्तावाला अर्थखाते, गृहखाते तसेच मध्यवर्ती बँकेने जुलैमध्ये मान्यता दिल्याचे जाणकारांनी सांगितले आहे. एक वर्षापूर्वी सदर प्रस्ताव सरकारपुढे विचारासाठी ठेवण्यात आला होता. मुकेश अंबानी अध्यक्ष असलेल्या रिलायन्सने जिओ प्लॅटफॉर्म्स या तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगामध्ये याआधीही सुमारे २० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक मिळवली होती.

# वाढीव वीज बिलांसंदर्भात राष्ट्रवादीचे महावितरणला निवेदन

**माणगाव ●** मार्च ते जुलै २०२० या लॉकडाऊनच्या काळात वीज ग्राहकांना आलेली वाढीव बिले कमी करावीत, अशी मागणी लोणेरे-गोरेगाव विभाग राष्ट्रवादी काँग्रेसने महावितरणकडे केली आहे. पक्षाच्या शिष्टमंडळाने वाढीव बिल कमी करण्यासंदर्भात महावितरणच्या गोरेगाव कार्यालयात अभियंता खांडेकर, बोराडे आणि धाहिंजे यांना भेटून निवेदन दिले.

यावेळी ज्येष्ठ नेते विकास गायकवाड, माजी उपसरपंच तथा विद्यमान सदस्य चंद्रकांत गोरेगावकर, उपसरपंच विनोद बागडे, सरचिटणीस भात्रे, विभाग युवा अध्यक्ष शिवाजी टेंबे, उप विभागीय अध्यक्ष विलास यादव, पन्हळघर बुद्रुक उपसरपंच राम भोस्तेकर, मुकेश कडू, समीर खुळे, मयूर यादव आदी उपस्थित होते.

# नेरळ-माथेरान टॅक्सी सेवा सुरू

वार्ताहर●नेरळ

माथेरान पर्यटन स्थळावर येणाऱ्या पर्यटकांना नेरळ घाट रस्त्याने सुखरूप प्रवास घडवून आणणाऱ्या नेरळ-माथेरान टॅक्सी सेवेची प्रवासी वाहतूक शुक्रवारपासून सुरू झाली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर माथेरान १७ मार्च २०२० पासून शासनाने बंद केले होते. आता १ सप्टेंबरपासून माथेरानचे पर्यटन सुरू करण्यात आले असून, पर्यटकांअभावी व्यवसाय बंद असल्याने ४५० टॅक्सी चालकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

येथील तरुणांनी १९८५ मध्ये नेरळ-माथेरान घाट रस्त्यावरून पर्यटक, इतर प्रवाशांना माथेरान दस्तुरी नाका येथे नेण्यासाठी टॅक्सीची प्रवासी वाहतूक सुरू केली. सध्या या मार्गावर ३०० प्रवासी टॅक्सी असून, त्यावर ४५० चालक काम करीत आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने माथेरान बंद केले होते. तेव्हापासून ही वाहतूक बंद झाली होती. त्यावेळी टॅक्सी चालकांना कुटुंबाची गुजराण करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय करण्याची वेळ आली होती. लॉकडाऊन काळात टॅक्सी चालकांना रिलायन्स फाऊंडेशन वगळता अन्य कोणत्याही संस्थेने मदतीचा हात पुढे केला नव्हता. त्यात गृह कर्ज आणि वाहन कर्ज यांचे हप्ते कसे फेडायचे, असा सवाल व्यवसाय बंद असल्याने त्यांना पडला होता.

माथेरान सुरू करण्याचा निर्णय झाल्यानंतर ३ सप्टेंबर रोजी नेरळ-माथेरान टॅक्सी संघटनेची विशेष बैठक घेण्यात आली. त्यात १०० हून अधिक टॅक्सी मालक आणि त्याहून अधिक चालक उपस्थित होते. बैठकीत सर्वांना व्यवसाय मिळाला पाहिजे यासाठी क्रमांकाप्रमाणे टॅक्सी सुरू करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले. एकाच वेळी माथेरान दस्तुरी नाका आणि नेरळ येथील प्रवासी वाहतूक सुरू करण्यावर एकमत झाले. पर्यटकांसाठी नेरळ-माथेरान टॅक्सी संघटना सज्ज असल्याची माहिती टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष प्रवीण पोलकम यांनी दिली.

My महानगर CONNECT

जाहिरात वितरण संपादकीय

ONLY WHATS APP

7 5 0 6 6 5 0 0 0 6

महत्वाचे

जाहिरात प्रतीच्या स्वीकृतीआधी जरी काळजी घेण्यात येत असली तरी त्यांच्यातील समाविष्ट बाबी तपासून पाहणे शक्य नाही . अशा समाविष्ट बाबींसाठी 'आपलं महानगर' वृत्तपत्र, मुंबई यांना त्यांच्या वृत्तपत्रे किंवा प्रकाश- नांमधील कंपन्या , संस्थांच्या किंवा व्यक्तिगत जाहिरातीं- सोबत झालेल्या व्यवहाराच्या परिणामस्वरूपी उद्भवलेल्या कोणताही तोटा किंवा नुकसानीस जबाबदार धरता येणार नाही. म्हणूनच आम्ही वाचकांना शिफारस करतो की त्यांनी जाहिरातींच्या संघर्भामधे जे असेल त्या स्वरूपामध्ये जाहिरातदार किंवा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही पैशांची रक्कम पाठवण्यापूर्वी किंवा त्यांच्याशी कोणताही करार करण्यापूर्वी आवश्यक चौकशी करावी.

## PUBLIC NOTICE

My Clients **Shrikant Arvind Patil & Snehal Shrikant Patil** are owners of **Flat No. 402,** in **Borivali Snehal Co-operative Housing Society Ltd.,** at **Kasturba Road No. 5, Borivali (E), Mumbai – 400 066.** Further Original Agreement executed between **M/s. Shreyas Builders & Associates** and **Mr. Rajendra Pragji Pandya** with respect to Said Flat has been misplaced / lost / not traceable.

All persons having any claim, charge of whatsoever nature in respect of the said Flat may lodge their claim, objection of whatsoever nature along with requisite proof of documents in my Office at : **D/8, Shri Krupa, Carter Road No. 5, Borivali (E), Mumbai – 400 066,** within **15 days** of publication of this Notice, failing which it will be deemed that there is no such claim, right, interest.

Sd/-
**ADVOCATE URMIL G. JADAV**
**B. Com, L.L.B., Mumbai**
Place: Mumbai Date: 05.09.2020

## PUBLIC NOTICE

NOTICE hereby given that **MRS. NEETA MAHESH RATHOD (Purchaser),** purchased the Flat No. C-803, Modi Park Building No.1 Co-operative Housing Society Ltd (C-Wing), having address at Hemukalani Cross Road No.3, Iraniwadi, Kandivali (West), Mumbai-400 067. Purchaser has applied for transfer, however share certificate is misplaced / lost the certificate bearing No.111 consisting of five shares of Rs.50/- each bearing distinctive Nos. from 551 to 555 (both inclusive) issued by the Society. The above purchaser has now applied to the Society for issue of duplicate share certificate along with transfer.

The Society hereby invites objections from any person or any institution or other claimants, having any claim against or to the above said shares and interest in the capital/property of the society by way of sale, mortgage, charge, gift, exchange, possession or otherwise, are hereby required to file their claim / objection within a period of 14 days from the publication of this notice with the undersigned, with copies of such documents and other proofs in support of his / her / their claims / objections for issue of duplicate shares to the above member. If no claims are received within the period prescribed above the Society shall be free to issue duplicate shares to the above member of the society as per the procedure provided under the bye laws of the Society.

**Place : Mumbai Date : 05/09/2020**
**For Modi Park Building No.1**
**Co-op. Hsg. Soc. Ltd.,**
**Hon. Secretary**

## PUBLIC NOTICE

**Mr. Jayantilal M. Shah** a Member holding **Flat No. 502** in **Raj Swastik Co-operative Housing Society Ltd.,** at **Daulat Nagar Road No. 3, Borivali (E), Mumbai – 400 066,** died intestate on 19/11/2019.

I, Adv. Urmil G. Jadav hereby invites claims or objections from the heir/s or other claimant/s or objector/s to the transfer of the said right, title & interest of the deceased holding said Flat within a period of **15 (Fifteen) days** from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of their claims or objections for transfer of right, title and interest of the deceased. If no claims or objections are received within **15 (Fifteen) days** at below address, the Society shall be free to deal with the right, title and interest of the deceased in such manner as is provided under the Bye-laws.

Sd/-
**ADVOCATE URMIL G. JADAV**
**B. Com, L.L.B., Mumbai**
Flat No. D/8, Shree Krupa Society,
Carter Road No. 5, Borivali (E),
Mumbai - 400066.
Place: Mumbai Date: 05.09.2020

## पॅरामोन कॉन्सेप्टस लिमिटेड

**सीआयएन: एल४५४००एमएच१९९२पीएलसी०७००७०**

युनिट: क्र. ६७, ६ वा मजला, ए विंग, सिल्वर अ‍ॅस्टरा, जे बी नगर, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०००५९. संकेतस्थळ: http://paramoneconcepts.com
ई–मेल आयडी:info@paramoneconcepts.com

### सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ च्या नियम ४७ सह वाचल्या जाणाऱ्या कलम २९ च्या अनुषंगाने. सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की, कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवार, सप्टेंबर १०, २०२० रोजी दुपारी ४:०० वा. युनिट: क्र. ६७, ६ वा मजला, ए विंग, सिल्वर अ‍ॅस्टरा, जे बी नगर, अंधेरी पूर्व, मुंबई – ४०००५९ येथील कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये ह्याकरीता होणार आहे:

१. जून ३०, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षावर विचार करण्यासाठी आणि स्विकारण्यासाठी.
२. मे. चॉइस इंटरनॅशनल लिमिटेड आणि मे.चॉइस इक्विटी ब्रोकिंग प्रायव्हेट लिमिटेडचे प्रवर्तक ह्यांच्याकडून सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ च्या नियम ३१ ए अंतर्गत कंपनीची प्रवर्तक आणि प्रवर्तक समूह श्रेणीमधून सार्वजनिक श्रेणीमध्ये वर्गवारी करण्यासाठी कंपनीद्वारे प्राप्त झालेल्या विनंतीवर विचार करणे.
३. अध्यक्षांच्या संमतीच्या अनुसार अन्य कोणतेही विषयावर विचार करण्यासाठी.

उपरोक्त नमूद सूचना आणि अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्ष नमूद बैठकीमधील संचालक मंडळाच्या संमतीनंतर कंपनीच्या http://paramoneconcepts.com ह्या संकेतस्थळावर आणि स्टॉक एक्स्चेंज च्या www.bseindia.gov.in ह्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पॅरामोन कॉन्सेप्टस लिमिटेड, करीता**
**सही/–**
**(स्वाती गुप्ता)**
**कंपनी सचिव**
**ठिकाण: मुंबई**
**दिनांक : ०४ सप्टेंबर,२०२०**

## V.R.WOODART LIMITED

CIN: L51909MH1989PLC138292
**Registered Office:** Shop No. 1, Rajul Apartments, 9, Harkness road, Walkeshwar Mumbai 400006 . Website:www.vrwoodart.com,
e-mail: investors@vrwoodart.com Tel: 022 4351 4444

Notice is hereby given that the 30th Annual General Meeting ('AGM') of the members of V.R.Woodart Limited (the 'Company') will be held on Wednesday, September 30, 2020 at 03:00 p.m. IST through Video Conferencing ('VC') to transact the business as set out in the 30th AGM Notice of the Company.

The AGM will be convened in compliance with applicable provisions of the Companies Act, 2013 & Rules framed thereunder ("the Act") and the Securities and Exchange Board of India ("SEBI") (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations") read with General Circular Nos. 14/2020, 17/2020 and 20/2020 dated April 08, 2020, April 13, 2020 and May 05, 2020 respectively issued by the Ministry of Corporate Affairs ('MCA Circulars') and Circular No. SEBI/HO/ CFD/ CMD1/ CIR/P/2020/79 dated May 12, 2020 issued by the Securities and Exchange Board of India ('SEBI Circular').

The MCA and SEBI have permitted listed companies to send the Notice of the AGM and the Annual Report during the calendar year 2020, only by email to shareholders, in view of the prevailing COVID-19 pandemic situation and difficulties involved in dispatch of physical copies. The Notice of the AGM together with the Annual Report will be sent to the shareholders electronically to the email IDs registered by them with the Depository Participant / the Company.

Shareholders are requested to register their email IDs and phone numbers with the Company or Sharex Dynamic (India) Private Limited, the Registrar and Share Transfer Agent, for receiving the Notice and Annual Report.

Please email the request to:
- Electronic Mode: Please contact your Depository Participant and register your details in your DEMAT Account as per the process advised by your DP.
- Physical Mode: send email to support@sharexindia.com and investors@vrwoodart.com for updating your details with relevant information.

The Company will provide its shareholders facility of remote e-voting through electronic voting services provided by National Securities Depository Ltd. The Notice and Annual Report will also be uploaded on the Company's website viz.www.vrwoodart.com and of BSE Limited viz. www.bseindia.com Members can attend and participate in the AGM through VC facility only. The detailed instructions for joining the AGM and e-voting on the resolutions for shareholders whose email IDs are registered and for those whose email IDs are not registered are provided in the notice of the AGM. Members attending AGM through VC shall be counted for the purpose of reckoning the quorum under Section 103 of the Companies Act 2013.

**By Order of the Board**
For **V.R.Woodart Limited**
**Juhi Nagpal (Company Secretary)**
**Date : 05.09.2020**
**Place : Mumbai**

## e-TENDER NOTICE

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

e-Tenders are invited from registered and experienced civil contractors registered with Government/Semi Government Organizations under appropriate class, & with MSEDCL for the civil works as listed below. The details of e-Tender are available at our web site **www.mahadiscom.in** Sale of tender document is from **05.09.2020 to 13.09.2020** and the due date of submission/uploading of tender documents is up to 13.00 Hrs. on **14.09.2020.** The technical bid shall be opened if possible on same day after 13.00 Hrs.

Contact person, Addl. Executive Engineer (Civil), Mob. No.8879629002.

| Tender No. | Name of Work | Est. cost Approx. (Rs.) | EMD (Rs) | Time limit | Tender cost |
|---|---|---|---|---|---|
| EEC/KYN/ T-011/ 2020–21 | Annual contract for daily upkeeping and cleaning at office in Tejashree building premises, Jt.MD office Goderej Hill and MSEDCL Karnik Colony Kalyan (W). | 35.40 lacs | 35,400/- | 12 Months | 2500+18% GST = (Rs.2950) |

**Sd/-**
**Executive Engineer. (Civil),**
**MSEDCL,Civil Division, Kalyan.**

## PUBLIC NOTICE

Take notice that vide an Agreement for sale dated 7th February 2012 duly stamp Duty paid as on 6th February 2012, my clients **Mrs. Shahnaz Salim Patel** had purchased a property and acquired full right, title interest from one **Mr. Kantilal Padaji Patil**, in respect of the property bearing **Flat No.12, 3rd Floor, Sai-Sadan Co-operative Housing Society limited, Plot No.A-101 & A-102, Sector-19, Koparkhairane, Navi Mumbai- 400709** vide an registered Agreement for sale dated 7th February 2012 under **Document Registration No. TNN8-00923-2012** And that the said client **Mrs. Shahnaz salim Patel** had lost/misplaced the **ORIGINAL REGISTRATION RECEIPT NO.949 dated 7th February 2012 of the said "AGREEMENT FOR SALE".**

A missing complaint has been lodged in **Deonar Police Station, Mumbai 400043** vide lost/missing registration **No. 972/2020 dated 02/09/2020** and they have issued a certificate of Missing dated 02/09/2020. Any Person in whose possession/custody the said **Registration Receipt** of the said Agreement for sale is or who comes across or finds the said **Registration Receipt** is hereby called upon to make the same known to or deliver the said **Registration Receipt** to the undersigned within **7 days** from the date of publication of this notice.

**Date: 05/09/2020**
**Sd/-**
**Adv. Vijay Suresh Raorane**
B/19, Deonar Shopping Center,
Deonar.
Municipal Colony, Govandi,
Mumbai- 400 043.

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that the Original Sale Agreement between M/s Sukan Builder and Shri Jethmal Vagtarmalji Jain in respect of schedule premises has been lost / misplaced and not traceable by present owner Mr. Hemendrakumar Juharmal Jain And Mrs. Veena Hemendrakumar Jain. Now my client Mr. Gaurav Jayantilal Dalvadi and Mrs. Nancy Gaurav Dalvadi are intend to purchase the below mentioned schedule of property from Mr Hemendrakumar Juharmal Jain and Mrs. Veena Hemendrakumar Jain who are the registered member of Shri Sejal Kripa Co-Operative Housing Society Limited by holding 5 fully paid up shares of Rs. 50/- each of the said Society bearing Distinctive Nos. 56 to 60 (all inclusive) under Share Certificate No. 12.

In view of obtaining clear title they are filed a police complaint with the N. M Joshi Marg Police Station.

Thus, any person or persons having possession of the above mentioned original document or having any rights by way of sale, exchange, mortgage, charge, lien, lease, tenancy, trust, maintenance, inheritance, possession, license, right, title, interest to or in any part thereof as legal heir/ successor in title should inform the undersigned within 15 days from the date of publication of this Notice with necessary documentary evidence of his/ their claims. If objection is not received within 15 days from the date of this publication thereof, my client will proceed to conclude the Agreement for Sale with present owners & no claims/objections received thereafter will be considered & claims of such person/s will deem to have been waived off, abandoned and/or treated as null and void hereafter.

Schedule of Property

The residential premise being Flat No. 12 admeasuring approximately 644 sq. ft. of carpet area at Flat No. 12, 3rd Floor, Sejal Bldg., Subhash Nagar, N.M. Joshi Marg, Mumbai-400011 constructed in or about the year 1973 situate on land bearing Plot no. 13, CS No. 62 and 1/62 of N.M.Joshi Marg, Lower Parel Division, Mumbai. 400011.

Place: Mumbai
Date: 05.09.2020
ASHOK ANAND RAO
Advocate of:
Mr. Gaurav Jayantilal Dalvadi
Mrs. Nancy Gaurav Dalvadi
B/7, Ground Floor, Rangwala Building
Dr. E. Moses Road, Jacob Circle, Mumbai-11
Mob : 7977919867/9869989886

## महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
दक्षिण मुंबई (विद्युत) सां.बां. विभाग, मुंबई बांधकाम भवन,१ ला मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई–०१. ईमेल पत्त : elsouthmumbai.cc@mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक : ०२२–२२००८४४८

### ई–निविदा सुचना क्र.२० निविदा सन २०२०–२१

कार्यकारी अभियंता दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, सां.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विद्युत अनुज्ञापतीधाकर कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता प्रारुप बी–२ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता दक्षिण मुंबई (विद्युत) विभाग, मुंबई यांना राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

कामाचे नांव: १) OW/MH/RB९०/११२१/२०१९–२०.Providing Holo-graphic Projection system for Bunker at Rajbhavan, mumbai.

अंदाजित किंमत रुपये : २,४५,६१,२९६/–

ई–निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक ०५.०९.२०२० दुपारी १२.०० पासून ते दिनांक २९.०९.२०२० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत

निविदापूर्व बैठक स्थळ व दिनांक :– दिनांक २१.०९.२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय, पुणे प्रादेशिक विद्युत मंडळ, सा.बां.विभाग, पुणे

ई–निविदा उघडणे :– दिनांक ३०.०९.२०२० रोजी दुपारी १३.०० नंतर (शक्य असल्यास) अधीक्षक अभियंता (वि). पुणे प्रादेशिक विद्युत मंडळ, सा.बां.विभाग,पुणे खालील संकेतस्थळावर ई–निविदांची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. https://mahatenders.gov.in
(सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२.कार्यकारी अभियंता दक्षिण मुंबई (विद्यत) विभाग, सा.बां.विभाग, मुंबई फोर्ट, मुंबई, कार्यालयातील सूचना फलक.
३. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफिकेशन क्रायटेरिया समाविष्ट केलेल्या आहे.

जा.क्र.–काअ/दमुविवि/नि.लि./२७९७/२०२०
दिनांक :– ०३.०९.२०२०
डीजीआयपीआर/२०२०–२०२१/क्र५/सी६५४

सही/–
सुनिता गवते
दक्षिण मुंबई विद्युत विभाग
सा.बां.विभाग, मुंबई.

## बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. उप मुख्य अभि/एम आणि ई/ १६०५/ प ऊ दिनांकित ०२.०९.२०२०

**ई–निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकाचे महानगरपालिका आयुक्त पात्र बोलीदारांकडून शतमान तत्वावर खालील कामासाठी ऑन लाईन ई–निविदा मागवित आहेत. बोली सुरु होण्याचा दिनांक आणि वेळ आणि बोली समाप्तीचा दिनांक आणि वेळ बृमनपाच्या संकेतस्थळावरील टेंडर्स विभागामधील तपशिलवार निविदा सूचनेमध्ये देण्यात आली आहे.

| बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई **ई–निविदा सूचना** | |
|---|---|
| विभाग | मुख्य अभि. (एम आणि ई) |
| विभाग | उप मुख्य अभि. (एम आणि ई) प. ऊ. |
| ई–निविदा क्र. | ७१००१८०७८२ |
| विषय | आर/एन प्रभागामधील आर/एन प्रभाग कार्यालय (सीटीएस क्र. ९२१/७, जयवंत सावंत मार्ग, रुस्तमजी कॉलनी) दहिसर (प) च्या प्रस्तावित नवीन ठिकाणासाठी आवश्यक विद्युत उपकरणे, लॅन जोडणी आणि ईपीएबीएक्स यंत्रणेसह विद्युतीकरणाचे एसआयटीसी. |
| बोली सुरु<br>बोली समाप्ती | दिनांक: ०४/०९/२०२० वेळ: सकाळी ११.०० वा.<br>दिनांक: १०/०९/२०२० वेळ: सायं. १६.०० वा. |
| पोर्टल | http://portal.mcgm.gov.in |
| संपर्क व्यक्ती<br>ए) नाव<br>बी) संपर्क क्र. (कार्यालय)<br>सी) मोबाईल क्र.<br>डी) ई–मेल आयडी | ई.इ.(एम आणि ई) प.ऊ.– I<br>श्री. पी. सी. आयरे<br>०२२–२९६७७५८६<br>०२२–२९६७७९०५<br>eews०१.me@mcgm.gov.in |

निविदेच्या अधिक तपशिलासाठी इच्छुक निविदाकार महानगरपालिका संकेतस्थळ http://portal.mcgm.gov.in ला भेट देऊ शकतात.
निविदा कागदपत्रे टपाल/ कुरियर द्वारे पाठवली अगर स्विकारली जाणार नाहीत.

सही/–
पीआरओ/६४१/जाही/२०२०–२१
कार्य. अभि. (एम आणि ई)प. ऊ.

**जेथे जेथे पाणी साचते.तेथे तेथे डासांचे फावते.**

## THE NAVAL DOCKYARD CO-OP BANK LIMITED, MUMBAI-400023

### NOTICE OF THE 89th VIRTUAL ANNUAL GENERAL BODY MEETING

Notice is hereby given that the 89th Virtual Annual General Body Meeting of THE NAVAL DOCKYARD CO-OP BANK LTD., to be held on Friday, 25th September 2020 at 4.00 p.m. at Zonal Canteen, 1st floor, Near Gun Gate, Naval Dockyard, Mumbai - 400023 to transact the following business.

**AGENDA**

1) To read and confirm the minutes of the Annual General Body Meeting held on 3rd August 2019.
2) To consider and adopt 89th Annual Report of the Board of Directors for the year ended 31st March 2020 together with the audited statements of accounts including the Balance Sheet duly certified by the Auditor.
3) To approve the appropriation of the profit and to declare the dividend for the period ended 31-03-2020 as and when approved by RBI.
4) To appoint Concurrent Auditor/ Internal Auditor & Statutory Auditor for the year 2020-2021 and to apporve the remuneration for the same.
5) Leave of Absence to those members of the Bank who have not attended the 89th AGM.
6) Any other business that may be brought forward with the permission of the chair.
7) Vote of thanks.

National Anthem.

IF THE MEETING COULD NOT BE HELD FOR WANT OF QUORUM. THE SAME WILL STAND ADJOURNED AND SUCH ADJOURNED MEETING WILL BE HELD ON THE SAME DAY AND SAME PLACE AT 4.30 P.M.

**Place :** Mumbai
**Date :** 27.08.2020 **For & On Behalf of the Board of Directors**
**Sd/-**
**(P. B. Panigrahi)**
**Hon. Secretary**

**NOTE :**
1) Members desirous of any information shall give the notice of 7 days in writing prior to the Annual General Meeting to the Hon. Secretary to enable him to furnish the same.
2) The Members are requested to claim their Dividend by 30-09-2020 for the year 2016-2017 if not already claimed. Failing which the same will be forfeited and credited to the Statutory Reserve Fund according to the Bye - Laws No. 58 of the Bank.
3) Share holders are requested to notify immediately changes if any, in their addresses and nominees to the their resprctive Branches
4) The minutes of the Annual General Meeting held on 3rd August 2019 is incorporated in the Annual Report.

## PENTOKEY ORGANY (INDIA) LIMITED

**Regd. Off.:** Somaiya Bhavan, 45/47, M.G. Road, Fort, Mumbai - 400 001.
**Telephone:** (022) 6170 2100 / 164 **Fax:** (91-22) 2204 7297 / 3303
**Email:** investors@pentokey.com **Website:** www.pentokey.com
**CIN: L24116MH1986PLC041681**

### NOTICE OF THE 33rd ANNUAL GENERAL MEETING, E-VOTING AND BOOK CLOSURE

NOTICE is hereby given that the Thirty Third (33rd) Annual General Meeting ('AGM' or 'Meeting') of the Members of Pentokey Organy (India) Limited ('the Company') will be held on Tuesday, September 29, 2020 at 11.30 (IST) via two-way Video Conferencing ('VC') facility / Other Audio Visual Means ('OAVM') ONLY, to transact the businesses set out in the Notice of the AGM In accordance with the General Circulars issued by the Ministry of Corporate Affairs dated April 8, 2020, April 13, 2020 and May 5, 2020 (collectively referred to as 'MCA Circulars') and Securities and Exchange Board of India ('SEBI') Circular dated May 12, 2020, the Company will send the Notice of the 33rd AGM along with the link to the Integrated Annual Report for FY 2019-20 through electronic mode only, to those Members whose e-mail addresses are registered with the Company or Registrar & Transfer Agent, Datamatics Business Solutions Limited and Depositories. The requirement of sending physical copies of the Notice of the AGM has been dispensed with vide MCA Circulars and the SEBI Circular. The Integrated Annual Report 2019-20 of the Company, inter alia, containing the Notice and the Explanatory Statement of the 33rd AGM is available on the website of the Company at www.pentokey.com and on the website of the Stock Exchange viz. www.bseindia.com. A copy of the same is also available on the website of Central Depository Services (India) Ltd ('CDSL') at www.evotingindia.com. Remote e-Voting: In compliance with Section 108 of the Companies Act, 2013 ('the Act') read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended from time to time, Secretarial Standards - 2 issued by the Institute of Company Secretaries of India on General Meetings and Regulation 44 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company is providing to its Members the facility of remote e-Voting before the AGM and during the AGM in respect of the businesses to be transacted at the AGM and for this purpose, the Company has appointed CDSL for facilitating voting through electronic means. The detailed instructions for remote e-Voting are given in the Notice of the AGM. Members are requested to note the following: a. The remote e-Voting facility would be available during the following period: Commencement of remote e-Voting From 9.00 a.m. (IST) on Saturday, 26th September, 2020 End of remote e-Voting Upto 5.00 p.m. (IST) on Monday, 28th September, 2020. The remote e-Voting module shall be disabled by CDSL for voting thereafter and Members will not be allowed to vote electronically beyond the said date and time; b. The voting rights of the Members shall be in proportion to their share of the paid-up equity share capital of the Company as on Tuesday, 22nd September, 2020 ('Cut-Off Date'). The facility of e-Voting system shall also be made available during the Meeting and the Members attending the Meeting, who have not already cast their vote by remote e-Voting shall be able to exercise their right during the Meeting. A person whose name is recorded in the Register of Members / Register of Beneficial Owners as on the Cut-Off Date only shall be entitled to avail the facility of remote e-Voting before / during the AGM; c. Any person who acquires equity shares of the Company and becomes a Member of the Company after dispatch of Notice electronically of AGM but on or before the cut-off date i.e. Tuesday, 22nd September, 2020 can follow the process for generating the Login ID and Password as provided in the Notice of AGM, if their PAN is updated with their Depository Participants. However, such members who have not updated their PAN with their Depository Participants, on request their Login ID and Sequence No. will be sent separately by electronic means for generation of Password. If such a person is already registered with CDSL for e-voting, existing user ID and Password can be used for casting vote. d. Members who have cast their vote on resolution(s) by remote e-Voting prior to the AGM will also be eligible to participate at the AGM through VC/OAVM but shall not be entitled to cast their vote on such resolution(s) again. Registration of e-mail addresses: Members who have not yet registered their e-mail addresses are requested to follow the process mentioned below, before 5:00 p.m. (IST) on Tuesday, 22nd September, 2020, for registering their e-mail addresses to receive the Notice of the AGM and the Integrated Annual Report 2019-20 electronically and to receive login-id and password for remote e-Voting:

1. For Physical shareholders- please provide necessary details like Folio No., Name of shareholder, scanned copy of the share certificate (front and back), PAN (self attested scanned copy of PAN card), AADHAR (self attested scanned copy of Aadhar Card) by email to **Company's RTA Datamatics Business Solutions Limited on** anand_bhilane@datamaticsbpm.com
2. For Demat shareholders -, please provide Demat account details (CDSL-16 digit beneficiary ID or NSDL-16 digit DPID + CLID), Name, client master or copy of Consolidated Account statement, PAN (self attested scanned copy of PAN card), AADHAR (self attested scanned copy of Aadhar Card) to **Company's RTA Datamatics Business Solutions Limited on** anand_bhilane@datamaticsbpm.com.

If you have any queries or issues regarding attending AGM & e-Voting from the e-Voting System, you may refer the Frequently Asked Questions ("FAQs") and e-voting manual available at www.evotingindia.com, under help section or write an email to helpdesk.evoting@cdslindia.com or contact Mr. Nitin Kunder (022-23058738 ) or Mr. Mehboob Lakhani (022-23058543) or Mr. Rakesh Dalvi (022-23058542).

All grievances connected with the facility for voting by electronic means may be addressed to Mr. Rakesh Dalvi, Manager, (CDSL, ) Central Depository Services (India) Limited, A Wing, 25th Floor, Marathon Futurex, Mafatlal Mill Compounds, N M Joshi Marg, Lower Parel (East), Mumbai - 400013 or send an email to helpdesk.evoting@cdslindia.com or call on 022-23058542/43.

Book Closure: Notice is further given that pursuant to Section 91 of the Act and the Rules framed thereunder, the Register of Members and the Share Transfer Books of the Company will remain closed from Tuesday, 22nd September, 2020 to Tuesday, 29th September, 2020, (both days inclusive) for the purpose of the 33rd AGM

**For Pentokey Organy (India) Limited**
Sd/-
**Akshay Joshi**
**Company Secretary & Compliance Officer**
**Place: Mumbai**
**Date: 4th September, 2020**

My महानगर CONNECT जाहिरात, वितरण, संपादकीय 75066 50006



## थोडक्यात

### सीएसकेची अखेर सरावाला सुरुवात

**दुबई** ● चेन्नई सुपर किंग्सच्या (सीएसके) खेळाडूंनी शुक्रवारी नेट्समध्ये सरावाला अखेर सुरुवात केली. सीएसकेचा संघ २१ ऑगस्टला युएईमध्ये दाखल झाला. त्यानंतर सहा दिवस क्वारंटाईनमध्ये राहिल्यावर ते सरावाला सुरुवात करणार होते. मात्र, त्यांच्या दोन खेळाडूंना (दीपक चहर आणि ऋतुराज गायकवाड) आणि इतर काही सदस्यांना कोरोनाची बाधा झाल्याने त्यांना सराव करण्यासाठी आणखी काही काळ वाट पाहावी लागली. परंतु, कोरोना चाचणीचा अहवाल निगेटिव्ह आलेल्या खेळाडूंनी शुक्रवारपासून सरावाला सुरुवात केली. '१३ सदस्य, ज्यात २ खेळाडूंचा समावेश आहे, ते वगळता इतरांचा कोरोना अहवाल तिसऱ्यांदा निगेटिव्ह आला आहे. आता ज्यांचा अहवाल पॉसिटिव्ह आला आहे, त्यांची दोन आठवड्यांनी पुन्हा चाचणी केली जाईल,' असे सीएसकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

### अँडी मरे सरळ सेटमध्ये पराभूत

**न्यूयॉर्क** ● ब्रिटनच्या अँडी मरेला अमेरिकन ओपन ग्रँड स्लॅम टेनिस स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. त्याला कॅनडाच्या फेलिक्स ऑगर अलिआसिमेने २-६, ३-६, ४-६ असे सरळ सेटमध्ये पराभूत केले. या सामन्यातअलिआसिमेने चार वेळा मरेची सर्विस मोडली, तर मरेला एकदाही अलिआसिमेनेची सर्विस मोडता आली नाही. २०१९ ऑस्ट्रेलियन ओपननंतर ही मरेची ग्रँड स्लॅम स्पर्धा खेळण्याची पहिलीच वेळ होती. मात्र, दुसऱ्याच फेरीत त्याचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. मरेला मागील एका वर्षाहूनही जास्त काळ टेनिस खेळता आले नव्हते. त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यामुळे त्याच्या निवृत्तीची चर्चा सुरु होती. मात्र, आता पुन्हा फिट होऊन ग्रँड स्लॅम स्पर्धा खेळता आली याचा मरेला आनंद आहे.

### गयानाची बार्बाडोसवर मात

**तारौबा** ● रोमारिओ शेपर्ड आणि इम्रान ताहिरच्या भेदक गोलंदाजीमुळे गयाना अॅमेझॉन वॉरियर्स संघाने कॅरेबियन प्रीमियर लीगच्या सामन्यात बार्बाडोस ट्रायडेंट्सचा ६ विकेट राखून पराभव केला. या पराभवामुळे बार्बाडोसचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे. या सामन्यात बार्बाडोसला प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ बाद ८९ धावाच करता आल्या. गयानाकडून वेगवान गोलंदाज शेपर्डने २२ धावांत ३ गडी, तर लेगस्पिनर ताहिरने १२ धावांत ३ गडी बाद केले. ९० धावांचे लक्ष्य गयानाने १४.२ षटकांत गाठले. त्यांच्याकडून शिमरॉन हेटमायर (नाबाद ३२) आणि चंद्रपॉल हेमराज (२९) यांनी चांगली फलंदाजी केली. बार्बाडोसचा कर्णधार जेसन होल्डरने अवघ्या १० धावांतच २ विकेट घेतल्या, पण त्याला इतर गोलंदाजांची साथ लाभली नाही.

# सुमित नागलची अपयशी झुंज

## दुसऱ्या फेरीत डॉमिनिक थीमविरुद्ध पराभूत



**न्यूयॉर्क** ● भारताचा युवा टेनिसपटू सुमित नागल हा त्याच्या झुंजार खेळासाठी ओळखला जातो. त्याने अमेरिकन ओपन ग्रँड स्लॅम टेनिस स्पर्धेत मागील वर्षी महान रॉजर फेडररविरुद्ध अप्रतिम खेळ केला होता. यंदाही त्याने या स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत ऑस्ट्रियाच्या डॉमिनिक थीमविरुद्ध झुंजार खेळ केला. मात्र, त्याची ही झुंज अपयशी ठरली. दुसऱ्या सीडेड थीमने नागलवर ३-६, ३-६, २-६ अशी मात केली. थीमला यंदाची स्पर्धा जिंकण्यासाठी दावेदार मानले जात आहे.

नागल या स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत गारद झाला असला तरी त्याची कामगिरी कौतुकास्पद ठरली. ग्रँड स्लॅम टेनिस स्पर्धेत एकेरीची दुसरी फेरी गाठणारा नागल हा मागील सात वर्षांतील पहिला भारतीय खेळाडू ठरला होता. दुसऱ्या फेरीच्या सामन्यात थीमने सुरुवातीपासून आक्रमक खेळ केला, तर नागलनेही झुंज देत थीमवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पहिल्या सेटमध्ये ३-३ अशी बरोबरी झाली होती. मात्र, यानंतर थीमने त्याचा खेळ उंचावत सलग तीन गेम जिंकत पहिला सेट ६-३ असा खिशात टाकला. थीमने त्यानंतरही आपला चांगला खेळ सुरु ठेवत दुसरा सेट ६-३ असा जिंकला. तिसऱ्या सेटमध्ये नागलने पुन्हा झुंज देण्याचा प्रयत्न केला. त्याने एकदा 'मॅच पॉईंट'ही वाचवला. मात्र, थीमने पुढचा गेम जिंकत तिसरा सेट ६-२ असा जिंकला.

'धन्यवाद अमेरिकन ओपन २०२०. मला अजून खूप काही शिकायचे आहे. मी पुढेही मेहनत घेत राहणार आहे,' अशा शब्दांत सुमितने दुसऱ्या फेरीतील पराभवानंतर आपल्या भावना ट्विटरवर मांडल्या. सुमितला अमेरिकन ओपनमध्ये सिडींगही मिळाले नव्हते. परंतु, त्याने थीमसारख्या खेळाडूविरुद्ध झुंजार खेळ करत त्याच्यातील प्रतिभा दाखवून दिली.

### मेदवेदेव्ह, सेरेनाची आगेकूच...



**तिसऱ्या सीडेड रशियाच्या डॅनिल मेदवेदेव्हला अमेरिकन ओपनची तिसरी फेरी गाठण्यात यश आले. त्याने दुसऱ्या फेरीत ऑस्ट्रेलियाच्या क्रिस्तोफर ओकॉनेलचा ६-३, ६-२, ६-४ असा पराभव करत स्पर्धेत आगेकूच केली. त्याचा पुढील फेरीत अमेरिकेच्या जेरी वोल्फशी सामना होईल. दुसरीकडे सहाव्या सीडेड इटलीच्या माटेयो बेरेट्टीनीने उगो हमबर्टवर ६-४, ६-४, ७-६ अशी मात केली. महिला एकेरीत तिसऱ्या सीडेड सेरेना विल्यम्सने रशियाच्या मार्गरिटा गॅस्परायनचा ६-२, ६-४ असा सरळ सेटमध्ये पराभव करत तिसरी फेरी गाठली.**

# सीएसकेला आणखी एक धक्का

## हरभजनची आयपीएल स्पर्धेतून माघार



**दुबई** ●इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) स्पर्धा सुरु होण्यास काहीच दिवस शिल्लक असताना चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) संघाला आणखी एक धक्का बसला आहे. त्यांचा अनुभवी ऑफस्पिनर हरभजन सिंगने वैयक्तिक कारणांमुळे यंदा आयपीएलमध्ये न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वीच सीएसकेचा डावखुरा फलंदाज सुरेश रैनानेही वैयक्तिक कारणांमुळे आयपीएल स्पर्धेतून माघार घेतली होती. त्यामुळे स्पर्धा सुरु होण्याआधीच सीएसकेने दोन अनुभवी खेळाडू गमवाले आहेत.

'मी वैयक्तिक कारणांमुळे यंदा आयपीएल स्पर्धेत खेळणार नाही. सध्याचा काळ अवघड असून मला कुटुंबासोबत वेळ घालवायचा आहे. सीएसकेच्या संघ व्यवस्थापनाने मला समजून घेतले आणि मला पाठिंबा दिला आहे. सीएसके संघाला मी यंदाच्या आयपीएलसाठी शुभेच्छा देतो,' अशी हरभजनने ट्विट करत माहिती दिली. सीएसकेचे चेन्नईमध्ये पाच दिवस सराव शिबीर झाले होते आणि त्यानंतर हा संघ दुबईला रवाना झाला. या दोन्ही वेळी हरभजन सीएसके संघासोबत नव्हता. त्यामुळे त्याच्या उपलब्धतेबद्दल प्रश्न उपस्थित केले जात होते. आता त्याने यंदा आयपीएलमध्ये खेळणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

४० वर्षीय हरभजनने आतापर्यंत १६० आयपीएल सामन्यांत १५० गडी बाद केले आहेत. आता त्याच्या अनुपस्थितीत रविंद्र जाडेजा, मिचेल सँटनर आणि इम्रान ताहिर यांच्यावर प्रामुख्याने सीएसकेच्या फिरकीची धुरा असेल. तसेच करण शर्मा, पियुष चावला आणि साई किशोर या फिरकीपटूंचाही सीएसके संघात समावेश आहे.

# युएईत क्वारंटाईनमध्ये राहणे होते अवघड!

### मोहम्मद शमीचे उद्गार



**नवी दिल्ली** ●कोरोनामुळे भारतात मार्चच्या मध्यापासून क्रिकेट बंद आहे. त्यामुळे भारतीय क्रिकेटपटूंना घरातच बसून राहावे लागले आहे. मात्र, या काळातही वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने त्याचा सराव सुरु ठेवला होता. आता या मेहनतीचा लवकरच सुरु होणाऱ्या आयपीएल स्पर्धेत फायदा होईल अशी शमीला आशा आहे. तसेच चार महिने घरी राहण्यापेक्षाही युएईत सहा दिवस क्वारंटाईनमध्ये राहणे मला अवघड गेले आहे, असे शमी म्हणाला.

मागील चार महिन्यांचा काळ हा सर्वांसाठीच अवघड गेला, मग तो खेळाडू असो की सामान्य माणूस. नशिबाने माझ्या घरी क्रिकेटचा सराव सुरु ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध होती. आता युएईत दाखल होऊन सहा दिवस क्वारंटाईनमध्ये राहणे मला खूप अवघड गेले. हे सहा दिवस मागील चार महिन्यांहून अवघड होते असे मी म्हणीन. याचे कारण म्हणजे, चार महिन्यांच्या काळात मी सराव करत होतो, गरजुंना मदत करत होतो. मात्र, युएईत आल्यावर सहा दिवस मला काहीही करता आले नाही. आता पुन्हा मैदानावर उतरून क्रिकेट खेळण्यास मी आतुर आहे. लॉकडाऊनच्या काळातही मी घेतलेली मेहनत मला आता उपयोगी पडत आहे, असे शमीने सांगितले. शमी आयपीएलमध्ये किंग्स इलेव्हन पंजाब संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

# जर्मनी-स्पेन सामन्यात बरोबरी

### युएफा नेशन्स लीग फुटबॉल स्पर्धा

**स्टुटगार्ड** ● जोसे गायाने अखेरच्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे जर्मनी आणि स्पेन यांच्यातील युएफा नेशन्स लीग फुटबॉल स्पर्धेतील सामना १-१ असा बरोबरीत राहिला. या सामन्यात जर्मनीने बराच वेळ आपली आघाडी राखली होती. परंतु, ९० मिनिटांनंतरच्या नियमित वेळेनंतर चार मिनिटे वाढवण्यात आली. यात रॉड्रिगोच्या पासवर गायाने गोल करत स्पेनला एक गुण मिळवून दिला. याच सामन्यात स्पेनच्या १७ वर्षीय अंसू फाटीने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये पदार्पण केले. स्पेनसाठी आंतरराष्ट्रीय फुटबॉल खेळणारा तो दुसरा सर्वात युवा खेळाडू ठरला आहे.

'लीग ए गट ४'च्या या सामन्यात पूर्वार्धात दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आले. मात्र, उत्तरार्धात दोन्ही संघांनी त्यांच्या खेळात सुधारणा केली. ५१ व्या मिनिटाला टिमो वेर्नरने केलेल्या गोलमुळे जर्मनीला सामन्यात १-० अशी आघाडी मिळाली. ही आघाडी टिकवण्यासाठी जर्मनीने बचावात्मक खेळ केला आणि याचा फायदा स्पेनला झाला. स्पेनला गोलच्या काही संधी मिळाल्या. अखेर यापैकी एका संधीचे गायाने गोलमध्ये रूपांतर केल्याने हा सामना १-१ असा बरोबरीत संपला. त्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळाला आहे. दुसरीकडे रशियाने सर्बियाचा ३-१ असा पराभव केला. रशियाकडून अर्टेम झ्युबाने दोन, तर करावयेवने एक गोल केला.



# मालिका करताना अभिनेत्री म्हणून खूप समाधान वाटलं -शर्वाणी पिल्लई



**२ सप्टेंबरपासून 'मुलगी झाली हो' ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. या मालिकेत अभिनेत्री शर्वाणी पिल्लई महत्त्वाच्या भूमिकेत आहे. तिच्या या भूमिकेविषयी तिच्याशी साधलेला हा खास संवाद...**

**'मुलगी झाली हो' मालिकेचं वेगळेपण काय सांगशिल?**

'मुलगी झाली हो' या मालिकेचा विषय अतिशय संवेदनशील आहे. जेव्हा मला या मालिकेसाठी विचारणा झाली तेव्हा मी लगेच होकार कळवला. मालिकेतून चांगला संदेश देण्याचा प्रयत्न आहे. आपल्या मुलीसाठी आणि आपल्या तत्वांसाठी एक आई कशी उभी ठाकते याची गोष्ट खूप सुंदररित्या मालिकेतून मांडण्यात येणार आहे. स्टार प्रवाहसोबत माझं जुनं नातं आहे. याआधीही या लाडक्या वाहिनीसोबत बऱ्याच मालिका केल्या आहेत, त्यामुळे नव्या मालिकेची प्रचंड उत्सुकता आहे.

**'मुलगी झाली हो' मालिकेतील तुझ्या व्यक्तिरेखेविषयी...**

व्यक्तिरेखेविषयी सांगायचं तर मालिकेत मी आई साकारते आहे. एक अशी आई जिने विरोध पत्करुन मुलीला जन्म दिला इतकंच नाही तर एकटीने तिची संपूर्ण जबाबदारीही स्वीकारली. मी साकारत असलेली आई सोशिक असली तरी त्या सोशिकतेमागे खूप कारणं आहेत. मालिकेच्या भागांमधून ती हळूहळू उलगडत जातील आणि प्रेक्षकांना पटतील अशी आशा आहे. ही मालिका करताना एक अभिनेत्री म्हणून खूप समाधान वाटतंय. सविता मालपेकर, किरण माने या माझ्या सहकलाकारांसोबत काम करताना खूप मजा येतेय.

**मालिकेत तुझ्यासोबत जी चिमुकली आहे तिच्यासोबतची केमिस्ट्री कशी आहे?**

आम्ही सगळे सेटवर तिला माऊच म्हणतो. माऊ अतिशय गोड आहे. पहिल्या भेटीतच तिने आम्हा सर्वांचं मन जिंकून घेतलं. ती अतिशय हुशार आहे. कोणतीही गोष्ट ती लगेच आत्मसात करते. मला खूप कौतुक वाटतं माऊचं. माझी आणि माऊची केमिस्ट्री तुम्हाला नक्कीच आवडेल. मालिकेच्या प्रोमोजनाही प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळतो आहे. तेव्हा पहायला विसरु नका 'मुलगी झाली हो' रोज रात्री ९ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

**मुलगी झाली हो मालिकेतून सामाजिक विषयावर भाष्य करण्यात येणार आहे त्याविषयी काय सांगशिल?**

अगदी बरोबर आहे. मुलगी झाली हो या वाक्यात दोन सूर नक्कीच पहायला मिळतात. कधी तो सूर आनंदाचा असतो तर कधी निराशेचा. वंशाला दिवा हवा, मुलगी म्हणजे परक्याचं धन हे संवाद आपल्या हमखास कानी पडतात. मात्र, आपल्या गर्भात नऊ महिने जीव वाढवणारी स्त्री किती श्रेष्ठ आहे हे वेगळं सांगायची गरज नाही. जगन्माता देवीची आपण उपासना करतो मग तिचाच अंश असणाऱ्या तिच्या जन्माचाही खुल्या दिलाने स्वीकार करायला हवा असंच मला वाटतं. मालिकेतून नेमका हाच विचार मांडण्याचा प्रयत्न आहे.

## राशीभविष्य

**मेष :** पोटाची काळजी घ्या. मनाविरुद्ध एखादे काम करावे लागेल. वागण्या-बोलण्यात चूक होईल.

**वृषभ :** तुमच्या प्रगतीचा मार्ग खुला होईल. ईश्वरी चिंतनाने मन आनंदी होईल. आवडते पदार्थ मिळतील.

**मिथुन :** प्रवासात किरकोळ अडचण येईल. अधिकारी वर्गाची मदत मिळू शकेल. नातलग भेटतील.

**कर्क :** आजचे काम आजच करून घ्या. भक्तीने मन भरून येईल. आवडते पदार्थ सेवनास मिळतील.

**सिंह :** कामाचा व्याप वाढला तरी प्रतिष्ठाही मिळेल. तणाव वाढवू नका. हेकेखोरपणाने प्रेम कमी होते.

**कन्या :** धिंद्यात वाढ होईल. वरिष्ठांची मर्जी राखा. भावनेच्या भरात थट्टा करताना संयम ठेवा.

**तुला :** धिंद्यात फायदा होईल. तुम्ही ठरविलेले काम पूर्ण करता येईल. भावनांना आवर घाला.

**वृश्चिक :** निश्चयाने केलेले काम पूर्ण होईल. तुमचा अंदाज बरोबर येईल. दुसऱ्याची काळजी घ्या.

**धनु :** महत्त्वाची वस्तू सांभाळा. मनावर दडपण येईल. वेळ फुकट जाण्याची शक्यता आहे. अंदाज चुकेल.

**मकर :** आजचे काम करून घ्या. चर्चा सफल होईल. तुमच्या कार्याचे कौतुक सर्वत्र होईल. मन स्थिर ठेवा.

**कुंभ :** शेजारी तुम्हाला कामे सांगतील. भावना व व्यवहार यांचा नीट मेळ साधावा लागेल.

**मीन :** तुमच्या कामावर वरिष्ठ खूष होतील. सुग्रास भोजन मिळेल. मन प्रसन्न राहील. भावनांना आवर घाला.

# भेंडी खाण्याचे लाभदायक फायदे



**हिरव्या भाज्या खायच्या म्हटलं की अनेक जण तोंड मूरडतात. मात्र, याच हिरव्या भाज्या आरोग्याच्या दृष्टीने फारच उपयुक्त आहेत. त्यामुळे डॉक्टर नेहमी हिरव्या भाज्या खाण्याचा सल्ला देतात. कारण आपल्या शरीराला आवश्यक असणारे सर्व घटक त्यामध्ये असतात. त्यातील भेंडी ही भाजी आरोग्यासाठी फारच महत्वाची आहे. कारण भेंडीमध्ये कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम ही जीवनसत्वे असतात. भेंडीची भाजी खाल्ल्याने आपल्या शरीराला अनेक फायदे होतात.**

**✻ डोळ्यांना निरोगी ठेवते**

भेंडीमध्ये विटामिन ए जीवनसत्व असते. ते आपल्या डोळ्यांना निरोगी ठेवते.

**✻ डायबिटीजच्या रुग्णांसाठी उपयुक्त**

भेंडीमध्ये युगेनॉल असते. हे डायबिटीजच्या रुग्णांसाठी उपयुक्त असते. भेंडी खाल्ल्याने शरीरात ग्लुकोजचे प्रमाण नियंत्रित राहते. त्यामुळे डायबिटीज होण्याचा धोका कमी होतो.

**✻ मेंदूचे कार्य सुरळीत होते**

मेंदूचे कार्य सुरळीत होण्यासाठी भेंडी खाण्याचा सल्ला दिला जातो. विशेषता लहान मुलांच्या मेंदूच्या विकासासाठी भेंडी अत्यंत उपयुक्त आहे. जर मेंदूचे कार्य सुरळीच राहायचे असेल तर तुम्ही भेंडी अवश्य खा.

**✻ आतड्यामधील विषारी तत्व बाहेर पडतात**

भेंडी खाल्ल्यामुळे आतड्यामधील विषारी तत्व बाहेर पडतात. त्यामुळे तुमच्या आतड्यांचे आरोग्य चांगले राहते.

**✻ रोगप्रतिकारशक्ती वाढते**

भेंडीमध्ये व्हिटॅमिन सी असते. त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते आणि आजारांपासून सुटका होते.

# स्वीट डिश: पेरूचा हलवा

**आतापर्यंत आपण गाजर हलवा, बीट हलवा आणि दुधी हलवा बनवल्याचे आपण पाहिले आहे. पण, आज आपण फळांचा हलवा कसा करायचा ते पाहणार आहोत.**



**फळांमध्ये पेरुचा हलवा कसा**

**साहित्य :** अर्धा किलो साल आणि बिया काढलेले पेरु, २ चमचे तूप/बटर, कंडेन्स्ड दूध, ३० ग्रॅम खवा, ड्राय फ्रुट्स.

**कृती :** सर्वप्रथम पेरूची सर्व साल, बिया काढून पेरू मिक्सरमध्ये फिरवून किंवा ब्लेंडरने बारीक करून त्याची प्युरी करून घ्या. ही प्युरी आहे त्या प्रमाणापेक्षा पाव प्रमाण होईपर्यंत मंद आचेवर शिजवा. वरून तूप किंवा बटर घालून २-३ मिनिटे आणखी शिजवा. त्यात कंडेन्स्ड दूध आणि खवा मिसळा. नंतर ब्राऊन होईपर्यंत मोठ्या गॅसवर शिजवा. वरून तुमच्या आवडीचे ड्राय फ्रुट्स घालून पेरूचा हलवा सर्व्ह करा.

## ‘निमा’तर्फे अनियमित वीजपुरवठ्याबाबत निवेदन

**नाशिक●**सातपूर औद्योगिक वसाहतीत गेल्या दोन आठवड्यापासून अनियमित वीजपुरवठा, दररोज वीजपुरवठा खंडित होत असल्याने उद्योजक त्रस्त झाले आहेत. वीजेअभावी उद्योजकांना फटका बसत असून आर्थिक नुकसान होत आहे . यासंदर्भात महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता नंदनवार यांना निमा पॉवर समितीचे अध्यक्ष रावसाहेब रकिबे यांनी निवेदन देत चर्चा केली. यावेळी निमाचे मानद सरचिटणीस तुषार चव्हाण, खजिनदार कैलास आहेर ,पावर समितीचे अध्यक्ष रावसाहेब रकिबे तसेच सतीश पगार , अंबादास चौरे, मिलिंद कुलकर्णी, मोहन शेरूगर, धनंजय राव, कैलास पाटील, नितीन तोडवल उपस्थित होते.

## थोडक्यात

### मनसेनेकडून कोरोनाबाधित रुग्णांच्या घरगुती बाप्पांचे विसर्जन

**व्दारका●**अनंत चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने नाशिक महानगरमध्ये अनोखा उपक्रम राबविला. महानगरातील कोरोनाबाधितांच्या घरी प्रतिष्ठापणा करण्यात आलेल्या लाडक्या बाप्पांचं विधिवत पूजा करून विसर्जन करण्यात आले, अशी माहिती प्रीतम भामरे यांनी दिली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी पीपीई किट घालून कोरोनाबाधितांच्या घरी जाऊन या मूर्ती संकलित केल्या. या उपक्रमात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अजिंक्य शिर्के, प्रीतम भामरे,निखिल बागुल, सदाशिव परब,श्रीकांत क्षत्रिय, संचित साहू, आकाश शेळके, दीपक परब, रोहन फाटक, अक्षय केळुस्कर, तेजस राने,प्रतीक शिंदे आदी मनसे सैनिक सहभागी झाले होते.

### मोरवाडीत दोघांना मारहाण

**नाशिक●**किरकोळ कारणातून चारजणांनी दोघांना बेदम मारहाण करून जखमी केल्याची घटना मोरवाडी परिसरात घडली. याप्रकरणी अजय मधुकर भोंगळ (वय २०, रा. मोरवाडी गाव, दत्त मंदिरामागे) याने अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी मोबीन, सचिन दाभाडे, आलिशान शेख, फरहान शेख (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजय भोंगळ याचा मित्र सोनु निकम हा वाद्य मागण्यास गेला असता संशयित मोबीन याने त्यास शिवीगाळ करून मारहाण केली. त्यावेळी अजय त्यास समजविण्यास गेले असता चौघांनी संगनमत करून अजयला मारहाण व शिवीगाळ केली. मोबीन याने चाकूने अजयच्या हात व छातीवर वर मारून दुखापत केली. सचिन दाभाड याने हातात दगड घेउन अजयच्या डोक्यात मारून दुखापत केली. आलिशान शेख याने लाकडी दांड्याने अजयच्या पाठीवर मारहाण करत ठार मारण्याची धमकी दिली. पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक सोनवणे करत आहेत.

### सराफ दुकानातून दागिने लंपास

**नाशिक●**सराफ दुकानाचे कुलूप व शटर तोडून चोरट्याने ४३ हजार रुपयांचे दागिने लंपास केल्याची घटना जगताप मळा परिसरात घडली. याप्रकरणी पंकज मधुकर गव्हाणे (वय ३० रा. गेणू बाबू रोड, वरची गल्ली, दे.गाव) यांनी उपनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सराफ दुकान बंद असताना २ सप्टेंबर रोजी रात्री चोरट्याने कुलूप व शटर तोडून आतमध्ये प्रवेश केला. दुकानातील ४३ हजार रुपयांचा माल लंपास केला.




### वाद सोडवणाऱ्या पोलीस हवालदारास शिवीगाळ, दमदाटी

**नाशिक●**वाद सोडवण्यासाठी गेलेल्या पोलीस हवालदारास शिवीगाळ व दमदाटी केल्याची घटना उपनगरमध्ये घडली. याप्रकरणी पोलीस हवालदार प्रकाश चौधरी (वय ५०, उपनगर पोलीस ठाणे) यांनी उपनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी प्रथमेश संतोष निकम (वय १९, रा. रामदास स्वामी नगर, टाकळी रोड) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित प्रथमेश निकम व दर्शन देठे या दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद सुरु होता. त्यावेळी पोलीस हवालदार चौधरी हे वाद सोडवण्यासाठी गेले होते. यावेळी संशयिताने त्यांना शिवीगाळ करत दमटाटी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक व्ही. एस. लोंढे करत आहेत.

# ‘विद्या प्रबोधनी’च्या उपक्रमाला विद्यार्थ्यांचे कोंदण



**नाशिक●**कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा व महाविद्यालये बंद असताना शिक्षण ऑनलाईन पद्धतीने चालू आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासह त्यांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी विद्या प्रोबोधिनी प्रशालेने पुढाकार घेत आगळ्या-वेगळ्या उपक्रमाचे आयोजन करत गणेशोत्सवात १० दिवस गणपती आरास स्पर्धा, स्तोत्रपठण, तोरण बनविणे, ऑनलाइन मोदक कार्यशाळा, चित्रकला व रंगभरण स्पर्धा, मायथॉलॉजीकल प्रश्न कॉम्पिटिशन आणि गणपती सेलिब्रेशन स्पर्धा आयोजित केली. त्यास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक वस्तूंपासून तयार केलेले आकर्षक व नावीन्यपूर्ण तोरण, गणपती आरास, रांगोळी, मोदक तयार केले. विद्यार्थ्यांमधील कल्पकता, नावीन्यता, धडपड, उत्साह पाहून शिक्षकांसह पालक भारावून गेले.

शाळांमध्ये लाडका बाप्पा येणार म्हटले की विद्यार्थ्यांचा आनंदाचे वातावरण असते. गणेशोत्सवातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विद्या प्रोबोधिनी प्रशालेने गूगल मीटव्दारे विद्यार्थ्यांना गणेशमूर्ती स्थापनेची पूजा यथासांग दाखवली. दरवर्षी शाळेत १० दिवस स्पर्धा आयोजित केल्या जातात. विविध स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलेला, गुणांना प्रोत्साहन देण्याचे काम शाळा केले जाते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद असल्या तरी मुलांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांना कायमस्वरूपी प्रोत्साहन मिळावे, यासाठी विद्या प्रबोधिनी प्रशालेच्या मुख्याध्यापिका लीना चक्रवती यांनी आगळ्या-वेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्याचे ठरविले. त्यास शिक्षक व पालकांनी तत्काळ प्रतिसाद दिला. विद्या प्रबोधिनी प्रशालेच्या वतीने ऑनलाईन पद्धतीने १० दिवस विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

### विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला पर्यावरणपूरक तोरण




■ विद्या प्रबोधनी प्रशालेच्या आगळ्या–वेगळ्या स्पर्धांमुळे दररोज विद्यार्थी व शिक्षक संपर्कात होते. स्पर्धेत पालकांचा देखील सहभाग होता. विद्यार्थ्यांसह पालकांशी सुसंवाद साधता यावा म्हणून विद्या प्रबोधनीच्या वतीने विद्यार्थ्यांच्या घरी ऑनलाइन आरती उपक्रम राबवण्यात आला. त्यास पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मुख्याध्यापिका लीना चक्रवती यांच्याशी संवाद साधला. विद्या प्रबोधनीने आयोजित केलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला पर्यावरणपूरक तोरण मिळाले असून त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.



२२ ऑगस्ट रोजी गणपती आरास स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेनुसार आखीव-रेखीव रांगोळी काढत सहभाग नोंदविला. २४ ऑगस्ट रोजी स्तोत्रपठण स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी गणेश स्तोत्र मारुती स्तोत्र व रामरक्षा स्तोत्र पठण केले. दाराला तोरण लावून सुख, संस्कृती, लक्ष्मी येते. ही भारतीय संस्कृतीची प्रथा असल्याने २५ ऑगस्ट रोजी तोरण बनविण्याची स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक वस्तूचा वापर करून आकर्षक तोरण बनविले. अशा सजावटीत लाडक्या बाप्पाचे भावपूर्ण वातावरणात स्वागत झाले. बाप्पाचा आवडता खाद्य पदार्थ मोदक असल्याने विविध प्रकारचे पौष्टिक मोदक प्रसाद म्हणून विद्यार्थ्यांना बनवता यावे, यासाठी २७ ऑगस्ट रोजी ऑनलाइन मोदक कार्यशाळा घेण्यात आली. २८ ऑगस्ट रोजी चित्रकला व रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात आवडता गणेशा, गणेश फेस्टिवल आणि गणेश फेस्टिवल फोर सोशल कोज असे ग्रुपनुसार विषय देण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण वातावरणात लाडक्या गणरायाचे आकर्षक व लक्षवेधी गणेशोत्सवाचे मनातील चित्र विद्यार्थ्यांनी कागदावर रेखाटले. विद्येचे दैवत गणपती आणि विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळावी, विद्यार्थ्यांना अधिकाअधिक विषयांचे ज्ञान प्राप्त व्हावे, यासाठी २९ ऑगस्ट रोजी मायथॉलॉजिकल प्रश्न कॉम्पिटिशन घेण्यात आली यात रामायण-महाभारत भारतीय संस्कृती व आर्किटेक्चर यावर प्रश्न विचारण्यात आले. शेवटच्या दिवशी ३१ ऑगस्ट रोजी गणपती सेलिब्रेशन २०-२० स्पर्धा आयोजित करण्यात आली. यामध्ये गणेशोत्सव तुम्ही कशा प्रकारे साजरा केला, हे शब्दात लिहून किंवा ऑडिओ अथवा व्हिडिओमार्फत विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त करावे, अशी कार्यशाळा घेण्यात आली.

विद्या प्रबोधनीच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांसाठी संस्थेचे कार्यवाहक दिलीप बेळगावकर, कार्यवाहक हेमंत देशपांडे, पालक नितीन गर्गे,शालेय समितीचे अध्यक्ष आनंद देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेसाठी शिक्षकांनी परिश्रम घेतले.




### स्त्रोत पठणातून कोरोनामुक्तीचे साकडे

■ कोरोनाकाळात सर्वांचे आरोग्य सुदृढ राहो. सर्वांना कोरोनावर मात करण्याचे संयम मिळू आणि लवकरात लवकर कोरोनातून सर्वांची सुटका होऊन सर्वत्र शांती व आनंद पसरू दे, अशी प्रार्थना विद्यार्थ्यांनी केली.

## मीराताई वाचनालयाचे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**नाशिक●**अखिल विश्व गायत्री परिवार युएसए व मीराताई सार्वजनिक वाचनालय आळिवदांड (ता. सुरगाणा) यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त आदर्श शिक्षक पुरस्कारार्थी जाहीर करण्यात आले आहे. आदर्श शिक्षकांचा गौरव कोरोना संसर्ग नियंत्रात आल्यानंतर करण्यात येणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

गायत्री परिवार व मीराताई सार्वजनिक वाचनालयातर्फे यावर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण होणार आहे. सुरगाणा तालुक्यातील नवोदय परिक्षेत ज्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले त्या शाळेतील शिक्षकांसह क्रीडा क्षेत्रात सुरगाणा तालुक्याचे नाव देशपातळीवर नेणा-या शिक्षकांचा समावेश आहे. आदर्श शिक्षक पुरस्कारार्थींमध्ये अजय निटुरे (सूर्यगड), फादर स्टीफन मिंगेल घोषाल (प्रबोधन विद्यालय, आंबाठा), विजय नेटके (खुंटविहीर), विठ्ठल पाडवी (पळसन), काळू भोये (माणी), विनायक गावित (क्रीडा शिक्षक देवलदरी), सतीश इंगळे (उंबरठाण), भास्कर झिरवाळ (सुरगाणा), विजय गावित (देवलदरी), भास्कर गवळी (सेवानिवृत्त विस्ताराधिकारी), केशव महाले (डोल्हारे), प्रा. निवृत्ती लांडगे ( क्रीडा शिक्षक अलंगुण), रामू चौधरी ( क्रीडा शिक्षक अलंगुण), सुनिता वाघ (आश्रमशाळा, मनखेड) यांचा समावेश आहे. कोरोना प्रार्दुभाव नियंत्रणात आल्यानंतर गायत्री परिवाराच्या नाशिक शाखेचे अध्यक्ष अमृतभाई पटेल, शिक्षण विस्तार अधिकारी भाऊसाहेब सरक, मीराताई सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष हेमंत महाले यांनी दिली.

## अभ्यासाबरोबर संस्काराची शिदोरी आवश्यक : गोडसे



**भगूर●**यश संपादन करताना अभ्यासाबरोबर संस्कारांची शिदोरी गरजेचे असल्याचे प्रतिपादन नगरसेविका आशा गोडसे यांनी केले.

भगूर येथील वार्ड क्रमांक चारमध्ये शिवसेनेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर ज्ञानेश्वर रंधे,चंद्रकांत गोडसे, एकनाथ तागड आदी उपस्थित होते. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व भेटवस्तू देत गौरव करण्यात आला.

प्रास्ताविकातून चंद्रकांत गोडसे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या कष्टांची जाण ठेवत आपले भवितव्य घडवावे असे सांगितले. त्यानंतर रंधे यांनी जर्मनीचा बादशहा हिटलर यांच्या शैक्षणिक जीवनातील उदाहरण देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मधुकर गोडसे, प्रदीप पाटील, दत्तू गायकवाड, शुभम गोडसे जॉन लाजरस, पांडुरंग लोंढे आदी प्रयत्नशील होते. सूत्रसंचालन प्रशांत धिवंदे यांनी केले. आभार गणेश देवकर यांनी मानले.




## वृत्त झळकताच अवतरला शिवभोजनाचा फलक


**कन्नड●**शहरातील शिवभोजनाचा कोठ सुरू आहे, शिवभोजनाचे बिल लाखोच्या घरात आहे. मात्र, त्याचा ठाव ठिकाणा नागरिकांना माहिती नाही मग लाखोचे बिल कसे झाले, या आशयाचे वृत्त दैनिक ‘आपलं महानगर’मध्ये गुरुवारी (दि.३) प्रकाशित होताच प्रशासन खडबडून जागे झाले. प्रशासनाने काही तासांत शिवभोजन केंद्राचा फलक झळकला.

कन्नड शहरात थाटामाटात शिवभोजनाचे उदघाटन करण्यात आले. मात्र, आज त्या ठिकाणी शिवभोजनाचा थांगपत्ताही नाही. ३० मार्च रोजी ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात शिवभोजनाचे उदघाटन करण्यात आले. मात्र, शिवभोजन गायबच झाले. याप्रकरणी नागरिकांनी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे चौकशी करण्याची मागणी केली होती. या वृत्ताची दखल घेताच शिवभोजन केंद्राचा फलक झळकला असला तरी ३० मार्च ते ऑगस्ट या कालावधीत लॉकडाऊन असताना इतक्या थाळ्या गेल्या कशा हा प्रश्न निरुत्तरीत आहे.

आपलं IMPACT महानगर

## शिक्षणाची अखंड ज्ञानधारा रुजवणारे प्रमोद परदेशी

शिक्षणाची अखंड ज्ञानधारा अतिदुर्गम भागात रुजवणारे आदर्श शिक्षक प्रमोद पांडुरंग परदेशी. अवघ्या महाराष्ट्रात दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थी आणि आदिवासी बांधवांच्या शिक्षणासाठी त्यांचा ‘टीव्हीवरच्या शाळेचा धामडकीवाडी पॅटर्न’ मैलाचा दगड ठरला आहे. दुर्गम दऱ्या कपारीच्या अंधाऱ्या कोपऱ्यात सावित्री जोतीच्या अखंड शिक्षणाचा दिवा उजळवणाऱ्या ज्ञानदुत प्रमोद परदेशी यांच्या कार्याचा गौरव करावा तेवढा कमीच आहे. ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या निमित्ताने आदर्श शिक्षक प्रमोद परदेशी यांच्यासारख्या शिक्षकांसमोर नतमस्तक व्हावे इतकं त्यांचं कार्य मोठं आहे.



धुळे, नंदुरबारसारख्या कायम कुपोषित आणि दुर्लक्षित आदिवासी भागात ज्ञानदानाचे कार्य निष्ठेने करणारे पांडुरंग राजाराम परदेशी हे त्यांचे वडील. आई सुमन यांची शिक्षणाविषयी आत्मीयता आभाळाएव्हढी विशाल आहे. प्रसंगी पती पांडुरंग परदेशी ह्यांना मिळणाऱ्या वेतनाचा मोठा हिस्सा गरीब विद्यार्थ्यांना लागणाऱ्या शैक्षणिक साहित्यावर करावा यासाठी त्या आग्रही असत. अशा विजिगिशु परिवारात प्रमोद परदेशी यांनी लहान पणापासून शिक्षणविषयक आस्था अंगी बाणवली. भरघोस पगार देणाऱ्या अन्य क्षेत्रात नोकरी करण्याची इच्छा असणाऱ्या प्रमोद परदेशी यांनी आईवडिलांच्या शैक्षणिक स्वप्नांसाठी शिक्षकी पेशा स्वीकारण्याचा निर्णय घेऊन स्वप्नपूर्तीसाठी महत्वाचे पाऊल उचलले.

२००२ मध्ये इगतपुरी तालुक्यातील कऱ्होळे येथे शिक्षक म्हणून प्रमोद परदेशी यांच्या शिक्षकी व्रताला प्रारंभ झाला. शाळेत हजर होतांना वडीलांनी त्या दिवशी सोबत राहून आयुष्यभर सुजाण आणि सदृढ पिढीसाठी तन, मन,धनाने प्रामाणिक कार्य करण्याचा शब्द घेतला. त्यानुसार आज मागे वळून पाहतांना प्रमोद परदेशी यांचे इथले विद्यार्थी, डीएड, इंजिनिअर, पदवीधर होऊन स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करतांना आढळतात. हे शिक्षकी व्रताचे पहिले यशस्वी फलित म्हणावे लागेल.

२००६ मध्ये भुतांची शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भगतवाडी शाळेत बदली झाली. ह्या गावात कोणीही ८ वी च्या पुढे शिकत नव्हते. प्रमोद परदेशी यांनी भुतांच्या शाळेची ओळख कायमची पुसून काढली. गावात प्रभावी समाज प्रबोधन, विविध उपक्रम आणि प्रचंड लोकसहभाग उभा केला. आज इथली अभिमानास्पद कामगिरी म्हणजे आयएसओ मानांकनासोबत इथले विद्यार्थी विज्ञान शाखेची पदवी घेण्याकडे वाटचाल करीत आहेत. ७ वी नंतर चूल आणि मूल मध्ये कोंडमारा होणाऱ्या विद्यार्थिनी १२ वी मध्ये यशाचा सुगंध पसरवत आहेत. २०१८ मध्ये अतिदुर्गम धामडकीवाडी शाळेत बदली होऊन ह्या आदिवासी वाडीत प्रमोद परदेशी यांना आव्हानात्मक कामगिरी करण्याची संधी मिळाली. आजा मेला, पणजा मेला, बाप मसना नेला, पण धामडकीवाडीला रस्ता झालाच नाही. अशा आदिवासी वाडीत विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनाही शिक्षणाचे अमृतकण खऱ्या अर्थाने देणारे देवदूत प्रमोद परदेशी ठरले. राज्यात आणि राज्याबाहेर प्रचंड प्रसिद्धीला आलेला टीव्हीवरच्या शाळेचा धामडकीवाडी पॅटर्न त्यांनीच नावारूपाला आणला. मोबाईलचे नेटवर्क म्हणजे काय ? असा प्रश्न पडणाऱ्या धामडकीवाडीत कोरोना काळात विद्यार्थ्यांना शाळेत गेल्याची अनुभुती देणारा अलौकिक चमत्कार प्रमोद परदेशी यांनी घडवला. आगामी काळात संपूर्ण राज्यभर त्यांचा धामडकीवाडी पॅटर्न अतिदुर्गम शाळांमध्ये राबवला जाणार असल्याचे संपूर्ण श्रेय प्रमोद परदेशी यांना आजच दिले तरी वावगे ठरणार नाही.

पेहेचान प्रगती फाऊंडेशनच्या प्रगती अजमेरा यांच्या माध्यमातून दत्तक शाळा, मोफत शैक्षणिक साहित्य आदी उपक्रम नियमित राबवले जातात. स्वतःची शाळा आणि अन्य शाळेतही विद्यार्थ्यांना दरवर्षी मुबलक वह्या वाटप, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे नॉर्थतर्फे पिंप्रीसदो, बोर्ली, धामडकीवाडी येथील लोकांच्या हागणदारी मुक्तीसाठी मोफत शौचालय बांधकाम, लायन्स क्लब जुहू तर्फे आंबेवाडी शाळेसाठी सुसज्ज नवीन इमारत प्रमोद परदेशी यांच्या प्रयत्नांनी उभी राहिली. कोरोना काळात ५०० आदिवासी कुटुंबाना पेहेचान प्रगती फाऊंडेशन, वेबग्योर इंटरनॅशनल स्कूल अंधेरी, स्नेहलता अँड परमेश्वर लखोटिया फाऊंडेशन कडून किराणा वाटप सुद्धा त्यांच्यामुळेच करण्यात आला. आतापर्यंत सर्व कामे मिळून ९० लाखांचे सामाजिक काम प्रमोद परदेशी यांनी उभे करून दाखवले. हे सगळं राज्य शासनाला भावलं म्हणूनच त्यांना राज्याचा आदर्श शिक्षक पुरस्कार गेल्यावर्षी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.


प्रत्येक शाळेत आणि गावात प्रश्न असतात, ते जाणवत असतात, दिसत असतात; पण कोणताही शिक्षक ते प्रश्न पाहण्याचं, त्यांना भिडण्याचं धाडस करीत नाही. मात्र प्रमोद परदेशी वेगळे आहेत ते या बाबतीत. एखादा शिक्षक किती विविधांगी कार्य करू शकतो हे प्रमोद परदेशी यांनी सर्वांना दीपस्तंभ बनून दाखवून दिलेलं आहे. धडपड्या, संवेदनशील आणि सामाजिक दृष्टिकोन असणाऱ्या प्रमोद परदेशी यांनी अतिदारिद्र्याच्या छायेतल्या धामडकीवाडीमध्ये पथदर्शक काम उभं केलेलं आहे. अशाश्वत जीवनाची लढाई लढणाऱ्या आदिवासी बांधवांना पोटापाण्याचीच एवढी भ्रांत पडलेली असते की, आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणाचा विषय त्यांना कसा सुचावा ? आईबापांना पोटासाठी मदत करतांना शिक्षण नकोच असा विचार बळावलेल्या धामडकीवाडीत मनामनात शिक्षणधारा पोहोचवणाऱ्या संवेदनशील मनाच्या प्रमोद परदेशी ह्या अलौकिक शिक्षकाला शिक्षक दिनानिमित्त वंदन!

**– वाल्मिक गवांदे,** इगतपुरी

**शिक्षकदिन विशेष**

## जीवनाचा शिल्पकार अन् गुरू म्हणजे शिक्षक

गुरू शिष्य परंपरा आजही भारतीय संस्कृतीत महत्वपूर्ण आणि पवित्र मानली जाते. जीवनात आई-वडिलांची जागा कुणीही भरू शकत नाही. या सुंदर जगात आणण्याचे श्रेय असल्याने जीवनातील पहिले गुरू आई-वडील असतात. भारतात प्रचिन काळापासून गुरू-शिष्य परंपरा असून शिक्षक हे आम्हाला जगण्याचा योग्य मार्ग दाखवतात. जीवनातील योग्य दिशेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरीत करतात.



दरवर्षी ५ सप्टेंबर या दिवशी शिक्षक दिन साजरा केला जातो. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्लीन राधाकृष्णन यांच्या जन्म दिवसाच्या निमित्ताने शिक्षकांप्रती सन्मान प्रकट करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. गुरूचे प्रत्येकांच्या जीवनात महत्व असतं.गुरू शिवाय विद्या प्राप्त होऊ शकत नाही. समाजात त्यांचे विशिष्ठ स्थान असतं. सर्वपल्ली राधाकृष्णन हे एक महान शिक्षक होते.एक आदर्श शिक्षक म्हणून त्याच्यात सर्व गुण विद्यमान होते.या दिवशी संपूर्ण देशात भारत सरकारद्वारे आदर्श, श्रेष्ठ शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

शिक्षकांच्या हातात देशाचे भविष्य असतं इतकेच नाही तर देशाच्या पाळण्याची दोरी त्याच्याच हातात असते. कारण शिक्षकांमुळे भविष्यातील डॉक्टर, शास्त्रज्ञ, इंजिनिअर, लेखक, शिक्षक आणि अनेक क्षेत्रामध्ये प्रगती करून देशाचे नाव उंचवणारे सामर्थ्यवान पिढी तयार होते. शिक्षकांकडून बऱ्याच नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. म्हणूनच शिक्षकाला दुसरी आई म्हटले जाते. आपले विचार, मत आणि व्यक्तिमत्व घडविण्यामागे शिक्षकांचा सिंहाचा वाटा आसतो. चांगले संस्कार, शिस्त आणि योग्य शिक्षण देऊन घरासमोर उभं राहण्याची ताकद शिक्षकांमुळे येते. या नात्याचे महत्व समजण्यासाठी आणि शिक्षकांप्रती प्रेम व्यक्त करण्यासाठी हा दिन साजरा केला जातो.

या दिवशी अनेक शाळा, कॉलेजमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच शिक्षकांच्या भूमिका विद्यार्थी सादर करतात. शिक्षकांप्रती आभार व्यक्त केला जातो.

**– आबा अहिरे,** शिक्षक,
मविप्र संस्था, नाशिक

## विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षावर प्राणघातक हल्ला

**उल्हासनगर** ● दोन व्यक्तींचे भांडण सोडविण्यास गेलेल्या टी ओ के पक्षाचा विद्यार्थी संघटना अध्यक्ष सनी तेलकर (३२ ) याच्यावर गुरुवारी रात्री एका व्यक्तीने चाकूने वार करून हत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला. रात्री १० . ३० वाजताच्या सुमारास उल्हासनगर ३ येथील बिग सिनेमा जवळ हा प्रकार घडला. या ठिकाणी एका व्यापाऱ्याला योगेश पवार हा व्यक्ती मारहाण करीत होता. यावेळी सनी तेलकर मध्यस्थी करण्यास गेला असता आरोपी प्रफुल सुरेश कुमावत ( २३ ) याला या गोष्टीचा राग आला. त्याने रागाच्या भरात तेलकर याला शिवीगाळ करून मारहाण केली.



आपलं महानगर My महानगर.com mymahanagar.com mymahanagar mymahanagar

## थोडक्यात

### क्षुल्लक वादातून नणंदेचा भावजयीवर चाकू हल्ला

**भिवंडी** ● चहा बनवण्याच्या क्षुल्लक वादातून नणंद-भावजयीमध्ये बाचाबाची होऊन नणंदेने भावजयीवर चाकूने वार केल्याची घटना दर्गारोड येथे घडली आहे. या चाकू हल्ल्याप्रकरणी नणंदेविरोधात भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अनम आरिफ अन्सारी (२४) असे गुन्हा दाखल झालेल्या नणंदेचे नाव आहे. भावजय सगुफ्ता मुस्ताक अन्सारी(१६) हिला तिच्या आईने चहा बनवण्यास सांगितल्याने सगुफ्ता ही किचनमध्ये चहा बनवण्यास गेली त्यावेळी अनमने त्या ठिकाणी जाऊन ' मेरे को चाय बनानी है ' असे सांगितले तेव्हा सगुफ्ता अनमला 'माँ को चाय देनी है ' असे बोलली या गोष्टीचा मनात राग धरून अनमने सगुफ्ताचे केस पकडून तिला शिवीगाळ करत चाकूने तिच्या डोक्यात वरच्या बाजूस वार करून गंभीर जखमी केले आहे. या घटनेचा पुढील तपास भोईवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आर.एस.लोमटे करीत आहेत.

### भिवंडीत पादचारी महिलेवर धारदार शस्त्राने हल्ला

**भिवंडी** ● भाजीमार्केटमधून भाजी घेऊन घरी जाणाऱ्या महिलेस दोन अज्ञात इसमांनी रस्त्यात अडवून धमकी देत धारदार शस्त्राने महिलेवर हल्ला केल्याची घटना ठाणगे आळी येथे बुधवारी दुपारी घडली आहे. या हल्ल्याप्रकरणी दोघा अज्ञातांवर निजामपूरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रंजिता संदीप बोल्लू (३८) ही महिला भाजी घेऊन घरी जात होती. त्यावेळी ठाणगे आळी येथील गल्लीतून जात असताना दोन अज्ञातांनी तिला रस्त्यात अडवून तुमचे कासारआळी येथे असलेले पेंटिंगचे दुकान तुझ्या नवऱ्याला सोडून द्यायला सांग नाहीतर अजून जास्त त्रास होईल अशी धमकी देत धारदार शस्त्राने तिच्या पाठीवर, उजव्या बाजूस व डाव्या हाताच्या दंडापासून मनगटापर्यंत वार करून गंभीर जखमी केले आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या रंजिता हिला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेचा पुढील तपास निजामपुरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बाजीराव भुसारे करीत आहेत.

### भिवंडीत तीन मोटरसायकल चोरट्यांना अटक

**भिवंडी** ● भिवंडीत वाहन चोरांनी थैमान घातला असल्याने वारंवार होणाऱ्या वाहन चोरीच्या घटनांनी वाहन चालक त्रस्त झाले होते. रोजच्या वाहन चोरीच्या घटनांना आळा बसावा यासाठी भिवंडी परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी शहरातील सहाही पोलीस ठाण्यांना वाहन चोरांच्या मुसक्या आवळण्याचा अदेश दिले होते. त्यांनतर नारपोली पोलिसांनी वाहन चोरी प्रकरणातील तीन वाहनांचा शोध घेतला असून याप्रकरणी तीन वाहन चोरट्यांना अटक करण्यात आली असल्याची माहिती शुक्रवारी नारपोली पोलिसांनी दिली आहे. दर्शक कीर्ती हरनिया ( २३ रा .अंजूरफाटा ) यांची शाईन मोटर सायकल चोरी झाली होती. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नारपोली पोलिसांनी तपास करून आरोपी इस्तियाक लियाकत अली अंसारी उर्फ पंजाबी ( ३५ ) यास अटक करून चौकशी केली असता मोटर सायकल त्याने काल्हेर येथून चोरी केल्याची कबुली दिली आहे. दुसऱ्या घटनेत फिरोज इब्राहिम शेख ( २७ ) यांची ऍक्टिव्हा दुचाकी चोरीला गेली होती. याप्रकरणी अन्वर मुक्तार सय्यद ( २२ रा. साकीनाका मुंबई ) यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली आहे. तर तिसऱ्या घटनेत सत्यवान बबन शेट्ये ( ४५ ) यांची रजिस्टर न झालेली नवीन मोटर सायकल चोरीला गेली होती, ही गाडी चोरी प्रकरणी आरोपी सैफ जलालुद्दीन अंसारी ( २१ रा . जैतुनपुरा ) यास अटक केल्यानंतर त्याने वाहन चोरीची कबुली दिली आहे. विशेष म्हणजे या तिन्ही मोटर सायकल या तीनही चोरट्यांकडून पोलिसांनी हस्तगत केल्या असल्याची माहीती नारपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे यांनी दिली.

### वाढीव लाईट बिल भाजपाचे डोंबिवलीमध्ये ठिय्या आंदोलन

**कल्याण** ● लॉकडाऊन काळात वीजदर वाढ आणि वाढीव बिल वसुली महावितरण ने सुरू केल्याने सर्व सामान्य नागरिक त्रस्त झाला असून याच्या निषेर्धात भाजपाच्या वतीने कल्याण डोंबिवली शहरात ठिय्या आंदोलन करत आपला निषेध व्यक्त केला. कल्याण पूर्व मधील चक्कीनाका परिसरात भाजपा आमदार गणपत गायकवाड आणि भाजपा कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष संजय मोरे यांच्या नेतृत्वाखाली आज ठिय्या आंदोलन करण्यात आले .या आंदोलन मध्ये आमदार गणपत गायकवाड, संजय मोरे, मोरेश्वर भोईर, नाना सूर्यवंशी, सुभाष म्हस्के, रेखा चौधरी, विकी तरे, मोनाली तरे, सुनीता खंडागळे, पांडुरंग भोसले,आदित्य सिंह नितेश म्हात्रे आदींनी सहभाग घेतला .यावेळी आमदार गणपत गायकवाड यांनी राज्य सरकार वर सडकून टीका करत म्हणाले की, राज्य सरकार ने जनतेचा विश्वासघात केला असून वाढीव वीज बिल वसुली करून त्रास देणाऱ्या शासनाचा निषेध करण्यासाठी आज ठिय्या आंदोलन केल्याची माहिती आमदार गणपत गायकवाड यांनी दिली. आज कल्याण आणि डोंबिवली मध्ये ही आंदोलन करण्यात आले.

# विटाव्यातील ओपन जिम झाले अनधिकृत वाहनतळ

वार्ताहर ● कळवा

ठाणे महापालिकेच्या वतीने हरित जनपथ तसेच अनेक उद्यानामध्ये स्थानिक ओपन जिमच्या धर्तीवर नगरसेवकनिधीतून लाखो रुपये खर्च करून आधुनिक व्यायामाचे साहित्य बसविण्यात आले आहे. त्याच धर्तीवर विटावा येथील प्रभाग क्रमांक २४ मध्ये विसर्जन घाटाजवळ स्थनिक नगरसेवक निधीतून लाखो रुपये खर्च करून ओपन जिम तयार करण्यात आली आहे. मात्र या जिमला सध्या बेकायदेशीर पार्किंग वेढले आहे.

सध्या ही ओपन जिम अनधिकृत पार्किंगतळ तयार झाले आहे. त्यामुळे येथील ज्येष्ठ नागरिकांसह महिलांची ही



गैरसोय होत आहे. या परिसरात महापालिकेने राबविलेल्या या उपक्रमाचा उपयोग परिसरातील पुरुषांबरोबर महिलांही करतात या ओपन जिममध्ये सायकलिंग,एअर वॉकर्स, चेस प्रेसआदी आधुनिक साहित्य यांचा समावेश या जिममध्ये आहे.

येथे नागरिक सकाळी व संध्याकाळी फेरफटका मारण्यासाठी येतात. महापालिकेने तयार केलेल्या या जिमला विटावा परिसरातून'लॉकडाऊन आधी मोठा प्रतिसाद मिळाला होता. परंतु सध्या

> "या ओपनजिम मध्ये विटाव्यातील काही तरुणांनी बेकायदेशीररित्या आपल्या गाड्या पार्क केल्या आहे.त्या त्वरित हटवायला सांगितल्या आहेत.
>
> – प्रियांका पाटील, नगरसेविका

ओपन जिम खुल्या केल्या असताना सुद्धा या ओपन जिममध्ये तरुणांनी बेकायदेशीररित्या आपल्या गाड्या पार्किंग करून ठेवल्या आहेत. त्यामुळे येथे सकाळी व सायंकाळी सोशल डिस्टन्स ठेवून फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा हिरमोड होत आहे. ही बेकायदेशीररित्या केलेली गाड्यांची पार्किंग हटविण्याची मागणी सध्या या परिसरातील नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## आयुर्वेद इम्युनिटी क्लिनिक सुरू

वार्ताहर ● टिटवाळा

कोरोना विषाणूच्या संसर्गावर मात करण्यासाठी आयुर्वेद डॉक्टर्सची निमा संघटना आयुर्वेद इम्युनिटी क्लिनिक ही अभिनव संकल्पना राबवत आहे. महाराष्ट्र राज्यात ४४० इम्युनिटी क्लिनिक सुरू करण्यात आली असून कल्याण शहरातही डॉ. अमिता कुकडे यांच्या सावित्री क्लिनिक येथे डॉ. गिरीश लटके यांच्या हस्ते या इम्युनिटी क्लिनिकचे उदघाटन करण्यात आले. आयुष टास्क फोर्स आणि निमा महाराष्ट्र राज्य शाखा संलग्नित निमा आयुर्वेदिक इम्युनिटी क्लिनिक पूर्ण राज्यभरात सुरू करण्यात येत आहे. आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी या संकल्पनेचे ऑनलाईन उदघाटन केल्यानंतर महाराष्ट्रात विविध ठिकाणी हे इम्युनिटी क्लिनिक सुरू करण्यात आले. कल्याणमध्ये एकूण २० इम्युनिटी क्लिनिक सुरू करण्यात आले असून त्यातील एक डॉ. अमिता कुकडे यांच्या सावित्री क्लिनिक मध्ये डॉ. स्वप्ना जगदाळे, अध्यक्षा महाराष्ट्र निमा वूमनस फोरम यांच्या उपस्थितीत डॉ. गिरीश लटके यांच्या हस्ते या इम्युनिटी क्लिनिकचे उद्घाटन करण्यात आले. कोविड आजारावर अजून १०० टक्के प्रभावी औषध किंवा लस उपलब्ध नाही. उत्तम प्रतिकारशक्ती असल्यास कोविड आजार लवकर होत नाही




किंवा झाल्यास लवकर बरा होतो. असे संशोधनाने सिद्ध झाले आहे. प्रतिकार शक्ती नैसर्गिकरित्या वाढवण्यासाठी आयुर्वेदिक पद्धतीने प्रभावीपणे योजना करता येतात. याच संकल्पनेतून आयुर्वेदिक इम्युनिटी क्लिनिकची सुरवात करण्यात आलेली आहे.

या क्लिनिक मध्ये येणाऱ्या व्यक्ती ची प्रश्नावली द्वारे पूर्ण माहिती घेऊन प्रकृति परीक्षण व इम्युनिटी स्कोर निश्चित करण्यात येईल. आयुर्वेदिक औषधे देऊन, जीवन पद्धतीतील बदल, व्यायाम व योगाभ्यासाचे मार्गदर्शन करण्यात येईल. दोन महिन्यात किमान चार वेळा संबंधित व्यक्तीच्या प्रतिकार क्षमतेची चाचणी होईल. शहरातील नागरिकांसाठी ही सेवा ना-नफा ना-तोटा या तत्वावर सुरू करण्यात आली आहे. तरी नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. अमिता कुकडे यांनी केले.

## प्रधानमंत्री स्वनिधी आत्मनिर्भर योजनेचा लाभ राष्ट्रीयकृत बँकांनी लाभधारकांना उपलब्ध करावा

### आयुक्त डॉ. आशिया यांचे आवाहन

वार्ताहर ● उल्हासनगर

प्रधानमंत्री स्व:आत्मनिर्भर योजनेचा लाभ सर्व राष्ट्रीयकृत बँकांनी लाभ धारकांना उपलब्ध करण्यासाठी सहकार्य करून दहा हजार रुपये कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी किरकोळ फेरीवाल्यांना सहकार्य करावे असे आवाहन पालिका आयुक्त डॉ.पंकज आशिया यांनी बँक व्यवस्थापक यांच्या बैठकीत केले.पंतप्रधान स्व:निधी योजना यशस्वपणे राबवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका व सहकारी बँका आदींच्या व्यवस्थापकांची बैठक गुरुवारी पालिका सभागृहात घेण्यात आली.त्यावेळी पालिका आयुक्त डॉ. आशिया यांनी आवाहन केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे,मुख्यालय उपायुक्त डॉ.दीपक सावंत,नूतन खाडे व शहरातील सर्व राष्ट्रीय बँक यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी सर्व बँक व्यवस्थापक यांना आवाहन केले की लॉकडाऊनच्या काळात किरकोळ फेरीवाले विक्रेते यांचे फार मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे. अशा किरकोळ फेरीवाले विक्रेत्यांना



तातडीने आर्थिक मदत करून त्यांना मदतीचा हात देणे आवश्यक आहे त्याकरिता पंतप्रधान स्व:निधी योजना केंद्र सरकारने लागू केली आहे.या योजनेअंतर्गत किरकोळ फेरीवाले विक्रेते यांना रक्कम रुपये १० हजार कर्ज स्वरूपात उपलब्ध केले जाणार आहेत. सदर योजनेत किरकोळ फेरीवाले यांनी ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे.सदर अर्ज आपल्या नजीकच्या बँकेतून राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेत सादर केल्यानंतर कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.किरकोळ फेरीवाले यांनी ऑनलाईन अर्ज करावेत.याकामी काही अडचणी असल्यास पालिकेच्या मार्केट विभाग प्रमुख किंवा मुख्यालयातील राष्ट्रीय नागरी रोजगार अभियान येथे संपर्क साधावा.

या योजनेत आजपर्यंत ऑनलाईन १,३३४ फेरीवाल्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.५०४ फेरीवाले यांना महानगरपालिकेतर्फे प्राधिकृत पत्र देण्यात आले आहे व त्यांचे अर्ज बँकेकडे वर्ग करण्यात आले आहेत.सदरची योजना राष्ट्रीयकृत बँका व सहकारी बँका यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे तरी बँकांनी सदर पंतप्रधान स्व :निधी आत्मनिर्भर योजना सुरळीपणे राबवण्याकामी सहकार्य करावे असे आवाहन पालिका आयुक्त डॉ. पंकज आशिया यांनी सर्व बँक व्यवस्थापक यांना केले आहे.

## वडूनवघरच्या उपसरपंचपदी दामिनी चौघुले यांची बिनविरोध निवड

वार्ताहर ● भिवंडी

भिवंडी तालुक्यातील वडूनवघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपच्या दामिनी दुष्यंत चौघुले यांची गुरुवारी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.भाजपचे विद्यमान उपसरपंच केसरीनाथ पाटील यांनी आपसात ठरल्याप्रमाणे राजीनामा दिला होता.त्यामुळे उपसरपंचपदासाठी विद्यमान सरपंच सोनम यतीश चौघुले यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.या निवडणुकीसाठी सरपंच सोनम चौघुले,सदस्य केसरीनाथ पाटील, पूनम पाटील,संजना पाटील, शिवसेनेचे कुलदीप पाटील, सचिन पाटील आदी सदस्य उपस्थित होते.तर जयदास पाटील, हर्षदा पाटील, सरीता चौघुले या तीन शिवसेना सदस्यांनी निवडणुकीपासून



अलिप्त राहणे पसंत केले.वडूनवघर ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपा व शिवसेनेत मोठी रस्सीखेच झाल्याने सार्वत्रिक निवडणूक अटीतटीची झाली होती.या निवडणुकीत भाजप ग्रामीणचे जिल्हा उपाध्यक्ष यतीश चौघुले यांनी व्यूहात्मक निवडणूक लढवून ग्रामपंचायतीवर भाजपची सत्ता प्रस्थापित केली आहे.या निवडणुकीत उपसरपंचपदी दामिनी चौघुले यांची बिनविरोध निवड होताच टेंभवली गावच्या तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष कपिल भोईर,भाजप जिल्हा उपाध्यक्ष यतीश चौघुले, मुकुंद पाटील,दुष्यंत चौघुले,रंजित जोशी आदींनी नवनिर्वाचित उपसरपंच दामिनी चौघुले यांना पुष्पमाला अर्पण करून त्यांचे अभिनंदन केले.दरम्यान महिनाभरापूर्वी वडूनवघर गावचे सुपूत्र तथा शिक्षण महर्षी महादेव चौघुले व माजी सरपंच पंडित चौघुले यांचे दुःखद निधन झाले आहे.त्यांच्या प्रेरणेने ग्रामपंचायतीवर सरपंच आणि उपसरपंच पदावर चौघुले कुटुंबातील सदस्य विराजमान झाले असून भविष्यात स्व.चौघुले बंधूंच्या पावलावर पाऊल ठेवून जनहिताची विकासकामे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मार्गी लावू असा विश्वास यतीश चौघुले यांनी व्यक्त केला आहे.

## कायम विनाअनुदानीत शाळांना शंभर टक्के अनुदान देण्याची मागणी

वार्ताहर ● टिटवाळा

संपुर्ण महाराष्ट्रातील कायम विनाअनुदानीत शाळांना १०० टक्के अनुदान देण्याची मागणी स्वराज्य शिक्षक संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष रणधीर शिंदे यांनी प्रसिध्दपत्रकाद्वारे केली आहे. मागील वीस वर्षापासुन शिक्षक आपल्या न्याय हक्कासाठी लढा देत आहेत. शाळेत विनावेतन ज्ञानदानाचे पवित्र कार्य करुन सकाळ, संध्याकाळ जे काम करता येईल ते काम हे विनावेतन शिक्षक करत आहेत.

उदारनिर्वाहाचा प्रश्न सोडवीता सोडवीता मेटाकुटीला येऊन अनेकांनी आत्महत्याही केल्या आहेत. आजपर्यंत महाराष्ट्रभर आमच्या शिक्षक बांधवांनी १६० अंदोलने केली तेव्हा काही शाळा २० टक्के अनुदानावर आल्या. तुटपुंज्या वेतनावर सध्या जगणे कठिण झाले आहे. आता यासर्व घोषीत, अघोषीत सर्व कायम विनाअनुदानीत आश्रमशाळांना १०० टक्के अनुदान मिळणे कमप्राप्त झाले आहे. ५ सप्टेंबर शिक्षकदिनाचे औचित्य साधून स्वराज्य शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य या संघटनेचे प्रदेशाध्यक्ष फत्तेसिंह पवार यांच्यावतीने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड, सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंढे व बहुजन कल्याण मंत्री विजय वड्डेटीवार यांच्याकडे निवेदन देऊन जुनी पेन्शन योजना लागु करणे, डीसीपीएस योजना, शिक्षणसेवक मानधन, शिक्षक पदोन्नती बाबतच्या प्रश्नांना वाचा फोडण्यात आली आहे. पाच सप्टेंबर रोजी शिक्षक बांधव सांगली, कोल्हापुर ते बारामती अशी पायी दिंडी काढणार आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणाचे विठ्ठल शरद पवार यांना साकडे घालुन महाराष्ट्राच्या शिक्षक बांधवांचे प्रश्न प्राधान्यक्रमाने सोडवण्याविषयी विनंती करणार आहेत.

## शेलार - मीठपाडा येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर नाम फलकाचे अनावरण

वार्ताहर ● टिटवाळा

तालुक्यातील शेलार ग्रामपंचायत हद्दीतील मिठपाडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर नाम फलकाचे उदघाटन स्थानिक नागरिकांकडून करण्यात आले आहे.अनेक वर्षांपासून येथील रहिवाशांची मागणी होती की या भागात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे.यासाठी स्थानिक युवकांकडून शेलार ग्रामपंचायतीकडे मागील वर्षीही मागणी करण्यात आली होती.या ठिकाणी स्वागत कमान ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने असावी परंतू यश मिळत नव्हते.मात्र युवा वर्गाने पुढाकार घेऊन मीठपाडा




या ठिकाणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर फलकाचे उदघाटन करण्यात आले. लवकरच स्थानिकांकडून या भागात स्वागत कमान देखील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने उभारण्यात येणार असल्याचे स्थानिक आंबेडकरी युवा कार्यकर्ता मोनिश गायकवाड यांनी सांगितले. यावेळी स्थानिक युवक दिनेश जाधव,दशरथ जाधव,मुकेश,जाधव,निखिल उबाळे,शैलेश वाघमारे,अमोल भोईर,आकाश साळुंखे,गणेश जाधव,प्रदीप गायकवाड, रुपेश जाधव,गुरुनाथ बावडेकर, निमेश शेलार आदींनी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला आहे.

## भरमसाठ वीज बिल भाजपाचे महावितरण कार्यालयावर आंदोलन

### वीज बिल माफ करण्याची पत्राद्वारे केली मागणी

वार्ताहर ● कल्याण

'लॉक-डाऊन' च्या कालावधीत कल्याण पश्चिममध्ये वीज वितरण कंपनीने वीज बिलांची जी भरमसाठ आणि अवाजवी आकारणी केली जात आहे त्यासंदर्भात भारतीय जनता पार्टी कल्याण पश्चिमने गंभीर दखल घेत लॉकडाऊन काळातील वीज बिल माफ करण्याची मागणी केली आहे. महावितरण विभागाला वारंवार सूचना आणि देऊनही वीजबिलात वाढ होत असल्याने ढिय्या आंदोलन करण्यात आले.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे 'लॉकडाऊन' च्या कालावधीत गेले काही महीने वीज वितरण कंपनीकडून शहरातील वीज



ग्राहकांच्या 'मीटरचे रीडिंग घेतले गेले नाही. मागील बिलांच्या आधारे सरासरी काढून वीज बिल आकारण्यात आले, परिणामी ग्राहकांना भरमसाठ बिले आली.त्यामुळे कंपनी विरुद्ध असंतोष निर्माण झाला आहे. महावितरण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही सामान्य माणसांना न्याय मिळत नाहीत. एकीकडे कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे सर्व उद्योग, व्यवसाय बंद आहेत, आर्थिक घडी विस्कटलेली असताना महावितरण विभाग मुद्दामहून वाढीव बिले पाठवून छळ करत आहे.

या काळातील सर्वसामान्य नागरिकांची वीज बिल माफ करावे यासाठी भारतीय जनता पार्टीने कल्याण शहर, मोहोने व टिटवाळा या ठिकाणी आंदोलन करत उद्धव ठाकरे यांना पत्र पाठवली आहेत.सामान्य माणसांना आधार देण्याची गरज असताना मुद्दामहून देत असलेला त्रास वीज बिल माफ करून तातडीने थांबवावा अशी मागणी भाजपा भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश संयोजक तथा माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केली.

यावेळी शहराध्यक्ष प्रेमनाथ म्हात्रे, मोहोने - टिटवाळा मंडलअध्यक्ष शक्तीवान भोईर, नगरसेविका उपेक्षा भोईर, बुधाराम सरनोबत, किरण रोटे, अमोल केदार, प्रिया शर्मा, पुष्पा रत्नपारखी, नगरसेविका वैशाली पाटील, नगरसेवक दया गायकवाड, रितेश फडके, रमेश कोनकर, सदा कोकणे, अनंता पाटील, राजेश यादव, गौरव गुजर, भावना मनराजा, नीरजा मिश्रा, प्रमोद घरत, संदीप पाटील, निर्मला पवार, प्रीती दीक्षित,परेश गुजरे आदि पदाधिकारी,कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

